CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, २१ एप्रिल २०२६ | वर्ष ४ थे अंक ४४ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

आजचा सामना
TATA IPL
दिल्ली वि. हैद्राबाद
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : हैद्राबाद

आज श्री आद्य शंकराचार्य जयंती



# अनिश्चितताच निश्चित

**चर्चेसाठी इराणचा प्रतिनिधी मंडळ पाठवण्यास नकार** | **अमेरिकेचे शिष्टमंडळ दाखल** | **बुधवारी संपुष्टात येणार युद्धबंदीची मुदत**



◆ **इस्लामाबाद, २० एप्रिल**

जगात अनिश्चितताच सर्वांत निश्चित समजली जाते याचा प्रत्यय अमेरिका आणि इराण यांच्यात दुसऱ्या फेरीत होणाऱ्या शांतता चर्चेच्या निमित्ताने आला. दोन्ही बाजूंकडून केवळ दाखवण्यासाठी शांतता चर्चेचा फार्स सुरू होता. मात्र, टोकाच्या राजकारणामुळे या चर्चेवर अनिश्चिततेचे सावट पसरले होते. इराणने चर्चेसाठी प्रतिनिधी मंडळ पाठवण्यास थेट नकार दिला आहे.

येत्या काही दिवसांत इस्लामाबादमध्ये दोन्ही बाजू भेटण्याची अपेक्षा आहे. यासाठी पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील दोन आठवड्यांची युद्धबंदी बुधवारी संपुष्टात येणार आहे. अमेरिकेच्या चर्चेच्या पुढील फेरीत सहभागी व्हायचेकी नाही, याबाबत आमच्या देशाने कोणताही निर्णय घेतलेला नाही, असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाकाई यांनी सोमवारी सांगितले.

तणाव पुन्हा वाढण्याची भीती असतानाही इराण अमेरिकेसोबत चर्चा सुरू ठेवणार आहे. मात्र, त्याच वेळी 'आवश्यक उपाययोजना' करण्यासही सज्ज आहे, असे इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी यापूर्वी सांगितले होते. इराणी नेत्यांच्या परस्परविरोधी वक्तव्यांमुळेही गोंधळ वाढला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतील वेढा फोडून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका इराणी जहाजाला अमेरिकी नौदलाने लक्ष्य केले, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

सध्या तरी आमच्याकडे वाटाघाटींच्या पुढील फेरीबाबत कोणतीही योजना नाही आणि यासंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, असे इस्माईल बाकाई यांनी सोमवारी झालेल्या साप्ताहिक पत्रकार परिषदेत सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### ट्रम्प यांची मुनीरसोबत चर्चा

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांच्याशी फोनवर संवाद साधला. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील नाकेबंदीबाबत व्यक्त केलेल्या चिंतांचा विचार केला जाईल, असे ट्रम्प म्हणाले. दोघांनी या विषयावर सविस्तर चर्चा केली. होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील नाकेबंदी कायम राहिली, तर इराणसोबतची चर्चा पुढे जाऊ शकणार नाही, असे मुनीर यांनी ट्रम्प यांना सांगितले. यावर विचार केला जाईल, असे उत्तर ट्रम्प यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले. अमेरिकेने इराणजवळच्या समुद्रात नाकेबंदी लादली आहे. यामुळे संतप्त झालेल्या इराणने शनिवारी होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली.**

### डॉलर सोडून युआनमध्ये व्यवहार करू : यूएई

**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संयुक्त अरब अमिरातीवरही (यूएई) होत आहे. या देशाचा संयम आता संपत आला आहे. येथील संघर्षासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जबाबदार धरले आहे. युद्धामुळे डॉलरचा तुटवडा निर्माण झाला तर आम्ही तेल आणि वायूचा व्यापार चिनी युआन किंवा इतर चलनांमध्ये करू, असा इशारा यूएईने दिला.**

### मी स्वतः चर्चा करेल : ट्रम्प

**अमेरिकेचे प्रतिनिधी मंडळ उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांच्या नेतृत्वात इस्लामाबाद येथे रात्री उशिरा दाखल झाले. यात विशेष दूत स्टिव्ह व्हिटकॉफ आणि सल्लागार जेरेड कुश्नर यांचा समावेश आहे. संधी मिळाल्यास इराणी शिष्टमंडळासोबत थेट चर्चा करू, असे व्हान्स यांनी सांगितले. चर्चेचा मुख्य मुद्दा इराणच्या अण्वस्त्रांचा आहे. सकारात्मक असल्यास मी स्वतः इराणच्या नेत्यांना भेटण्यासाठी तयार आहे, असे ट्रम्प म्हणाले.**

# 'संस्कृत' भारताचा आत्मा अन् जागतिक वारसा : सरसंघचालक

## संस्कृत भारतीच्या मध्यवर्ती कार्यालयाचे लोकार्पण



◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

संस्कृत ही भाषा भारताचा आत्मा आहे. ही केवळ एक भाषा नसून, भारताची संस्कृती, परंपरा आणि जागतिक दृष्टिकोनाची मुख्य आधारस्तंभ आहे. भारताला समजून घेण्यासाठी संस्कृत समजून घेणे अत्यावश्यक आहे. कारण, यामध्ये आपला बौद्धिक वारसा, तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्ये सामावलेली आहेत. संस्कृत ही केवळ एक भाषा नाही, तर ती एक भारताची प्राणशक्ती आहे. ती आपल्या विचार, संस्कृती आणि ज्ञानाचे सार दर्शवते आणि हे सार संपूर्ण जगापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी सोमवारी केले.

संस्कृत भारतीचे नवनिर्मित मध्यवर्ती कार्यालय 'प्रणव'च्या लोकार्पण सोहळ्याला डॉ. मोहनजी भागवत संबोधित करीत होते. अक्षय्य तृतीयेसारख्या शुभ मुहूर्तावर 'प्रणव कार्यालयाचे लोकार्पण अत्यंत आनंददायी आणि शुभ संकेत आहेत. 'प्रणव' हे सृष्टीच्या आदिनादाचे प्रतीक आहे आणि याच नावाने आरंभलेला हा उपक्रम परिपूर्णतेच्या दिशेने वाटचाल करेल, ' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्कृत ही सर्व भारतीय भाषांमधील दुवा म्हणून कार्य करते आणि तिच्या माध्यमातून इतर भाषाही सहजतेने शिकता येतात. संस्कृतमध्ये सामावलेल्या ज्ञान आणि विज्ञानाचा विशाल साठा संपूर्ण मानवजातीसाठी हितकारक आहे. कोणत्याही उपक्रमासाठी केवळ स्वारस्य असून भागत नाही, तर त्याऐवजी त्या उपक्रमाच्या उद्दिष्टाची स्पष्ट समज असणे तसेच संयम आणि चिकाटी बाळगणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे श्वासोच्छ्वास करण्याची प्रक्रिया कधीही कंटाळवाणी न होता अविरतपणे सुरू असते, त्याचप्रमाणे संस्कृतशी संबंधित कार्यही कधीही न थकता सातत्याने पुढे नेले पाहिजे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

संस्कृतचा प्रत्यक्ष व्यवहारात वापर करून आणि संभाषणाच्या माध्यमातून या भाषेवर सहजपणे प्रभुत्व मिळवता येते. या दृष्टीने संस्कृत संभाषण शिबिरे अत्यंत लाभदायी ठरतात. कारण, त्यांच्यामुळे अगदी अल्पावधीतच या भाषेमध्ये नैपुण्य प्राप्त करणे शक्य होते. जर आपल्याला संस्कृतला गतवैभव पुन्हा प्राप्त करून द्यायचे असेल, तर आपण तिला जनसामान्यांची भाषा बनवले पाहिजे. भारताला समजून घेण्यासाठी संस्कृत ही भाषा अपरिहार्य आहे, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले.

सर्व भाषांना सोबत घेऊन जाणे हेच संस्कृत भारतीचे उद्दिष्ट आहे. संस्कृतच्या माध्यमातून इतर भारतीय भाषा अधिक समृद्ध होतील आणि समाजात सांस्कृतिक एकात्मतेची भावना विकसित होईल, असे डॉ. मोहनजी भागवत यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### संस्कृत भारतीचा विस्तार आणि 'प्रणव'ची वैशिष्ट्ये

**संस्कृतला बोलीभाषा बनवण्याच्या उद्देशाने १९८१ मध्ये संस्कृत भारतीची स्थापना झाली. कालांतराने या संस्थेचे रूपांतर एका व्यापक चळवळीत झाले आणि १९९५ मध्ये तिला औपचारिकपणे संस्कृत भारती नाव देण्यात आले, असे अखिल भारतीय संघटन मंत्री जयप्रकाश गौतम यांनी प्रास्ताविकात सांगितले. १९८१ मध्ये विद्यार्थ्यांच्या एका गटाने सुरू केलेली ही चळवळ आज २८ देशांमध्ये आणि भारतातील ६६० जिल्ह्यांमध्ये विस्तारली आहे. विशाल संकुल असलेली ही इमारत ५० हजार वर्गफूट भागात पसरली आहे. हे कार्यालय आधुनिक सुविधा आणि प्राचीन परंपरेचा संगम म्हणून कार्य करते, असे ते म्हणाले.**

## विचारपुष्प



स्वातंत्र्य आंदोलन सुरू असताना गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, स्वदेशी, खादी, रामराज्य, गोरक्षा, दुर्गा-सरस्वती, लक्ष्मी या प्रतीकांसह भारतमातेची केलेली प्रार्थना यामुळे राष्ट्रभाव जागृत झाला.

**- मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### युद्धविराम अनिश्चिततेमुळे शेअर बाजार स्थिर

**पुणे** : अमेरिका आणि इराण दरम्यान संभाव्य युद्धविराम कराराबाबत असलेल्या अनिश्चिततेमुळे भारतीय शेअर बाजाराने सोमवारी एका अस्थिर सत्रात सपाट सुरुवात केली. जागतिक बाजारातील सकारात्मक संकेतांमुळे सुरुवातीला निर्देशांकात वाढ झाली, मात्र दिवस सरत असताना ही वाढ टिकवण्यात अपयश आले. अमेरिका आणि इराण दरम्यानच्या दोन आठवड्यांच्या संभाव्य युद्धविराम कराराच्या घडामोडींवर गुंतवणूकदारांचे बारीक लक्ष होते, ज्यामुळे बाजारात मोठी चढ-उतार पाहायला मिळाली. व्यवहाराअंति सेन्सेक्स १५.४५ अंकांनी म्हणजेच ०.०२ टक्क्यांनी घसरून ७८,२३४.१२ वर स्थिरावला, तर निफ्टी ४.३० अंकांच्या किरकोळ वाढीसह २३,७१२.५० वर बंद झाला.



## सलग ४ पराभवानंतर मुंबईचा मोठा विजय

● तिलक वर्माचे शतक
● अश्विनीच्या ४ विकेट

**अहमदाबाद** : आयपीएलच्या चालू हंगामात सलग चार पराभवांच्या धक्क्यातून सावरत मुंबई इंडियन्सने अखेर विजयाचे खाते उघडले आहे. सोमवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात मुंबईने गुजरात टायटन्सचा त्यांच्याच घरच्या मैदानावर ९९ धावांनी धुव्वा उडवला. तिलक वर्माचे तुफानी शतक आणि फिरकीपटू अश्विनीच्या भेदक माऱ्याच्या जोरावर मुंबईने हा दिमाखदार विजय साकारला.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या मुंबई इंडियन्सची सुरुवात दमदार झाली. युवा फलंदाज टिळक वर्माने गुजरातच्या गोलंदाजांचा समाचार घेत मैदानाच्या चोहोबाजूला फटकेबाजी केली. त्याने मुंबईला २० षटकांत ५ बाद १९९ धावांच्या मजबूत धावसंख्येपर्यंत पोहोचवले. टिळकच्या या शतकी खेळीमुळे गुजरातसमोर विजयासाठी २०० धावांचे कठीण आव्हान होते. १९९ धावांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सची सुरुवात अत्यंत खराब झाली. मुंबईच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच सामन्यावर पकड मिळवली. विशेषतः अश्विनीने आपल्या फिरकीच्या जाळ्यात गुजरातच्या प्रमुख फलंदाजांना अडकवले.

# पोलिस दलात भाकरी फिरवली

**नऊ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या**

## निलोत्पल यांची कोल्हापूरला बदली; एम रमेश गडचिरोलीचे नवे एसपी

◆ **मुंबई, २० एप्रिल**

महाराष्ट्र गृह विभागाने राज्य पोलिस दलात २० एप्रिल रोजी महत्त्वपूर्ण प्रशासकीय फेरबदल केले आहेत. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५९ च्या तरतुदीनुसार नऊ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकृत आदेश जारी करण्यात आले आहेत. या बदल्यांमध्ये विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यासह पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वाच्या पदांचा समावेश आहे.


निलोत्पल


एम रमेश

गडचिरोलीच्या पोलिस अधीक्षकपदाची जबाबदारी आतापर्यंत सांभाळणारे निलोत्पल यांची कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. गडचिरोली येथे रिक्त झालेल्या पोलिस अधीक्षकपदावर आतापर्यंत अपर पोलिस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेले एम. रमेश यांची पदोन्नतीसह नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच, योगेश गुप्ता (पोलिस अधीक्षक, कोल्हापूर) यांची गडचिरोली परिक्षेत्राचे पोलिस उप महानिरीक्षक (अतिरिक्त कार्यभार) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

इतर बदल्यांमध्ये तुषार दोशी (पोलिस अधीक्षक, सातारा) यांची सांगली येथे पोलिस अधीक्षक म्हणून बदली करण्यात आली आहे. सांगलीचे विद्यमान पोलिस अधीक्षक संदीप घुगे आता मुंबई येथे राज्य गुप्तवार्ता विभागात पोलिस उपायुक्त म्हणून काम पाहतील. तसेच, महेश्वर रेड्डी (पोलिस अधीक्षक, जळगाव) यांची पुण्यात राज्य गुन्हे अन्वेषण विभागात पोलिस अधीक्षक म्हणून बदली झाली. त्यांच्या जागी धुळ्याचे पोलिस अधीक्षक श्रीकांत ढिवरे आले. *(तभा वृत्तसेवा)*

### राजकुमार शिंदे वाशिमचे अधीक्षक

**पुणे शहर पोलिस दलातील दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्याही महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. पुणे पोलिस दलात उपायुक्त पदावर कार्यरत असलेले निखिल पिंगळे यांची सातारा पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती झाली आहे, तर राजकुमार शिंदे हे देखील पुणे उपायुक्त पदावरून वाशिमच्या पोलिस अधीक्षकपदी विराजमान होणार आहेत.**



**सोलापूर** : भगवान परशुराम जयंतीनिमित्त भगवान परशुराम जन्मोत्सव मध्यवर्ती समितीच्यावतीने सोमवार, दि.२० एप्रिल २०२६ रोजी प्रतिकात्मक हत्तीवरुन मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी महापौर विनायक कोंड्याल, नगरसेविका रोहिणी तडवळकर, नगरसेवक बिज्जू प्रधाने, सात्विक बडवे यांच्यासह प्रा.मोहिनी पतकी, प्रशांत बडवे, अनंत जोशी, बजरंग कुलकर्णी आदी. **(सविस्तर वृत्त पान ८ वर)**

# आगामी आठवड्यात दोन्ही उड्डाणपुलांचा विषय अजेंड्यावर

### केंद्र सरकारच्या जागांसाठी महिनाखेर दिल्लीत बैठक

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

नगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, पंचायत समित्या, जिल्हा परिषद निवडणुकांत योग्य टायमिंग साधून धाडसी निर्णय घेत बाजीगर ठरलेल्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आगामी आठवड्यात सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपुलांचा विषय अजेंड्यावर घेतला आहे. भू-संपादन करायच्या राहिलेल्या केंद्र सरकारच्या अखत्यारितील जागांसाठी या महिनाखेर संबंधित अधिकाऱ्यांची दिल्लीत बैठक लावून उड्डाणपुलांचे काम गतीने मार्गी लावणार असल्याची ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी भूमिपूजन करूनही गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या उड्डाणपुलासाठी माजी मंत्री तथा आ.सुभाष देशमुख, आ.विजयकुमार देशमुख यांनी अनेकदा प्रयत्न केले होते. या जागेच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आयुक्त सचिन ओम्बासे यांच्याशीही चर्चा केली होती.



मात्र केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या जागांचे भूसंपादन न झाल्याने आजही शहरातील या दोन मुख्य उड्डाणपुलांचा विषय प्रस्तावित आहे. जुना पुणे नाका ते पत्रकार भवन (७.७० किमी), जुना बोरामणी नाका ते जुळे सोलापूर मोरारका बंगला (४.९२ किमी) अशा दोन उड्डाणपुलांचा विषय प्रलंबित आहे. यासाठीची भूसंपादन प्रक्रिया तब्बल १० ते १२ वर्षांनंतर अंतिम टप्प्यात आली आहे. अगदी कासवगतीने या कामाचे भूसंपादन करण्यात आले आहे. सोलापूरला जोडण्यात येणारे अनेक चार पदरी रस्ते, इतर शहरातील उड्डाणपुलांचे काम अत्यल्प काळात (२ ते ३ वर्षात) झाले मात्र सोलापूर येथील उड्डाणपुलांच्या कामासाठी इतका विलंब का लागला? असा सवाल नागरिक विचारत आहेत. सध्याच्या स्थितीत या प्रकल्पांसाठी महापालिकेकडून बाधित इमारती आणि मिळकतदारांची यादी होवून भूसंपादन प्रक्रिया पार पडली आहे. मात्र केंद्रीय स्तरावरील असलेल्या मिळकतींची भूसंपादन प्रक्रिया अगदी शांत, कासवगतीने होत असल्याने आता पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मध्यस्थी करीत येत्या महिनाखेर केंद्रीय स्तरावरील दूरसंचार विभाग, पोस्ट खाते आणि रेल्वेच्या अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांची एक बैठक दिल्लीत घेण्याचे नियोजन केले आहे.

येत्या एप्रिल अखेर म्हणजेच अवघ्या १५ दिवसात या प्रलंबित उड्डाणपुलावर पालकमंत्री जयाभाऊ तोडगा काढणार आहेत. आतापर्यंत पालकमंत्री गोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापुरातील विविध निवडणुका लिलया जिंकल्या आहेत. इतकेच नाहीतर सोलापूर शहराच्या विकासासाठी शासन स्तरावरून कोट्यवधींचा निधीही त्यांनी आणला आहे; यामुळे आता उड्डाणपुलाचे कामही ते लिलया करतील, अशी आशा सोलापूरकरांना लागली आहे.

# मोफत उपचारासाठी रुग्णाला मागितली लाच


**मंगळवेढा येथील प्रकार; रुग्णसेवेला काळीमा**

### डॉक्टरसह आरोग्य मित्रा विरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर/मंगळवेढा, दि.२० एप्रिल-**

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रियेसाठी लाचेची मागणी केल्याप्रकरणी मंगळवेढ्यातील खासगी डॉक्टर व आरोग्य मित्राविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. डॉ.अरुणकुमार महिंद्रकर, सोमनाथ इंगळे अशी गुन्हा झालेल्या आरोपींची नावे आहेत. यामुळे रुग्णसेवेला काळीमा फासला गेला.

याबाबतचे वृत्त असे की यातील तक्रारदाराच्या ७२ वर्षीय आई पाय घसरून पडल्याने मंगळवेढा येथील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तपासणीनंतर शस्त्रक्रिया करावे लागणार असल्याचे सांगण्यात आले. तक्रारदाराची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून मोफत उपचार करण्यात यावी, अशी विनंती केली. संबंधित डॉक्टरांनी शस्त्रक्रियेसाठी १६ हजार रुपयांची मागणी केली. त्यापैकी ६ हजार रुपये सुरुवातीला स्वीकारुन शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर डिस्चार्ज देण्यासाठी उर्वरित १० हजार रुपयांची मागणी करण्यात आली. यादरम्यान यातील तक्रारदाराने सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दिली. २४ मार्च २०२६ रोजी पथकाने पडताळणी करुन कारवाई केली. पोलिस उपायुक्त शिरीष सरदेशपांडे, अपर पोलिस अधीक्षक अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर लाचलूचपत प्रतिबंधक




विभागाचे पोलिस निरीक्षक रविंद्र लांभाते, पोलिस अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, श्रीराम घुगे, अक्षय श्रीराम आदींच्या पथकाने ही कामगिरी बजाविली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपअधीक्षक प्रशांत चौगुले करीत आहेत.

## महत्त्वाचे

### चर्चेसाठी वेळ आणि जागा सांगा : सुप्रिया सुळे



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर केलेल्या 'महिला विरोधी' आणि 'रंग बदलणारे' या टीकेनंतर, चर्चेसाठी कोणीही समोर येण्याचे आव्हान दिले होते. त्यास उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) खासदार सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्र्यांचे थेट चर्चेचे आव्हान स्वीकारले आहे. ''या विषयावर आपण समोरासमोर बसून चर्चा करूया, फक्त वेळ आणि जागा सांगा,'' अशा शब्दांत सुळेंनी फडणवीसांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. देशात पहिल्यांदा महिलांना आरक्षण देण्याचे धाडस तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली दाखवले होते, याची आठवण सुळेंनी करून दिली. त्या काळी भाजपनेही या निर्णयाचे स्वागत केले होते, आता मात्र सोयीनुसार भूमिका बदलली जात असल्याचा टोला त्यांनी लगावला. नारी शक्ती वंदन विधेयक संसदेत मंजूर होऊन अडीच वर्षे लोटली तरीही त्याची अंमलबजावणी का झाली नाही, असा सवाल करत सुळे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला.

# विरोधकांकडून महिला आरक्षणाची भ्रूणहत्या!



## विरोधकांकडून ७० कोटी महिलांचा विश्वासघात ● मुख्यमंत्री फडणवीसांचा हल्लाबोल

◆ **मुंबई,२० एप्रिल**

१७ एप्रिल हा दिवस भारताच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीतील एक ऐतिहासिक सुवर्णदिन ठरणार होता, परंतु काँग्रेस, उबाठा (उद्धव ठाकरे गट), शरद पवार गट, तृणमूल आणि समाजवादी पार्टीसारख्या विरोधकांनी एकत्र येत आपल्या महिला विरोधी मानसिकतेचे बीभत्स प्रदर्शन केले आणि महिला आरक्षण विधेयकाची अक्षरशः भ्रूणहत्या केली, असा घणाघाती आरोप राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

मुंबईत आयोजित महायुतीच्या विशेष पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी विरोधकांच्या दांभिकपणावर आणि दुटप्पी भूमिकेवर सडकून टीका केली. महायुतीच्या या पत्रकार परिषदेला शिवसेनेतर्फे नीलम गोऱ्हे, राष्ट्रवादीकडून अदिती तटकरे आणि चित्रा वाघ यांच्यासह भाजपाच्या प्रमुख महिला नेत्या आणि पदाधिकारी उपस्थित होत्या.

२०२३ मध्ये जेव्हा एनडीएकडे दोन तृतीयांश बहुमत होते, तेव्हा समर्थन देणाऱ्या या पक्षांनी आता बहुमत नसल्याचे पाहताच सरड्यासारखे रंग बदलले आणि आपले खरे दात दाखवले. हे विधेयक मंजूर झाले असते तर संसदेत महिलांची संख्या ७३ वरून २७३ वर गेली असती, असे मुख्यमंत्री म्हणाले. महिलांच्या हक्कांसाठी महायुती राज्यभरातून १ कोटी महिलांच्या सह्या गोळा करणार असून, तालुका स्तरावर जनजागृती करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनतेच्या दरबारात देणार उत्तर संसदेत विरोधकांनी बहुमताच्या अभावाचा गैरफायदा घेत जरी हे विधेयक पाडले असले, तरी रस्त्यावरची लढाई महायुती जिंकणारच, असा एल्गार फडणवीसांनी पुकारला आहे. विधेयकामागील सत्य आणि काँग्रेसचा खोटेपणा २०२९ च्या निवडणुकांमध्ये कोणत्याही परिस्थितीत महिलांना आरक्षण मिळावे, या शुद्ध भावनेनेच मोदी सरकारने हे विधेयक आणले होते. १९७१ साली देशाची लोकसंख्या ४५ कोटी असताना संसदेच्या ५४३ जागा निश्चित झाल्या होत्या. आज लोकसंख्या १४० कोटींवर गेली असताना प्रतिनिधींची संख्या वाढवणे ही संविधानाचीच गरज आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### दक्षिण भारतावर कोणताही अन्याय नाही

परिसीमन (डिलिमिटेशन) मुळे दक्षिणेतील राज्यांवर अन्याय होईल हा विरोधकांचा दावा खोटा आहे. नव्या सूत्रानुसार सर्व राज्यांत ५०% जागा वाढणार असून, दक्षिण भारताचे संसदेतील प्रतिनिधित्व २३.७६ टक्क्यांवरून २३.८७ टक्क्यांपर्यंत वाढलेच असते, असा खुलासा फडणवीसांनी केला. ■

### काँग्रेसची अर्बन नक्षल मानसिकता

सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, कॅग किंवा रिझर्व्ह बँक असो, आपल्या मनाविरुद्ध निकाल आल्यास घटनात्मक संस्थांवर हल्ला करण्याची काँग्रेसची ही अर्बन नक्षल मानसिकता आहे. खोटं बोलण्यात राहुल गांधींना ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळेल, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. ■

# प. बंगालमध्ये ५४ वर्षांत फक्त चार मुख्यमंत्री

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

पश्चिम बंगालमध्ये ५४ वर्षात फक्त चार मुख्यमंत्री झाले, यातील दोन मुख्यमंत्री काँग्रेसचे, तर प्रत्येकी एक डावे आणि तृणमूल काँग्रेसचा आहे. यातील सर्वाधिक म्हणजे २३ वर्ष माकपचे ज्योती बसू मुख्यमंत्रिपदावर होते.

सिध्दार्थ शंकर रे हे राज्यातील काँग्रेसचे शेवटचे मुख्यमंत्री ठरले, १९७२ ते १९७७ या काळात रे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री होते. रे यांची मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द संपल्यानंतर राज्यातील काँग्रेसचा प्रभावही पूर्णपणे ओसरला. १९७७ नंतर राज्यात कधीच काँग्रेसला सत्ता मिळाली नाही, राज्यातील काँग्रेसचे अस्तित्वही धोक्यात आले.

१९७७ मध्ये माकपचे ज्योती बसू पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, सलग २३ वर्ष म्हणजे २००० पर्यंत ते मुख्यमंत्री होते. देशात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा दुसऱ्या क्रमांकाचा विक्रम बसू यांच्या नावावर आहे. देशात सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहण्याचा विक्रम अरुणाचल प्रदेशचे पवनकुमार चामलिंग यांच्या नावावर आहे. बसू यांच्यानंतर बुध्ददेब भट्टाचार्य पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री झाले. २०११ पर्यंत भट्टाचार्य मुख्यमंत्री होते. २०११ च्या विधानसभा निवडणुकीत डाव्यांचा पराभव झाला, आणि राज्यात तृणमूल काँग्रेसची राजवट आली. ममता बॅनर्जी यांनी २०११ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.




त्यानंतर २०१६ आणि २०२१ च्या निवडणुकीतही त्यांनी बहुमत मिळवत राज्यातील आपली सत्ता कायम ठेवली. तीनदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणाऱ्या ममता बॅनर्जी १५ वर्षापासून राज्याच्या मुख्यमंत्री आहेत. अन्य राज्यांच्या तुलनेत पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्रिपदावर आलेले नेते अनेक वर्ष टिकले. १९५० पर्यंत राज्याच्या प्रमुखाला पंतप्रधान संबोधले जायचे. प्रफुल्लचंद्र घोष हे राज्याचे पहिले पंतप्रधान होते. १५ ऑगस्ट १९४७ ला ते पंतप्रधान झाले, १६० दिवस ते या पदावर होते. बिधानचंद्र रॉय राज्याचे दुसरे पंतप्रधान. २३ जानेवारी १९४८ पासून ते पंतप्रधान होते. २ वर्ष ते या पदावर होते. राज्याचे शेवटचे पंतप्रधान बिधानचंद्र रॉय २६ जानेवारी १९५० ला राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. काँग्रेसचे बिधानचंद्र रॉय यांनी सलग तीन कार्यकाळात १२ वर्ष १५६ दिवस मुखयमंत्रिपद भूषवले. रॉय यांच्यानंतर २ जुलै १९६२ ला काँग्रेसचे प्रफुल्लचंद्र सेन राज्याचे मुख्यमंत्री झाले. ४ वर्ष २४२ दिवस ते मुख्यमंत्री होते. बांगला काँग्रेसचे अजोयकुमार मुखर्जी हे राज्याचे तिसरे मुख्यमंत्री. १ मार्च १९६७ ला मुखर्जी मुख्यमंत्री झाले. २६५ दिवस ते मुख्यमंत्री होते. मुखर्जी यांच्यानंतर अपक्ष प्रफुल्लचंद्र घोष राज्याचे मुख्यमंत्री झाले. २१ नोव्हेंबर १९६७ ते मुख्यमंत्री झाले, पण ते या पदावर फक्त ९१ दिवस होते. त्यानंतर राज्यातील अस्थिर राजकीय परिस्थितीत बांगला काँग्रेसचे अजॉयकुमार मुखर्जी २५ फेब्रुवारी १९६९ ला दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रिपदाची ही त्यांची कारकीर्द एक वर्षाची होती. एक वर्षाच्या राष्ट्रपती राजवटीनंतर मुखर्जी २ एप्रिल १९७१ ला तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. ■




# निदा खानचा अग्रिम जामीन फेटाळला

### न्यायालयाचा दणका

◆ **नाशिक, २० एप्रिल**

येथील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमधील (टीसीएस) धर्मांतरण प्रकरणात कार्मिक व्यवस्थापक निदा खानचा अग्रिम जामीन येथील न्यायालयाने सोमवारी फेटाळला. निदा खानला अंतरिम दिलासा देण्यासही न्यायालयाने नकार दिला.

निदा खानच्या वकिलाने युक्तिवाद करताना तिच्या वैद्यकीय स्थितीबाबत माहिती दिली. निदा खान गर्भवती आहे, असे त्याने न्यायालयात सांगितले.

सरकारी वकिलांनी निदा खानच्या वकिलाने सादर केलेल्या युक्तिवादाला विरोध केला. नाशिक रोड न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश के. जी. जोशी या प्रकरणी सुनावणी करीत आहेत. निदा खानचा अग्रीम जामीन फेटाळत त्यांनी या प्रकरणाची सुनावणी २७ एप्रिल रोजी ठेवली.



या प्रकरणाची दखल राष्ट्रीय महिला आयोगाने घेतली असून तातडीने सत्यशोधन समिती स्थापन केली, अशी माहिती आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी दिली. याबाबत आम्ही घोषणा केली आहे. ही समिती मागील दोन दिवसांपासून नाशिकमध्ये आहे. त्यांनी पोलिसांसोबत चर्चा केली. आता पीडिता, त्यांचे कुटुंब आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्याच्या प्रयत्नात असल्याचे त्यांनी सांगितले.

१० दिवसांत अहवाल सादर करण्यास आम्ही समितीला सांगितले. समिती सध्या चांगल्या प्रकारे काम करीत असल्याचा मला विश्वास आहे. पोलिस तपासही सुरू आहे. आयोगाची एक समिती या तपासावर येत्या काही दिवसांत लक्ष ठेवेल, असे रहाटकर म्हणाल्या.

**टीसीएसने केले निलंबित**

निदा खानवर टीसीएसने अखेर निलंबनाची कठोर कारवाई केली आहे. कंपनीने गत ९ एप्रिल रोजीच तिच्यावर ही कारवाई केली. पण, ही माहिती सोमवारी समोर आली. निदा खान २७ डिसेंबर २०२१ पासून कंपनीशी संलग्न होती. ती प्रोसेस असोसिएट या पदावर कार्यरत होती. कंपनीने तिचा नेटवर्क ॲक्सेसही तत्काळ प्रभावाने रद्द केला आहे. याव्यतिरिक्त सध्या तिच्या ताब्यात असलेल्या कंपनीच्या सर्व मालमत्ता परत करण्याच्या सूचनाही जारी करण्यात आल्या. तिला कोणत्याही कार्यालयात उपस्थित राहण्यास अथवा घरून काम करण्यासही मनाई करण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

# मुंबईत भोंदूला अटक

◆ **मुंबई, २० एप्रिल**

महिलांना बेशुद्ध करुन त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या एका भोंदूला मुंबईत अटक करण्यात आली. इरफान नियाज अहमद, असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात कांदिवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भोंदू इरफान मूळचा बहराइच (उत्तर प्रदेश) रहिवाशी आहे. तो अनेक वर्षांपासून मुंबईत वास्तवास आहे. स्वतःला फकीर म्हणवत महिलांची फसवणूक करत असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. महिलांच्या समस्या जाणून उपचार आणि दोष निवारणच्या नावाखाली तो त्यांना जाळ्यात अडकवत होता. या भोंदूने कांदिवलीतील एका महिलेची फसवणूक केली आहे. पतीच्या मृत्यूचा मुद्दा सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर महिलेसह दोन मुलींवर कथित धार्मिक विधी केला आणि तिघींनाही बेशुद्ध केले. बेशुद्ध अवस्थेत त्याने एका मुलीचा विनयभंग केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या घटनेनंतर कांदिवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरु आहे. हा भोंदू महिलांना त्यांच्या समस्या सांगून उपचाराच्या नावाखाली आधी त्यांना बेशुद्ध करायचा. ◂(वृत्तसंस्था)

# रियाज काजीच्या संस्थेला विदेशातून निधी आल्याचे उघड

## नवीन धक्कादायक खुलासे ● एसआयटी चौकशीची मागणी

### नागपुरातही धर्मांतराचे जाळे?

◆ **नागपूर, २० एप्रिल**

मानकापूर परिसरातील 'युनिव्हर्सल मल्टीपर्पज सोसायटी'चा संस्थापक रियाज काजी याने संस्थेतील चार महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग करीत धर्मांतरण करण्यासाठी दबाव टाकला. एका विशिष्ट संघटनेशी जुळलेल्या रियाज काजीला विदेशातून मोठ्या प्रमाणात निधी मिळत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. चार पीडित तरुणींच्या तक्रारीवरून मानकापूर पोलिसांनी काजीला अटक केली आहे. त्याला २३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहे. काजीच्या विरोधातील प्रकरणाने आता मोठे वळण घेतले असून विनयभंग व मानसिक छळाच्या आरोपांबरोबरच त्याच्या आर्थिक नेटवर्कही समोर आले आहे.

पीडितांनी काजीवर अश्लील वर्तन, मानसिक छळ, धमक्या देणे, बदनामी करणे तसेच धार्मिक बाबींवर दबाव टाकण्याचे गंभीर आरोप केले आहेत. त्याच्या विरोधात आणखी काही पीडित समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणात नव्याने समोर आलेल्या माहितीनुसार काजीच्या संस्थेला अमेरिका आणि बेंगळुरू येथील संस्थांकडून 'ग्लोबल फंड' मिळत होता. या निधीच्या आधारे त्याने २०१८ मध्ये 'पढे हम, पढाएं हम' हे अभियान सुरू केले होते. या मोहिमेतून झोपडपट्टीतील व शिक्षणापासून दूर गेलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तसेच ओठ विकार असलेल्या सुमारे १७५ रुग्णांवर शस्त्रक्रिया करून त्यांचा खर्च संस्थेमार्फत उचलण्यात आल्याचा दावा त्याने प्रसारमाध्यमांवर केला होता.

काजीने २०१० मध्ये ही संस्था स्थापन केली होती. यापूर्वी तो आरोग्य विभागात कार्यरत होता. एचआयव्ही संदर्भातील कामकाज पाहत होता. २०१६ मध्ये नोकरी गेल्यानंतर त्याने सामाजिक क्षेत्रात काम सुरू ठेवले. त्याला विविध पुरस्कारांनीही गौरविण्यात आले होते. तेव्हापासून तो धार्मिक संघटनांमधे काम करण्यास सक्रीय झाला. धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी तो मोठमोठे कार्यक्रम आयोजित करीत होता, हे विशेष. ◂(तभा वृत्तसेवा)

### एसआयटी स्थापन करण्याची मागणी

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विश्व हिंदू परिषदेकडून पोलिसांना निवेदन देत विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. काजीच्या संपर्कातील इतर व्यक्ती, निधीचे स्रोत व वापर याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रकरणामुळे नागपूर शहरात मोठी खळबळ उडाली असून पुढील तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ■




# राळेगाव शहरात कडकडीत बंद

## ३४ मुलींचे बेपत्ता प्रकरण ● बजरंग दलाकडून जाळपोळ



बंददरम्यान शहरातील स्थिती



◆ **राळेगाव, २० एप्रिल**

मानवी तस्करीच्या निषेधार्थ राळेगाव शहरात २० एप्रिल रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. हिंदू समाजातील तब्बल ३४ मुली बेपत्ता झाल्याने वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ सकल हिंदुत्ववादी संघटनांनी बंदची हाक दिली आणि त्याला नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. भाजपा जिल्हाध्यक्षांनी हे प्रकरण चव्हाट्यावर आणताच विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल कार्यकर्त्यांनी राळेगाव ठाण्यावर धडक दिली होती. त्यामुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण झाले होते.

ॲड. चौहान यांनी रविवारी माध्यमांशी बोलताना, राळेगाव परिसरातून सहा महिन्यांत ३४ आदिवासी मुली बेपत्ता असल्याचे सांगितले. माता-पित्यांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या अल्पवयीन मुली विकत घेतल्या जात असल्याचा दावा चौहान यांनी केला. तक्रारींचा ओघ सुरूच असून वडकी परिसरातील उमरविहीर या गावातील एकाने आपली मुलगी महिनाभरापासून बेपत्ता असल्याचे सांगितले. तिचा मोबाईलसुद्धा बंद असून घातपाताची शंका त्यांनी ॲड. प्रफुल्ल चौहान यांच्याकडे वर्तविली. या ऑडिओ क्लिपमध्ये तरुण आणि तरुणीतील संवाद आहे. त्यात मजहर कुरेशी नामक इसम मुलींचा व्यवहार करतो, असा उल्लेख आहे. त्याहून गंभीर म्हणजे, या आरोपीला एका पोलिसाकडूनच वाचविण्याचा प्रयत्न केला जात असून त्याच्यावर कारवाईची मागणी होत आहे.

**पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष**

राळेगाव तालुक्यातील घटनाक्रम संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असताना यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी या तालुक्याला साधी भेटसुद्धा दिलेली नाही. यावरून त्यांना या तालुक्याशी काही घेणे-देणे आही की नाही, असा प्रश्न जनता विचारत आहे. जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारणाऱ्या मंत्र्यांचे नैतिक कर्तव्य असतानासुद्धा त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतल्याचे दिसत नाही. ◂(तभा वृत्तसेवा)

### हिंदू कार्यकर्त्यांकडून निदर्शने

लव्ह जिहाद व मनुष्य तस्करीसंदर्भात कुख्यात गुन्हेगार मजहर कुरेशीसह त्याच्या साथीदारांवर कठोर कारवाई करून फाशीची शिक्षा देण्यात यावी, या मागणीकरिता सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद, बजरंग दलातर्फे सोमवारी संपूर्ण राळेगाव शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. बजरंग दल कार्यकर्त्यांनी सकाळी बसस्थानक परिसरात जाळपोळ करून जोरदार निदर्शने केली. विहिंपचे राम लोखंडे, अभिजित डोंगरे, भूपेंद्र परिहार, ओम ठाकरे यांनी राळेगावला भेट देऊन संयम बाळगण्याचे आवाहन बजरंग दल कार्यकर्त्यांना केले आहे. ■

### संशयीताच्या घरावर दगडफेक

मानव तस्करीतील संशयित आरोपी मजहर कुरेशी याला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. या घटनेतील आरोपीच्या घरावर रविवारी सायंकाळी मोठा जमाव चाल करून गेला. काही हिंदुत्ववादी संघटनांनी आरोपीच्या घरावर दगडफेक करून तोडफोड केली तसेच आरोपीची गाडीसुद्धा फोडल्याची माहिती समोर आली आहे. ■

# अष्टभुजा मंदिर ऊर्जा केंद्र : शांताक्का

## वं. मावशी केळकर यांनी स्थापन केलेल्या अष्टभुजा मंदिराचे भूमिपूजन

◆ **वर्धा, २० एप्रिल**

वर्धेतील अष्टभुजा मंदिर हे वं. मावशी केळकर यांचे तपस्थळ आहे. येथे त्यांनी सलग ४८ तास साधना केली होती. त्यांनीच या मंदिराची स्थापना केली. नारी नारायणही असल्याचा विश्वास त्यांना होता. आज वं. मावशी केळकर यांनी स्थापन केलेल्या त्यांच्याच भूमीत असलेल्या देवी अष्टभुजा मंदिर आहे तसे ठेवून मंदिराचे विस्तारीकरण होते आहे. हा आनंदाचा क्षण आहे. हे शक्ती केंद्र शक्तिपीठ व्हावे. वं. मावशींचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी केले.



शिलान्यास प्रसंगी प्रमुख संचालिका शांताक्का, पालकमंत्री डॉ. भोयर, सर कार्यवाहिका सीता दीदी, ॲड. शीतल भोयर, अष्टभुजा मंदिराच्या अध्यक्ष चित्रा जोशी, देशपांडे व शहाणे

वं. मावशी केळकर यांनी स्थापन केलेल्या देवी अष्टभुजा मंदिराच्या परिसराचे नूतनीकरण कार्याचे भूमिपूजन सोमवारी सकाळी ९ वाजता झाले, त्यावेळी शांताक्का मार्गदर्शन करीत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, राष्ट्रसेविका समितीच्या सरकार्यवाहिका सीता दीदी, प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष ॲड. शीतल भोयर, सहकार्यवाहिका तथा अष्टपूजा मंदिराच्या अध्यक्ष चित्रा जोशी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत उपस्थित होते.

डॉ. पंकज भोयर यांनी, भविष्यातली उत्तम पिढी घडण्याकरिता संस्कार शिबिरं देखील या ठिकाणी झाले पाहिजे, हे अभिप्रेत धरूनच आपण समितीला सोबत घेऊन ते काम पुढे नेतो आहे. वर्धेला मोठा इतिहास आहे. आजही मोठी कामं होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून तयार होणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाची सुरुवात वर्धेतून होत आहे आणि वं. मावशी केळकर यांनी निर्माण केलेले हे स्थळही ऊर्जा केंद्र आहे.

भूमिपूजनापूर्वी मावशी केळकर यांचे नातू माधव व रमा केळकर यांनी देवी अष्टभूजेची पूजा केली. यावेळी आर्किटेक्ट केदार दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला. संचालन सरिता पराडकर यांनी तर प्रास्ताविक डॉ. राधा पुरी यांनी केले.

कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे अ. भा. सहसंपर्क प्रमुख सुनील देशपांडे, नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख, तालुका संघ चालक हिरामण पारिसे, आ. सुमित वानखेडे, माजी आमदार सरोज काशिकर, वर्धा नागरी बँकेचे अध्यक्ष डॉ. विनय देशपांडे, उपाध्यक्ष मंगेश परसोडकर, युवा समाजसेवक प्रदीप बजाज, पीव्ही टेक्स्टाईलचे व्यवस्थापकीय संचालक भूपेंद्र शहाणे, भाजपा जिल्हा अध्यक्ष संजय गाते, जयंत येरावार, वैशाली येरावार, भाजपा जिल्हा महामंत्री कमलाकर निंभोरकर, भारत विद्यालय हिंगणघाटचे सचिव रमेश धारकर, दप्तरी ॲग्रोचे शैलेंद्र दप्तरी, साई मंदिरचे सचिव सुभाष राठी, भूषण वैद्य उपस्थित होते. ◂(तभा वृत्तसेवा)

### २०२७ पर्यंत मंदिराचे काम होईल पूर्ण

चित्रा जोशी यांनी १९७३ मध्ये जयपूर येथे मावशींनी मूर्ती तयार केली. मावशी येथे नवरात्रीत राहत होत्या. येथे शक्ती जागवली आहे. आता येथे देखणं मंदिर होईल. ते काम २०२७ मध्ये पूर्ण करावयाचे असल्याचे सांगितले. ■

# विशेष न्यायालयीन व्यवस्था बनली थट्टा

## न्यायाधीशांवरील वाढत्या दबावावर न्यायालयाची टीका

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

सर्वोच्च न्यायालयाने विशेष न्यायालयांच्या कामकाजाबाबत कडक शब्दांत ताकीद दिली आहे. न्यायालयाने म्हटले की, या न्यायालयांनी केवळ विशेष कायद्यांशी संबंधित खटले चालवावेत, सर्वसाधारण दिवाणी आणि फौजदारी खटले चालवू नयेत. सध्याची व्यवस्था विशेष न्यायालयांवर अतिरिक्त भार टाकत आहे. त्यामुळे त्यांच्या मूळ उद्देशावर परिणाम होत आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या न्यायासनाने नमूद केले की, अनेक ठिकाणी एकाच न्यायालयावर विविध प्रकारच्या खटल्यांची जबाबदारी सोपवली जाते. त्यामुळे विशेष न्यायालयीन व्यवस्था एक थट्टा बनली आहे. न्यायालयाने या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आणि सुधारणेची गरज अधोरेखित केली. न्यायालयाने पुढे म्हटले की, खटल्यांचा जलद निपटारा सुनिश्चित करण्यासाठी विशेष न्यायालयांनी दररोज सुनावणी घ्यावी आणि ती वकील कार्यालयाजवळ किंवा त्याच आवारात असावीत. न्यायालयाने अतिरिक्त कर्मचारी आणि प्रशिक्षित न्यायाधीशांच्या गरजेवरही भर दिला.

हे प्रकरण यूएपीए सारख्या गंभीर कायद्यांखालील प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष न्यायालयांच्या देखरेखीशी संबंधित आहे. अशा प्रकरणांचा एका वर्षात निपटारा करण्यासाठी किती अतिरिक्त तरतूद आवश्यक असेल, असा प्रश्न न्यायालयाने राज्यांना विचारला. सुनावणीदरम्यान, झारखंड सरकारने सांगितले की राज्यात ७९० यूएपीए प्रकरणे प्रलंबित असून ती जिल्हा न्यायाधीशांकडून हाताळली जात आहेत.

### कोणत्याही सरकारला दोष देणे हा उद्देश नाही

न्यायालयाने म्हटले की, हीच समस्येची मुळे आहेत. जेव्हा न्यायाधीश केवळ विशिष्ट प्रकरणांवर लक्ष केंद्रित करत नाहीत तेव्हा विलंब वाढतो आणि आरोपी अधिक काळ तुरुंगात राहतात. कोणत्याही सरकारला दोष देणे हा त्यांचा उद्देश नाही, तर खटल्यांना विलंब झाल्यामुळे तुरुंगात असलेल्या विचाराधीन कैद्यांबद्दल चिंता व्यक्त करणे हा आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने राज्यांना प्रलंबित प्रकरणांचा संपूर्ण तपशील आणि आवश्यक असलेल्या विशेष न्यायालयांची संख्या देण्याचे निर्देश दिले. ■

### राज्यांनी पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्यात

सर्वोच्च न्यायालयाने असेही म्हटले की, केंद्र सरकार विशेष न्यायालयांसाठी निधी देण्यास इच्छुक आहे. राज्यांनी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. लवकरच अशी प्रणाली तयार केली जाईल जेणेकरून विशेष न्यायालये केवळ त्यांना नेमून दिलेल्या प्रकरणांची सुनावणी घेतील आणि न्यायिक प्रक्रियेला गती देता येईल, असेही न्यायालयाने सांगितले. ■



मी प्राजक्त तनपुरे यांच्याशी अनेकदा बोलली आहे. गेल्याच आठवड्यात आमचं बोलणं झालं होतं, तेव्हा त्यांनी सांगितलं की, ते आता निवडणूक लढू इच्छित नाहीत. पण ते भाजपा प्रवेशाबाबत मला तसं काही बोललेले नाहीत. मी त्यांच्यासोबत अनेक वर्षे काम केले आहे.
- **सुप्रिया सुळे**, खासदार,राकाँ (श.प.)


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

मंगळवार, २१ एप्रिल २०२६ ३




शंभूराजे देसाई हे मला पहिलेपासून वेगळी वागणूक देतात. कोणत्याही कार्यक्रमांना मला बोलावलं जात नाही. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा दौऱ्याच्या पृष्ठभूमीवर आपणास कार्यक्रमासाठी बोलावलेच नाही, फोनही आलेला नाही.
- **महेश शिंदे**, शिवसेना आमदार



संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांची सोमवारी पश्चिम बंगालमधील बिरभूम येथे प्रचारसभा झाली. यावेळी राजनाथसिंह यांचा प्रतिमा देऊन सत्कार करताना भाजपा नेते आणि पदाधिकारी

## लारक द्वीपापासून दूर राहण्याचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत १८ एप्रिल रोजी इराणी गार्ड्सनी भारताच्या दोन जहाजांवर गोळीबार केला. यानंतर भारतीय नौदलाने वेगाने हालचाली करीत होर्मुझजवळ सुरक्षा मजबूत केली. आता पर्शियाच्या आखातात अडकून लारक द्वीपाजवळ जाऊ नका, अशा मार्गदर्शक सूचना केंद्र सरकारने आता भारतीय जहाजांना दिल्या.

भारतीय नौदलाने परवानगी दिल्यास समोर जा. नौदल भारतीय जहाजांच्या सुरक्षेला प्राधान्य देत आहे. सध्या पर्शियन आखातात भारताचे १४ जहाजे अडकलेली आहेत. त्यांना होर्मुझ पार करण्याची प्रतीक्षा आहे. *(वृत्तसंस्था)*

# आयआरजीसीने घेतला इराणचा ताबा

## मेजर जनरल वाहिदी यांचे नियंत्रण

◆ **तेहरान, २० एप्रिल**



इराणमधील आतापर्यंत सुप्तावस्थेत असलेला सत्ता नियंत्रणाची लढाई आता उघडपणे सुरू झाली आहे. इराणचे नियंत्रण पूर्णपणे इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्प्सकडे गेल्याचा दावा अमेरिकी वृत्तपत्र न्यू यॉर्क टाईम्स आणि थिंक टँक इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ वॉरने केला आहे.

आयआरजीसीचे कमांडर मेजर जनरल अहमद वाहिदी आता इराणमधील सर्वांत शक्तिशाली नेते म्हणून समोर आले आहेत. त्यांनी केवळ सैन्यावर नियंत्रण प्रस्थापित केले नाही, तर अमेरिकेसोबत शांततेसाठी होणाऱ्या चर्चांची सूत्रे त्यांच्या निकटवर्तीयांच्या हाती गेली आहेत. या सर्व घडामोडींना सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई यांची मूकसंमती असल्याचे सांगितले जात आहे.

इराणमधील सत्तेचे संतुलन बदलल्याचा थेट परिणाम होर्मुझच्या सामुद्रधुनीवर दिसत आहे. हा सामुद्रमार्ग उघडण्याचा पक्ष इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी घेतला होता. मात्र, आयआरजीसीने तो निर्णयच पलटवला आहे. वाहिदी यांच्या आदेशानेच हल्ले करणाऱ्या वेगवान नौकांच्या माध्यमातून हा मार्ग पूर्णतः रोखला आहे. मागील ४८ तासांत तीन जहाजांना लक्ष्य करण्यात आले.

आयआरजीसीच्या या निर्णयामुळे पर्शियन आखातात शेकडो जहाजे अडकली आहेत. इराणच्या प्रतिनिधी मंडळात सहभागी असलेला कट्टरवादी नेता मोहम्मद बागेर जोलगाद्र याने अब्बास अराघची यांचीच तक्रार केल्याचे वृत्त आहे. मुत्सद्देगिरीत अराघची नरमाईची भूमिका घेत असल्याचा आरोप जोलगाद्र याने केला. त्यामुळे संपूर्ण प्रतिनिधी मंडळ तेहरानला परत बोलवण्यात आले. इराणने नरमाईची भूमिका घेणाऱ्यांचा आवाज दाबला असल्याचे सांगितले जात आहे.

या बदलानंतर अमेरिकेसोबत परिणामकारक वाटाघाटी होण्याची शक्यता पूर्णतः मावळली असल्याचा दावा 'इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी ऑफ वॉर'ने केला. मंगळवारची मुदत समोर असताना युद्धबंदीची शक्यता मावळली असल्याचे या संस्थेचा दावा आहे. अमेरिका आणि इराणमध्ये पुन्हा युद्ध भडकू शकते, अशी शक्यता या संस्थेने वर्तवली. *(वृत्तसंस्था)*



### 'होर्मुझ'मधील वाहतूक ठप्प

**होर्मुझ सामुद्रधुनीताल वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. केवळ इराणी जहाजा त्या मार्गाचा वापर करीत आहेत. मात्र, ते देखील अमेरिकी नाकाबंदी रेषेपर्यंत पोहोचलेले नाहीत. इराणने अमेरिकेसोबत होणारी चर्चेची दुसरी फेरीत सहभागी होण्यास नकार दिल्याचे वृत्त आहे. अमेरिकेच्या मागण्या अवास्तव असल्याचा आरोप इराणने केला. वाटाघाटींमध्ये आयआरजीसी हस्तक्षेप करीत असल्याचे म्हटले जात आहे.**

# रत्न भंडाराच्या यादीत कोणतीही तफावत नाही

### जगन्नाथ मंदिर प्रशासनाची माहिती

◆ **भुवनेश्वर, २० एप्रिल**

पुरी येथील जगन्नाथ मंदिराच्या रत्न भांडारातील मौल्यवान वस्तूंच्या यादीत आतापर्यंत कोणतीही तफावत आढळलेली नाही, अशी माहिती १२ व्या शतकात उभारण्यात आलेल्या या मंदिराच्या प्रशासनाने सोमवारी दिली.

दैनंदिन वापरातील दागिन्यांचा संग्रह असलेल्या 'चलंती भांडार'ची आणि उत्सवांसाठीच्या दागिन्यांचा संग्रह असलेल्या 'बहार भांडार'च्या मौल्यवान वस्तूंची मोजणी सीसीटीव्ही पाळत ठेवून पूर्ण करण्यात आली, तर 'भितर भांडार'ची मोजणी प्रक्रिया सध्या सुरू आहे, अशी माहिती या २५ मार्च रोजी सुरू झालेल्या या प्रक्रियेवर देखरेख करणारे श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाचे मुख्य प्रशासक अरबिंद पढी यांनी दिली.

रत्न भांडारात जतन करून ठेवलेले सोने आणि मौल्यवान रत्नांचे सर्वच दागिने १९७८ मध्ये तयार केलेल्या यादीशी तंतोतंत जुळले आहेत. देवाच्या कृपेने यात कोणतीही तफावत आढळलेली नाही, असे पढी यांनी सांगितले.

चंदन यात्रेमुळे १८ एप्रिलपासून ही प्रक्रिया तूर्तास स्थगित करण्यात आली असून योग्य वेळी ती पुन्हा सुरू होईल, अशी माहिती पढी यांनी दिली. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आणखी किती वेळ लागेल, हे आम्ही सांगू शकत नाही, असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

रत्न भांडाराची यापूर्वीची मोजदाद ४८ वर्षांपूर्वी १९७८ मध्ये ७२ दिवसांत पूर्ण करण्यात आली होती तर यावेळी या प्रक्रियेचे नऊ दिवस पूर्ण झाले आहेत. प्रभूंच्या खजिन्यातील वस्तूंची मोजदाद करण्याचे काम २५ मार्च रोजी सुरू झाले. चंदन यात्रेसारख्या विधींमुळे यात थोडा विराम घेण्यात आला आहे. प्रभूंच्या कृपेने ही प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण होईल, अशी आम्हाला आशा असल्याचे श्रीमंदिर रत्न भांडार तपासणी समितीचे अध्यक्ष, न्या. विश्वनाथ रथ यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

**नॅशनल हेराल्ड प्रकरण**

# सुनावणी पुढे ढकलली

### सत्र न्यायालयाच्या आदेशाला ईडीचे आव्हान

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लॉंडरिंग प्रकरणात ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार देणाऱ्या सत्र न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या ईडीच्या याचिकेवरील सुनावणी दिल्ली उच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांच्या न्यायासनाने पुढील सुनावणी २५ मे रोजी घेण्याचे आदेश दिले आहेत.

ईडीने सत्र न्यायालयाच्या १६ डिसेंबर, २०२५ च्या आदेशाला आव्हान दिले आहे. उच्च न्यायालयाने ईडीच्या याचिकेवर सुनावणी करताना २२ डिसेंबर रोजी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यासह इतर आरोपींना नोटीस बजावली होती. वास्तवात, १६ डिसेंबर २०२५ रोजी, राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरुद्ध ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार दिला होता. राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने म्हटले होते की, एका खाजगी तक्रारीच्या आधारावर ईडीच्या आरोपपत्राची दखल घेतली जाऊ शकत नाही.

**देणगी देणाऱ्या लोकांची फसवणूक झाली**

सत्र न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान, ईडीने म्हटले होते की, काँग्रेस पक्षाला देणगी देणाऱ्या लोकांची फसवणूक झाली होती. देणगी देणाऱ्यांपैकी काहींना तिकिटे देण्यात आली होती. *(वृत्तसंस्था)*

## जामिनासाठी खेडा गुवाहाटी हायकोर्टात

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पवन खेडा यांनी आता आसाममध्ये दाखल झालेल्या एका प्रकरणात अटकपूर्व जामिनासाठी गुवाहाटी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. हे प्रकरण आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान सरमा यांनी दाखल केलेल्या एफआयआरशी संबंधित आहे. ज्यात पासपोर्टबाबत वाद निर्माण झाला आहे.

पवन खेडा यांनी आरोप केला होता की, रिनिकी भुयान सरमा यांच्याकडे अनेक पासपोर्ट आहेत. या वक्तव्यानंतर गुवाहाटी गुन्हे शाखा पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला. या एफआयआरमध्ये भारतीय दंड संहितेच्या अनेक कलमांचा वापर करण्यात आला आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, जर पवन खेडा यांनी आसाममधील अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला, तर त्यांच्या प्रकरणावर निःपक्षपातीपणे विचार केला जाईल. *(वृत्तसंस्था)*

# १०० फूट दरीत बस कोसळली; २१ जणांचा मृत्यू

## टायर फुटला अन् चालकाचे नियंत्रण सुटले

◆ **उधमपूर, २० एप्रिल**

जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात सोमवारी सकाळी एक भीषण अपघात झाला. प्रवासी बसचा एक टायर फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ती १०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात बसचा वरचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. यात २१ प्रवाशांचा मृत्यू झाला तर सुमारे २९ जण जखमी झाले. पोलिस आणि स्थानिक लोकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राम नगर भागातील कागोट गावाजवळ डोंगराळ रस्त्यावर सकाळी १० वाजण्याच्या सुमारास बस वळण घेत असताना हा अपघात झाला. अपघात झाला तेव्हा बस एका दुर्गम गावातून उधमपूरकडे जात होती. अनेक लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून अनेकांची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतकांची संख्या वाढू शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

**क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते**

जखमींच्या म्हणण्यानुसार, बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते आणि ती भरधाव वेगाने धावत होती. कागोट नाल्याजवळ अचानक एक टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस रस्त्यावरून १०० फूट खोल दरीत खाली कोसळली. बस उलटताच त्यात बसलेले जखमी प्रवासी बाहेर फेकले गेले. काहींचे मृतदेह रस्त्यावर विखुरले होते. जखमींना उधमपूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर एका गंभीर जखमीला जम्मू येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विमानाने नेण्यात येत आहे.



**अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत पुरवा**

केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी घटनेची चौकशी करून उधमपूरचे जिल्हाधिकारी मिंगा शेर्पा यांच्याशी संवाद साधला. अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत पुरविण्याचे निर्देश त्यांनी दिले. अपघातग्रस्त बस सार्वजनिक वाहतुकीचे वाहन होते. जखमींवर जीएमसी उधमपूर येथे उपचार सुरू आहेत.

### पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला शोक

**या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शोक व्यक्त केला. ही दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो, अपघातामधील जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना. तसेच पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्यात येईल, असे ट्विट पंतप्रधान मोदींनी केले आहे.**

या घटनेवर काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनीही शोक व्यक्त करीत मृतांना श्रद्धांजली वाहिली. उधमपूर बस अपघाताची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतात्म्यांना शांती मिळावी यासाठी प्रार्थना. शोकग्रस्त कुटुंबांप्रती संवेदना व्यक्त करते तसेच जखमी लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना, असे ट्विट त्यांनी केले. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### तन्वी कोलते 'बिग बॉस मराठी ६'ची महाविजेती



**मुंबई** : महाराष्ट्रभरातील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या 'बिग बॉस मराठी ६'चा आज भव्य महाअंतिम सोहळ्याचा समारोप झाला. सातत्यपूर्ण, दमदार खेळ सादर करत तन्वी कोलते हिने 'बिग बॉस मराठी ६' विजेतेपद पटकावले. सुरुवातीपासूनच प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या तन्वीने अखेर हा किताब आपल्या नावावर करत आपली लोकप्रियता सिद्ध केली. विजेत्या तन्वीला १५ लाख रुपयांची रोख रक्कम आणि ट्रॉफी देण्यात आली. यासोबतच पु. ना. गाडगीळ आणि सन्सकडून १० लाख रुपयांचे ज्वेलरी व्हाउचर देण्यात आले, ज्याचा उपयोग रेवा डायमंडच्या सर्टिफाईड नैसर्गिक हिऱ्यांच्या दागिन्यांसाठी करता येणार आहे. तसेच तुनवाल ई मोटर्सकडून 'लिथीनो प्रो' ही ई-बाईकही तिला बहाल करण्यात आली. विशेष आकर्षण म्हणून रितेश देशमुख आणि 'राज शिवाजी' चित्रपटाच्या टीमकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा सुंदर फोटो भेट देण्यात आला.

### 'नमन राजे' अजय देवगणची पोस्ट चर्चेत

**मुंबई** : रितेश देशमुख लिखित आणि दिग्दर्शित 'राजा शिवाजी' चित्रपटाची सध्या एकच चर्चा आहे. या चित्रपटासाठी बहुआयामी आणि दिग्गज कलाकारांची फळी एकत्र येत आहे. हा भव्य ऐतिहासिक चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी आणि हिंदी भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचा टीझर समोर येताच सोशल मिडीयावर तसेच मनोरंजन विश्वातून अनेकांच्या मनात या चित्रपटाविषयी कुतूहल निर्माण झाले आहे. अनेक कलाकार या चित्रपटाला शुभेच्छा देताना दिसत आहे. दरम्यान, 'तान्हाजी: द अनसंग' या चित्रपटातून मराठ्यांची शौर्यगाथा समोर आणणाऱ्या बॉलीवूड अभिनेता अजय देवगण यानेही 'राजा शिवाजी' चित्रपटाची झलक पाहून 'तान्ह्याचा मुजरा राजे' म्हणत रितेश आणि त्याच्या टीमला शुभेच्छा दिल्यात. भारतीय इतिहासाचा गौरव, त्यातील भावगर्भता आणि भव्यता यांचा संगम असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एका प्रेरणादायी प्रवासावर घेऊन जाणार आहे.

### हर्षा रिछारियाने घेतला संन्यास

**मुंबई** : प्रयागराज येथील २०२५ च्या महाकुंभात भगव्या वस्त्रांतील छायाचित्रांमुळे देशभर चर्चेत आलेल्या अँकर आणि मेकअप आर्टिस्ट हर्षा रिछारियाने अखेर सांसारिक जीवनाचा त्याग करत संन्यास स्वीकारला आहे. रविवारी उज्जैन येथील मंगलनाथ परिसरातील गंगा घाटावर पार पडलेल्या विधीपूर्वक दीक्षेनंतर तिने आध्यात्मिक मार्ग स्वीकारला असून, आता ती 'हर्षानंद गिरी' या नावाने ओळखली जाणार आहे. मूळची भोपाळ येथील रहिवासी असलेली हर्षा रिछारिया सोशल मीडियावर सक्रिय असलेली व्यक्ती म्हणून ओळखली जात होती. अँकरिंग आणि मेकअप आर्टिस्ट म्हणून काम करत असताना ती डिजिटल माध्यमांवरही लोकप्रिय होती. मात्र २०२५ च्या महाकुंभात तिचे भगव्या वस्त्रांतील फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर ती अचानक प्रकाशझोतात आली. काही काळातच ती सर्वात सुंदर साध्वी म्हणून ट्रेंडमध्ये आली, तर तिच्या भूतकाळातील ग्लॅमरस प्रतिमांमुळे तीव्र चर्चा आणि वादही निर्माण झाले आहेत.





पश्चिम बंगालमधील कुचबिहार येथे सोमवारी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांची प्रचारसभा झाली. यावेळी नागरिकांना अभिवादन करताना खडगे

# सुरत हवाला नेटवर्कचा भंडाफोड; दिल्लीतील आप नेत्याशी संबंध

◆ **सुरत, २० एप्रिल**

सुरत पोलिसांनी एका आंतरराज्यीय हवाला नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. हे नेटवर्क कथितरित्या आम आदमी पार्टी (आप) च्या अधिकाऱ्यांशी संबंधित आहे. गुजरातमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी दिल्लीहून सुरतला कुरिअरमार्फत अंदाजे १.२५ कोटी रुपये पाठवण्यात आल्याचा आरोप आहे.

सुरत गुन्हे शाखेचे डीसीपी भावेश रोजिया यांनी सांगितले की, उमरा पोलिस ठाण्याला सोमवारी सकाळी एक गुप्त माहिती मिळाली. त्या माहितीनुसार, दिल्लीतील जनकपुरी येथे राहणारे आप कार्यकर्ते हिमांशू पाहुजाने हवालामार्फत सुरतला मोठी रक्कम पाठवली होती. या माहितीच्या आधारे, पोलिसांनी पाहुजाशी संबंध असलेल्या सुरतचा रहिवासी आकाश मिश्राला चौकशीसाठी बोलावले. गुन्हे शाखेच्या पथकाने त्याचीही चौकशी केली.

**अंगडिया फर्ममार्फत १.२५ कोटी रुपये हस्तांतरित**

गत पाच महिन्यांत हिमांशू पाहुजाने सुरतमधील एका अंगडिया फर्ममार्फत पाच ते सहा व्यवहारांमध्ये अंदाजे १.२५ कोटी रुपये हस्तांतरित केले. पोलिसांनी एका अंगडिया फर्मची ओळख पटवली. यात इतर फर्म्सचाही सहभाग असल्याचा संशय आहे. हा पैसा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी होता, असा संशय आहे. *(वृत्तसंस्था)*

## जपानमध्ये ७.५ तीव्रतेचा भूकंप

◆ **टोकियो, २० एप्रिल**

जपानमध्ये सोमवारी ७.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा जोरदार भूकंप झाला. त्यानंतर किनारी भागांमध्ये त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला आहे. जपान हवामान एजन्सीनुसार, इवाते प्रांत आणि होक्काईडो व आओमोरीच्या काही भागांमध्ये तीन मीटर उंच लाटा उसळल्या.

भूकंपानंतर अधिकाऱ्यांनी लोकांना तत्काळ उंच ठिकाणी जाण्याचे आणि किनारा व नद्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. मदत आणि आपत्कालीन सेवा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत आणि नुकसानीचे मूल्यांकन केले जात आहे. भूकंपाचे धक्के नोंदवल्यानंतर तोहोकू शिंकानसेन बुलेट ट्रेन सेवा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. *(वृत्तसंस्था)*

# भारताला मिळणार समुद्रातील अदृश्य योद्धा

## ● राजनाथसिंह आजपासून जर्मनीच्या दौऱ्यावर ● संरक्षण करार करणार

◆ **नवी दिल्ली, २० एप्रिल**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह मंगळवारपासून तीन दिवसांच्या जर्मनीच्या दौऱ्यावर रवाना होणार आहेत. या दौऱ्यात भारत आणि जर्मनीतील संरक्षण सहकार्य आणखी बळकट करण्यावर भर दिला जाईल. संरक्षण उद्योगाचा कृती आराखडा निश्चित करणे हा या दौऱ्याचा महत्त्वाचा उद्देश आहे. भारत आणि जर्मनीत सहा अत्याधुनिक पाणबुड्यांच्या सौद्यावर मोहोर उमटण्याची शक्यता आहे.

भारत व जर्मनीतील संरक्षण उद्योगाच्या अंतर्गत भविष्यात दोन्ही देश शस्त्रास्त्रे आणि संरक्षण



उपकरणांचा संयुक्त विकास आणि उत्पादन करू शकतील. राजनाथसिंह बर्लिन येथे जर्मनीचे संरक्षण मंत्री बोरिस पिस्टोरियस आणि अतर वरिष्ठ नेत्यांसोबत चर्चा करणार आहेत.

या बैठकांमध्ये संरक्षण उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढवणे, सौन्ही देशांच्या सैन्यातील संबंध बळकट करणे, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ड्रोनसारख्या नवीन तंत्रज्ञान क्षेत्रात सोबत काम करण्यावर भर दिला जाईल. या दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांतील संरक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत संरक्षण उद्योगाशी संबंधित कृती आराखडा आणि संयुक्त राष्ट्रसंघाशी निगडित प्रशिक्षण आणि सहकार्य करारांवर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे.

भारत आणि जर्मनीत सहा अत्याधुनिक डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुड्यांचा सौदा लवकरच आकार घेऊ शकतो. दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य बळकट करण्याच्या उद्देशाने राजनाथसिंह या दौऱ्यावर जाणार आहेत. *(वृत्तसंस्था)*

### पाणबुडी प्रकल्प केंद्रस्थानी

**भारत प्रोजेक्ट-७५ इंडियाच्या अंतर्गत सहा आधुनिक पाणबुड्यांच्या निर्मितीची जोरदार तयारी करीत आहे. जर्मन कंपनी थिसनकूप मरिन सिस्टिमसोबत हा सौदा अंतिम रूप घेत आहे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड आणि या जर्मन कंपनीने जून २०२३ मध्ये एका करारावर स्वाक्षरी केली होती. राजनाथसिंह यांच्या या दौऱ्यात तंत्रज्ञान हस्तांतरण आणि औद्योगिक सहकार्यावर तपशीलवार चर्चा होईल.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# अधमांचा उधम रोखा!

सातत्याने संकटांना सामोरे जाण्याची वेळ येऊ लागली की त्याची सवयच होऊन जाते. संकटे हा जीवनशैलीचाच एक भाग वाटू लागतो आणि सततच्या संकटांची सवय झाली की त्याचे गांभीर्यही कमी होऊ लागते. काही संकटे साधीसुधी नाहीत, तरीही त्याबाबतच्या सावधगिरीचे भान मात्र अद्याप म्हणावे तितक्या गांभीर्याने समाजात रुजलेले दिसत नाही. गेल्या काही वर्षांत सातत्याने आदळणाऱ्या काही बातम्यांची मुळे या संकटामध्ये रुतलेली असावीत असे वाटण्याजोगी परिस्थिती आता मात्र प्रकर्षाने जाणवू लागली आहे आणि समाजाचा, कुटुंबांचा महत्त्वाचा घटक असलेल्या महिलांपर्यंत या संकटाचे पाश पोहोचू लागले आहेत. खरे म्हणजे, नाशिक जिल्ह्यातील भोंदू कॅप्टन अशोक खरातच्या अटकेनंतर एकामागून एक उजेडात येत असलेल्या गुन्ह्यांतून लैंगिक अत्याचाराच्या कहाण्या समोर येऊ लागल्यावर या संकटाची जाणीव समाजात तीव्र होऊ लागली असली, तरी त्याची सुरुवात मात्र, त्याआधी कित्येक दशकांपासूनच झालेली असावी. लोकांच्या श्रद्धा आणि अंधश्रद्धांच्या समजुतींमागील एक धूसर सीमारेषा पुसून टाकून अंधश्रद्धा म्हणजेच खरी श्रद्धा असे भासविण्याच्या धंद्यातून या संकटाने शिरकाव केला असला, तरी अलिकडच्या काही घटना पाहता, त्याचे रूप केवळ लैंगिक अत्याचार, आर्थिक गुन्हेगारी, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यापुरते सीमित राहिलेले नसून त्याला कट्टर धर्मवेडाचीही किनार असल्याचे दिसू लागले आहे. खरात नावाच्या भोंदूच्या कारवाया अंधश्रद्धांचा स्वार्थी फायदा उपटून लैंगिक विकृतीचे कंड शमविण्यापुरत्या आणि लोकांची आर्थिक लुबाडणूक करण्यापुरत्या मर्यादित असतील, पण विदर्भाच्या अमरावतीमधील परतवाडा-अचलपुरातून उघडकीस आलेल्या लैंगिक शोषणाच्या विकृत गुन्हेगारीने त्या मर्यादाही ओलांडल्याचे दिसत आहे. या गुन्ह्याच्या तपासातून उघडकीस येत असलेल्या तपशिलांचा विचार केल्यास, धर्मद्वेषाच्या आणि धर्मप्रसाराच्या कट्टरतेचा एक व्यापक कट आखला गेल्याच्या अगोदरपासूनच व्यक्त होत असलेल्या शंकेला बळ मिळत असल्याच्या भावनेने संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले आहे. अचलपुरातील एका १९ वर्षांच्या तरुणाविरोधात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपशील अस्वस्थ करणारा तर आहेच, पण या भयंकर संकटाचे संकेत देणारेही आहे. गेल्या काही दिवसांत समाजमाध्यमांच्या वेगवेगळ्या मंचावरून असंख्य अश्लील चित्रफिती फैलावत गेल्या आणि लैंगिक विकृतीचा कंड शमविताना धार्मिक कट्टरतावादाच्या कटाचे संकेतही स्पष्ट होऊ लागले. जवळपास १८० युवती या लैंगिक विकृतीची शिकार झाल्याची शंका व्यक्त होत असून त्यापैकी अनेकजणी अल्पवयीन असल्याचे सांगण्यात येते. या युवतींना समाजमाध्यमाच्या मंचावरून आपल्या प्रेमाच्या आभासी जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणे व त्याच्या चित्रफिती समाजमाध्यमांवरच प्रसृत करण्याची धमकी देऊन त्यांच्यावर धार्मिक बाबींची सक्ती करण्याचा संशयही व्यक्त केला जात आहे. खरात प्रकरणापाठोपाठ असेच एक प्रकरण नाशिकमधील नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत उघडकीस आले होते.

गेल्या सुमारे दोन वर्षांत महाराष्ट्रात महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या वाढत्या घटनांनी समाजमन अस्वस्थ झाले आहे. केवळ बेपत्ता होणाऱ्या महिला-मुलींची वाढती संख्या एवढे एकच या अस्वस्थतेचे कारण नाही. प्रत्येक वेळी एखादी मुलगी हरवते, तेव्हा तिच्या सुरक्षिततेची चिंता, कुटुंबीयांची हतबलता आणि पोलिस यंत्रणेवर वाढणारा ताण या सर्व बाजू स्पष्टपणे दिसून येत होत्या. आता मात्र या गंभीर प्रश्नाकडे पाहताना आणखी एक वेगळाच मुद्दा पुढे येऊ पाहात आहे. काही घटना, काही आरोप आणि काही राजकीय विधानांमुळे महिला व मुलींचे बेपत्ता होणे आणि काही कट्टरवाद्यांकडून आखल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या कटाच्या कहाण्या यांच्या संबंधींचीही चर्चा सुरू झाली आहे. वास्तवाच्या कसोटीवर हे संबंध किती टिकतात, हे अद्याप पुरेसे स्पष्ट झालेले नसले, तरी महिला व मुलींचे बेपत्ता होणे आणि नाशिक, परतवाडा येथील काही घटनांतून समोर येणारे धागेदोरे जोडल्यास याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज मात्र आता अधोरेखित होऊ लागली आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत सुमारे ९४ हजार महिला व मुली बेपत्ता झाल्याची आकडेवारी जाहीर झाली आहे. त्यापैकी सुमारे ७२ टक्के प्रकरणांचा छडा लागला असला तरी अद्याप काही महिला-मुली मात्र सापडलेल्या नाहीत. याची कारणे शोधताना संबंधित यंत्रणा आजवर काही पठडीबाज मीमांसा करताना दिसत असत. या बेपत्ता होणाऱ्यांपैकी काही प्रकरणे प्रेमसंबंधाशी जोडली गेलेली असतात, तर काही प्रकरणांत घरगुती वादातून महिला-मुली घराबाहेर पडत असल्याचे निष्कर्ष निघतात. अत्याचार, दडपण अशा कारणांमुळे घर सोडून निघून जाण्याची मानसिकता एखाद्या क्षणी बळावते, असेही या यंत्रणांना वाटत होते. काही महिला बेपत्ता होण्याच्या प्रकरणांत मानवी तस्करी करणाऱ्या व महिलांना अनैतिक धंद्यांच्या जाळ्यात ओढणाऱ्या टोळ्यांचा सहभाग असावा असेही निष्कर्ष काढले गेले होते. यवतमाळमधील प्रकरणात, मुलींची तस्करी करून त्यांना अनैतिक व्यवसायात ढकलण्याचा कट असावा अशीही चर्चा होती. नाशिकमधील बहुराष्ट्रीय कंपनीतील धार्मिक कंगोरे समोर येऊ लागल्याने आता मात्र, या प्रकरणांच्या तपासाच्या शोधास धार्मिक कट्टरतावादाच्या दिशेने नेण्याची गरज निर्माण झाली आहे. किशोरवयीन मुलींच्या बाबतीत प्रेमसंबंधातून घरातून पळून जाण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. यामध्ये धर्मांतराचा घटक काही वेळा नंतर येऊ शकतो; परंतु ते मूळ कारण नसते. म्हणजेच, धर्मांतर हे मुलींच्या किंवा महिलांच्या बेपत्ता होण्याचे कारण नसले, तरी यानंतरचा परिणाम म्हणून याकडे डोळेझाक करता येणार नाही, असा इशारा देणारी अनेक प्रकरणेही अलिकडे उघडकीस आली आहेत. महाराष्ट्रातील अनेक भागांत मानव तस्करीचे जाळे अजूनही सक्रिय आहे. गरीब कुटुंबांतील मुलींना नोकरीच्या आमिषाने बाहेर नेले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. काही ठिकाणी अल्पवयीन मुलींचे जबरदस्तीने लग्न लावले जाते. शहरी भागांत सोशल मीडियाद्वारे ओळखी होतात, विश्वास संपादन केला जातो आणि त्यानंतर फसवणूक केली जाते. घरगुती हिंसा, शिक्षणातील खंड आणि आर्थिक असुरक्षितता हे देखील महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व वास्तव समस्या असल्या तरी धर्मांतराच्या मुद्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, अशी परिस्थिती मात्र आता दिसू लागली आहे. त्याकडे दुर्लक्ष करून कालपरवापर्यंतच्या पठडीबाज कारणांनाच वास्तव समस्या मानून उपाययोजना केल्यास त्याची दिशा भरकटण्याचीही शक्यता आता नजरेआड करता येणार नाही. अर्थात, प्रत्येक प्रकरणात धर्मांतराचे कारण असेलच असे नसले तरी एकही घटना धर्मांतराशी संबंधित नाही असेही म्हणता येणार नाही. त्यामुळे, 'बेपत्ता' प्रकरणांकडे केवळ शोधमोहीम म्हणून नव्हे, तर संभाव्य गुन्ह्याच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. यवतमाळमधील राळेगाव तालुक्यातील ३४ आदिवासी मुली गेल्या काही महिन्यांत बेपत्ता झाल्या असून त्यांची विक्री करून धर्मांतर करण्यात आल्याच्या आरोपामुळे या भीतीत भर पडली आहे. या संदर्भातील तक्रारीनंतर पोलिसांनी गोळा केलेल्या काही कथित ध्वनिफितींमधून हाती आलेले धागेदोरे अस्वस्थ करणारे आहेत. गरीब आदिवासी मुलींना पैशांचे आमिष दाखवून त्यांची तस्करी करणे, अल्पवयीन मुलींची प्रौढ पुरुषांसोबत लग्ने लावून देणे व धर्मांतर करणे असे प्रकार घडत असल्याचा आरोप केला जात आहे. नागपुरातही काही युवतींचे लैंगिक शोषण करून धर्मांतर करण्याचा प्रयत्न झाल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार गेल्या काही वर्षांपासून सुरू असावा असा पोलिसांचाही कयास आहे. त्यामुळे लैंगिक अत्याचारतून महिलांचे शोषण करणे हा धर्मांतराच्या सक्तीचा नवा कट आखला गेला असावा या भीतीने समाज अस्वस्थ आहे. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनात सक्तीच्या धर्मांतराविरोधातील विधेयक संमत झाले आहे. त्याचे कायद्यात रूपांतर होण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अशी किती प्रकरणे पुढे येत राहणार ही भीती मात्र समाजाला सतावते आहे. समाजाला निर्भय बनवायचे असेल तर या साऱ्या अधमांचा उधम रोखलाच पाहिजे! ▌

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# हंगेरीतील सत्तांतराचा अमेरिकेला धक्का

हंगेरीचे मावळते पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांनी सत्तेचा वापर करून माध्यमे, न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा यांच्यावर प्रभाव टाकत जवळपास १६ वर्षे सत्तेवर पकड कायम ठेवली. त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्या राजकीय कार्यक्रम पत्रिकेमध्ये साम्य आढळते, ही बाबही अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. ट्रम्प यांनी ऑर्बन यांच्या पुनर्निवडीसाठी जोरदार पाठिंबा दर्शविला होता. अगदी इराण युद्धाच्या पृष्ठभूमीवरही अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांना हंगेरीच्या बुडापेस्ट येथे पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि, ऑर्बन यांच्या पराभवाने वेगळेच वास्तव अधोरेखित केले. जागतिक संघर्षांच्या छायेत परदेशातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची अमेरिकेची क्षमता मर्यादित होत चालली आहे. या निकालाचे व्यापक परिणाम होणार हे निश्चित. ऑर्बन हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांचे युरोपमधील निकटचे सहयोगी मानले जात होते. त्यांनी युरोपीय महासंघाकडून युक्रेनला मिळणाऱ्या मदतीत अडथळे निर्माण केले होते. त्यांच्या पराभवामुळे युरोपीय राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या निकालाचे स्वागत अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांकडून करण्यात आले. काही नेत्यांनी तर इतर लोकशाही देशांच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या धोरणावरच टीका केली. लोकशाही व्यवस्थेत अखेरीस जनतेचीच भूमिका निर्णायक ठरते, असा व्यापक संदेश यावरून जातो.

लोकशाहीमध्ये कुणीही 'अपराजित' नसतो. वेळ आल्यास जनता सत्तांतर घडवून आणते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ट्रम्प आणि पुतिन यांच्यासारख्यांचा पाठिंबा, हंगेरीतील माध्यमे ताब्यात, सत्तेचे केंद्रीकरण असे सर्व प्रकार असतानाही जनतेने ऑर्बन यांची १६ वर्षांची सत्ता उलथवून टाकली. जनतेला गृहीत धरणे चुकीचे असते, हा संदेश हंगेरीच्या निवडणुकीने जगाला दिला. हंगेरीच्या राजकारणात नुकत्याच घडलेल्या सत्तांतराने युरोपीय राजकीय पटावर एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवळपास १६ वर्षे सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बन यांच्या नेतृत्वाखालील फिडेज या पक्षाला पराभवाचा धक्का बसणे हा केवळ निवडणूक निकाल नसून दीर्घकाळ एकाच विचारसरणीच्या वर्चस्वाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद मानावा लागेल. ऑर्बन यांच्या कारकीर्दीमध्ये 'बिनउदारमतवादी लोकशाही' ही संकल्पना पुढे आली. राष्ट्रवाद, सांस्कृतिक परंपरा आणि स्थलांतरविरोधी भूमिका या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली राजकीय घडी बसवली. युरोपीय महासंघासोबतचे त्यांचे संबंध अनेकदा तणावपूर्ण राहिले. न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप, माध्यम स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि नागरी स्वातंत्र्यांवरील मर्यादा यामुळे हंगेरीवर वारंवार टीका झाली; मात्र देशांतर्गत पातळीवर त्यांनी



आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि पारंपरिक मूल्यांचे रक्षण यांची मांडणी करून जनाधार टिकवून ठेवला. या निवडणुकीमध्ये विरोधकांनी प्रथमच एकसंध आघाडी उभी केली. विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येऊन सत्ताधारी व्यवस्थेविरुद्ध लढले. या नव्या राजकीय पर्यायाने मतदारांना 'पर्याय' उपलब्ध करून दिला, जो गेल्या अनेक वर्षांमध्ये नव्हता.

निवडणुकीमध्ये शहरी मध्यमवर्ग, तरुण मतदार आणि युरोपीय मूल्यांना पाठिंबा देणारा वर्ग या बदलाच्या बाजूने उभा राहिला. महागाई, भ्रष्टाचाराचे आरोप आणि लोकशाही संस्थांवरील विश्वासाचा अभाव हे मुद्दे निर्णायक ठरले. हंगेरीतील मतदारांनी दिलेला कौल हे केवळ सत्तांतर नाही, तर संतुलनाच्या शोधाची प्रक्रिया आहे. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या वर्चस्वामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, सत्तेचे केंद्रीकरण आणि पर्यायांचा अभाव या घटकांनी मिळून बदलाची पायाभरणी केली. सत्ताधाऱ्यांनी माध्यमे आणि संस्थांवर प्रभाव टाकला असला, तरी डिजिटल माध्यमे आणि सामाजिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्ममुळे माहितीचे पर्यायी स्रोत उपलब्ध झाले. यामुळे जनमत तयार करण्यात पारंपरिक माध्यमांच्या प्रभावाला मर्यादा आल्या. नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आव्हानांची कमतरता नाही. आर्थिक स्थैर्य टिकविणे, युरोपीय महासंघाशी संबंध सुधारणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही संस्थांवरचा विश्वास पुनर्स्थापित करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असेल. विविध विचारसरणींच्या आघाडीला एकत्र ठेवणे हेही सोपे काम नाही. अंतर्गत मतभेद आणि धोरणात्मक विसंगती यामुळे सरकार अस्थिर होण्याची शक्यता कायम राहील. हंगेरीचा हा राजकीय बदल जागतिक पातळीवरही महत्त्वाचा संदेश देतो. लोकशाहीमध्ये कितीही मजबूत वाटणारी सत्ता असली, तरी जनतेचा कौल अंतिम असतो. राष्ट्रवाद आणि केंद्रीकरणाच्या राजकारणाला मर्यादा असतात आणि वेळोवेळी लोकशाही स्वतःचे संतुलन स्वतः साधते, हे या निकालाने अधोरेखित केले.

हंगेरीतील सत्तांतर केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता युरोप तसेच जगातील लोकशाही प्रक्रियेतील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबिंब आहे. आता खऱ्या अर्थाने कसोटी नव्या सत्ताधाऱ्यांची आहे. ते बदलाची आशा पूर्ण करतात की पुन्हा जुन्याच चक्रात अडकतात, हे येणारा काळच ठरवेल. तिस्झा पक्षाचे नाव आणि 'मॅग्यार' हे आडनाव हंगेरीच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडलेले आहे. म्हणजेच ऑर्बन यांची व्यवस्था संपवणारी शक्ती बाहेरून आली नव्हती, तर हंगेरीच्या आतून, त्याच राष्ट्रवादी भावनेतून उभी राहिली. हंगेरीतील सत्तांतराचा शेवटचा टप्पा समजून घेताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. ही केवळ निवडणुकीची कथा नाही तर समाज, विचारसरणी आणि राजकीय मर्यादांची कहाणी आहे. ऑर्बन यांची दीर्घकाळ टिकलेली सत्ता केवळ संस्थात्मक नियंत्रणावर आधारित नव्हती तर तिच्या पाठीशी एक खोल सामाजिक आधार होता. साम्यवादानंतरच्या काळात हंगेरीमध्ये उदारमतवादी बदल झाले; पण त्या बदलांनी सर्वांना समान लाभ दिला नाही. अनेकांसाठी तो काळ अस्थिरतेचा, विषमतेचा आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचा होता. त्यामुळे 'मजबूत राष्ट्रवादी राज्य' ही कल्पना लोकांना सुरक्षिततेची हमी देणारी वाटू लागली.

ऑर्बन यांनी याच भावनेचा अचूक वापर केला. त्यांनी विरोधकांना व्यक्ती म्हणून नव्हे, तर व्यवस्था म्हणून उभे केले. ते केवळ युरोपियन महासंघाचे केंद्र नव्हते, तर एका संपूर्ण व्यवस्थेचे प्रतीक होते; मात्र २०२२ नंतर परिस्थिती बदलू लागली. युक्रेन युद्धामुळे अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आला. रशियन ऊर्जेवर अवलंबून असलेल्या हंगेरीमध्ये महागाई २५ टक्क्यांवर गेली, चलन घसरले आणि लोकांचे वास्तविक उत्पन्न कमी झाले. युरोपीय महासंघाने सुमारे ३० अब्ज युरोचा निधी रोखल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली. ऑर्बन यांनी मतदारांशी केलेला एक प्रकारचा अघोषित करार आता ढासळू लागला. शेजारी देशांची अर्थव्यवस्था पुढे जात असताना हंगेरी मागे राहू लागले. त्यातच सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांची वाढती संपत्ती आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांनी लोकांमध्ये असंतोष वाढवला. याच पृष्ठभूमीवर पीटर मॅग्यार यांचा उदय झाला आणि हेच ऑर्बन यांच्या व्यवस्थेसाठी सर्वात मोठे आव्हान ठरले. मॅग्यार हे बाहेरून आलेले विरोधक नव्हते तर त्या व्यवस्थेतीलच होते. त्यामुळे त्यांचा आरोप अधिक विश्वासार्ह ठरला. ही व्यवस्था भ्रष्ट आहे आणि मी ती आतून पाहिली आहे, हा त्यांचा सूर मतदारांना आश्वासक वाटला. त्यातूनच पुढचे सत्तांतरनाट्य घडून आले. ▌

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# इंधन टंचाईवर इलेक्ट्रिक वाहन पर्याय

भविष्याचा वेगवान प्रवास आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न हा केवळ सोयीपुरता राहिलेला नाही तर तो पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक आरोग्य यांच्याशी थेट जोडलेला आहे. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, वाहनांची वाढती संख्या यामुळे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, पेट्रोल, डिझेल संकट यांसारख्या समस्या गंभीर होत आहेत. या पृष्ठभूमीवर ई-बस आणि ई-बाईक यांनी केवळ पर्यायी नव्हे तर आवश्यक उपाय म्हणून स्वतःचे महत्त्व सिद्ध केले आहे. बदलत्या काळाची गरज पारंपरिक पेट्रोल-डिझेल वाहनांवर अवलंबून असलेली वाहतूक व्यवस्था आता पर्यावरणासाठी मोठा धोका ठरत आहे. हवामान बदलाचे दुष्परिणाम, उष्णतेची वाढ, अनियमित पाऊस आरोग्याच्या समस्या या सर्वांचा मूळ संबंध प्रदूषणाशी आहे. त्यामुळेच शाश्वत विकासाच्या दृष्टीने इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे ही काळाची गरज बनली आहे. ई-बस आणि ई-बाईक या केवळ नवीन तंत्रज्ञानाचे प्रतीक नसून त्या पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय आहेत.

केंद्र व राज्य सरकारांनी आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ई-बस या पूर्णपणे इलेक्ट्रिक ऊर्जेवर चालतात. त्यामुळे त्यातून कार्बन डायऑक्साईड किंवा इतर घातक वायूंचे उत्सर्जन होत नाही. शहरांतील प्रदूषण कमी करण्यासाठी ई-बस अत्यंत प्रभावी ठरत आहेत. ई-बस पारंपरिक बसच्या तुलनेत खूपच कमी आवाज करतात. त्यामुळे शहरी भागात शांतता राखण्यास मदत होते. ई- बाईक, कार बसची सुरुवातीची किंमत जास्त असली तरी दीर्घकालीन दृष्टीने त्यांचा खर्च कमी असतो. इंधन खर्च, देखभाल खर्च कमी असल्यामुळे सामान्य नागरिकांना तसेच नगरपालिकांना मोठा आर्थिक फायदा होतो. अक्षय्य तृतीयेच्या मूहूर्तावर हजारो ग्राहकांनी इलेक्ट्रिक वाहनांना पसंती दिली आहे. ऑटोरिक्षाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना डिझेल व पेट्रोल टंचाई व दरवाढीचा फटका दिवसेंदिवस बसत आहे. एक किलोमीटर अंतरासाठी ऑटोचालक वीस रुपये भाडे घेतात. त्या तुलनेत ई-रिक्षाचे भाडे कमी आहे. त्याचा फटका पेट्रोल, डिझेलवर चालणाऱ्या ऑटोरिक्षांना बसला आहे. भारतातील ईव्ही क्रांतीमध्ये दोन आणि तीन चाकी वाहनांचा वाटा सर्वाधिक आहे.

केंद्र व राज्य सरकारने पीएम ई-ड्राईव्हसारख्या योजनांमुळे सबसिडी आणि पायाभूत सुविधा (चार्जिंग स्टेशन) वाढवण्यावर भर दिला आहे. देशात सार्वजनिक चार्जिंग स्टेशनच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. वाढत्या मागणीसोबतच, बॅटरीची किंमत, चार्जिंग स्टेशनची अपुरी उपलब्धता आणि वाहनांच्या उच्च सुरुवातीच्या किमती ही काही प्रमुख आव्हाने अजूनही ग्राहकांसमोर आहेत. चार्जिंग नेटवर्कच्या विस्तारामुळे नवीन मॉडेल्सच्या लाँचमुळे हा कल कायम राहण्याची शक्यता आहे. बुलढाणा एसटी आगारात १७ ई-बसेस प्रवासी सेवेत दररोज धावतात. या बसेस अमरावती, अकोला, जालना, छत्रपती संभाजी नगर जाणे येणे साधारण सहाशे-सातशे किमीपर्यंत प्रवास करतात. या बसेस वातानुकूलित असल्याने प्रवास भाडे दुप्पट आहे. तसेच कोणतीही प्रवास सवलत या बसमध्ये नाही. त्यामुळे सर्वसामान्याच्या खिशाला परवडणारी नसल्याने कमी प्रवासी प्रवास करीत असल्याने सध्या तरी तोट्यात बसेसचा प्रवास सुरू आहे. या बसेसचे भाडे लालपरी, शिवशाही बस इतकेच ठेवा अशी मागणी प्रवासी सेवा मंडळाने व प्रवाशांनी केली आहे. असे असले तरी भविष्यात इंधनाची टंचाई बघता ईव्ही वाहनांना लोकांची पसंती आहे. त्याचे अनेक फायदेही आहेत. इलेक्ट्रिक वाहने ही खूप उत्तम निवड आहे. विशेषतः आपण ज्या वातावरणात राहतो त्यासाठी व सभोवतालच्या लोकांसाठी ती महत्त्वाची आहे. येणाऱ्या काळात वाहतूक हे एक मोठे शाश्वत आव्हान आहे. त्यामुळे निर्माते आणि आपल्यासारखे लोक इलेक्ट्रिक फ्लीट वाहनांकडे वळण घेत मोठी भूमिका बजावू शकतात. पेट्रोल किंवा डिझेलवरील वाहनांच्या तुलनेत या वाहनांचा दैनंदिन खर्च व मेंटेनन्स खर्च खूप कमी असतो. सामान्य कारच्या तुलनेत ईव्हीचा मेंटेनन्स खर्च सुमारे ५० टक्के कमी असतो. इलेक्ट्रिक वाहने आरामदायी व अधिक सहज ड्रायव्हिंगचा अनुभव देतात. बॅटरीचे वजन वाहून नेण्यासाठी सस्पेंशन मजबूत असले पाहिजे. गोंगाट नसल्यामुळे चालवताना आरामदायक वाटते. मुख्य मुद्दा प्रदूषणाचा आहे. जगभरातील शहरे प्रदूषणाशी लढत असताना भारतही त्याला अपवाद नाही. सध्या जग हवामानविषयक आव्हानांना सामोरे जात असताना, भविष्यात अशी वेळ येईल की, देशातील काही भाग विशेषतः मोठ्या शहरांमध्ये शून्य उत्सर्जन झोन असतील. रस्त्यावर वाहताना इलेक्ट्रिक कार शून्य उत्सर्जन देतात. ईव्ही कोणतेही उत्सर्जन करत नाही. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहने पर्यावरणपूरक आहेत आणि पुढील इंधनाचा धोका पाहता लोकांची या वाहनांना पसंती आहे. ▌

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# रोजगारातील संधी आणि दर्जेदार रोजगार!

'रायटर'चे भारताच्या आर्थिक प्रगतीच्या संदर्भात गेल्या आर्थिक वर्षासाठी केलेल्या सर्वेक्षणामध्ये या कालावधीत भारताची आर्थिक प्रगती सुमारे आठ टक्के असल्याचे आवर्जून नमूद केले असतानाच, तुलनेने रोजगार संधी कमी प्रमाणात असल्याचेही अधोरेखित केले आहे. मात्र, याच सर्वेक्षणातील तपशिलात नमूद केल्यानुसार, सध्या भारतात रोजगार संधींची कमतरता नसून विद्यार्थी-युवकांसाठी त्यांच्या इच्छा-अपेक्षांनुरूप रोजगार मिळत नसल्याचे प्रामुख्याने लक्षात येते. या मुद्यावर विशेष भर देण्यात आला असून, यातूनच दर्जेदार रोजगारांची उपलब्धता नसणे, हा नवा व महत्त्वाचा मुद्दा चर्चेला आला आहे. याच संदर्भात 'प्राईस'च्या एका अभ्यासानुसार, सध्या देशात नोकरी-रोजगार करणाऱ्या व विविध पदांवर कार्यरत असणाऱ्यांपैकी लक्षणीय संख्येतील म्हणजेच, सुमारे ४० टक्के अधिकारी-कर्मचारी हे त्यांच्या प्रचलित नोकरी-रोजगाराच्या संदर्भात समाधानी नाहीत. या कर्मचाऱ्यांच्या असमाधानी असण्याचे मोठे व महत्त्वाचे कारण म्हणजे, त्यांना मिळणारे पगार-वेतन आणि फायदे त्यांच्या अपेक्षेनुरूप नाहीत. अशी भावना असणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीय स्वरूपात व सुमारे ७४ टक्के इतकी या अभ्यासात नमूद करण्यात आली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

त्याखालोखाल आपल्या सध्याच्या नोकरी-रोजगाराबद्दल समाधानी नसणाऱ्यांपैकी १४ टक्के जणांनी पगार-वेतनातील अनियमितता, तर सहा टक्के कर्मचाऱ्यांनी त्यांना व्यवस्थापनातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सामाजिक सुरक्षाविषयक तरतुदी पुरेशा नसल्याचे स्पष्ट केले आहे. यासंदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सकृद्दर्शनी राहत्या घरापासून कार्यालय वा कामाचे ठिकाण यामधील वाढते अंतर व त्यासाठी दररोज ये-जा करण्यासाठी लागणारा मोठा कालावधी व परिश्रम या मुद्यांचा उल्लेख प्रतिसाद देणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून या अभ्यासात झालेला नाही. असे असले, तरी भारतातील कर्मचारी-कामगारांपुढील प्रमुख व जिव्हाळ्याचे मुद्दे मात्र यातून स्पष्ट होतात.

वर नमूद केलेले समस्यावजा मुद्दे हे केवळ असंघटित क्षेत्रातील अथवा मध्यम स्वरूपातील उद्योग-आस्थापनांमध्ये काम करणाऱ्यांशीच संबंधित आहेत, असे नाही. उलट, संघटित क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना पण या समस्यांचा सामना करावा लागतो, असे स्पष्ट झाले आहे. अभ्यासातील निष्कर्षात नमूद केल्यानुसार प्रस्थापित उद्योगातील काम करणाऱ्या व भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, ग्रॅच्युइटी यांसारखे वेतनासह लाभ मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनासुद्धा त्यांना मिळणारे वेतन व त्याच्याशी निगडित फायदे त्यांच्या अपेक्षेपेक्षा कमी वाटतात. अभ्यासात नमूद केल्याप्रमाणे, अशा कर्मचाऱ्यांची टक्केवारी सुमारे ३५ टक्के आढळून आली. त्याचदरम्यान, देशांतर्गत संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे २५ टक्के कर्मचाऱ्यांना अद्याप आरोग्य व सामाजिक सुरक्षाविषयक फायदे अद्याप मिळत नसल्याचे दिसून येते. यामुळे या कामगार-कर्मचाऱ्यांना उदरनिर्वाहाचे साधन तर मिळते. पण, त्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक गरजांची पूर्तता होत नसल्याची भावना त्यांच्यामध्ये कायमस्वरूपी राहते. या सर्व मुद्यांवरून देशांतर्गत कर्मचारी-कामगार म्हणून काम करणाऱ्यांमध्ये प्रचलित अपेक्षांनुसार त्यांना मिळणारे वेतन, इतर सोयी व अप्रत्यक्ष आर्थिक फायदे इ. संदर्भात असमाधान असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळेच या मंडळींचा स्वाभाविक कल हा केवळ नोकरी-रोजगार मिळविणेच नव्हे, तर त्याच्या जोडीला सध्या मिळणाऱ्या पगारापेक्षा अधिक वेतन-पगार व फायदे मिळणे यावर असतो. कर्मचाऱ्यांच्या नोकरीतील बदलांच्या संदर्भात हे एक महत्त्वाचे कारण ठरते. याच्याच जोडीला नोकरी-रोजगार मिळाल्यानंतर पदोन्नतीसह प्रगती व त्यातून पगारवाढ यावर कंपन्यांमधील प्रचलित कर्मचाऱ्यांचा स्वाभाविकपणे भर असतो. ज्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कामकाज व क्षमतेनुसार त्यांना पगारवाढ व पदोन्नती दिली जाते, अशा ठिकाणी कर्मचारी साधारणतः तुलनेने अधिक वा बरेचदा दीर्घकालीन स्वरूपात कायम राहतात. यातून असे कर्मचारी व कंपनी या उभयतांची प्रगती होत जाते.

त्यामुळेच अशा मूलभूत व महत्त्वाच्या मुद्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कंपनी व कर्मचारी या उभयतांना फायदेशीर निर्णय घेऊन त्याची दीर्घकालीन व धोरणात्मक स्वरूपात अंमलबजावणी करणे उभयपक्षी फायदेशीर ठरू शकेल. यातून कंपनी-व्यवस्थापनाला कार्यक्षम कामगार-कर्मचारी, तर कर्मचाऱ्यांना समाधानकारक रोजगार संधी मिळू शकतील.

यासाठी अर्थातच, संबंधित कंपनी व उद्योगाचा आर्थिक-व्यावसायिक विकास होण्याच्या जोडीलाच स्थायी स्वरूपात आर्थिक विकास साधून, त्यातून कामगार-कर्मचाऱ्यांना दीर्घकालीन स्वरूपात फायदे होण्यासाठी पुढील उपाययोजनांचा विचार करता येईल.

**शिक्षण व कौशल्याला प्रगत तंत्रज्ञानाची साथ** : आपल्याकडे शिक्षणाची सांगड प्रामुख्याने शैक्षणिक पात्रता व अभ्यासक्रमाशी घातली जाते. विद्यार्थ्यांपासून विद्यापीठापर्यंत साधारणपणे हीच भूमिका असते. या मानसिकतेला कौशल्य विकासाची जोड देऊन प्रचलित पात्रताधारक विद्यार्थ्यांना कौशल्यप्रवण व रोजगारक्षम बनविणे खऱ्या अर्थाने आवश्यक आहे.

**रोजगारक्षम उद्योग-व्यवसायांना चालना व प्राधान्य देणे** : प्रत्येक उद्योग-व्यवसायातून रोजगारनिर्मिती होत असते. यातील रोजगारनिर्मितीचे प्रमाण कमी-अधिक होऊ शकते. मात्र, तुलनेने मोठ्या प्रमाणात व स्वरूपात रोजगारनिर्मितीसाठी रोजगाराभिमुख व अधिकाधिक रोजगारप्रवण उद्योग-व्यवसायांना चालना देणे गरजेचे ठरते. यातून पुढे अनुभवी उमेदवार-कर्मचाऱ्यांना त्यांच्या इच्छेनुसार, म्हणजेच दर्जेदार-मनाजोगते रोजगार मिळू शकतात, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे.

**कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व विकास** : प्रचलित व नव्याने येणाऱ्या, रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देऊन त्यांचा कौशल्यांसह गुणात्मक विकास करणे फार महत्त्वाचे असल्याने, प्रत्येक व्यवस्थापन व व्यवस्थापकांनी यावर भर देणे महत्त्वाचे ठरते. यातूनच कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता व उद्योगाची विकास क्षमता या उभयतांची वाढ होते.

**धोरणात्मक निर्णय व अंमलबजावणी** : उद्योगांतर्गत व्यवसाय प्रक्रियेसाठी आवश्यक अशा प्रचलित व प्रस्तावित गरजा लक्षात घेऊन, त्याची पूर्तता करण्यासाठी कर्मचाऱ्यांना सक्षम व प्रेरित होऊन कार्यरत होण्यासाठी व्यापक स्वरूपात व कंपनी स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी व्हायला हवी. तसे नियोजन व सातत्यपूर्ण प्रयत्न फार महत्त्वाचे ठरतात. आज नव्याने नोकरी-रोजगार क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या नव्या पिढीला नोकरी-रोजगाराच्या जोडीलाच पगार-पगारवाढ व प्रगतीचा ध्यास लागलेला आहे. यालाच प्रचलित परिभाषेत नवागतांच्या अपेक्षेपलीकडे जाऊन वाढत्या अपेक्षा-आकांक्षाची जोड प्राप्त झाली आहे. त्यामुळे आज कर्मचाऱ्यांच्या आकांक्षांची पूर्तता करण्याचे नवे आव्हान निर्माण झाले आहे. ▌

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आरक्षणाला महिलांचाच विरोध

देशाच्या संसदेने महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक पारित केले नाही. विरोधी पक्षाने हे विधेयक नाकारले हा समस्त महिलांचा अपमान आहे. महिलांना सर्व क्षेत्रात समान संधी दिली जाते. देशातील न्यायव्यवस्थेने देखील वेळोवेळी महिलांना झुकते माप दिले आहे. पुरुष आणि महिला यांचे देशातील प्रमाण सारखे असल्याने महिलांना पुरुषांइतकेच प्रतिनिधित्व दिले पाहिजे. दोन्हीमध्ये समानता आणून सध्या महिलांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडता आली असती. वर्षानुवर्षे महिलांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी हे महिला आरक्षण विधेयक उपयुक्त ठरणारे होते. परंतु काही स्त्री लोकप्रतिनिधीच संसदेत एकत्र येऊन मंजुरी मिळू देत नाहीत ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. आपुलीच प्रतिमा होते आपलीच वैरी असे या घटनेला म्हणणेच जास्त सयुक्तिक ठरते. ▌

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे.९८८१४७३५८०

## जंगल गिळणारा राक्षस

उन्हाळा सुरू होताच जंगलात आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दरवर्षी मार्च महिना सुरू झाला की जंगलांमध्ये वणवा लागण्याच्या घटना अचानकच सुरू होतात. काही घटना नैसर्गिक असतात तर अनेक घटना मानवनिर्मित सुद्धा असतात. जंगलात लागणारे हे वणवे विझवण्यासाठी वनकर्मचाऱ्यांचा कस लागतो. अनेकदा काही कर्मचारी आग विझवताना जखमी सुद्धा होतात. आजपर्यंत तरी वनकर्मचाऱ्यांजवळ पुरेसे साधन नसल्यामुळे त्यांना आपला जीव धोक्यात घालून या आगी विझवाव्या लागतात. आत्तासुद्धा कर्मचारी झाडांच्या फांद्या वापरून आग विझवण्याच्या त्या जुन्या पारंपारिक पद्धतीवरच अवलंबून आहेत. आजच्या घडीला जगात वणवा विझवण्यासाठी ''हेली टँकर'' आणि ड्रोन सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर सुरू असताना आपल्या देशात मात्र आताही त्याच पारंपरिक पद्धतींचा वापर सुरू आहे. वनकर्मचाऱ्यांकडे साधी सुरक्षा साधने देखील उपलब्ध नाहीत त्यामुळे त्यांना आताही आपला

## वाचक पत्रे

जीव धोक्यात घालून आग विझवावी लागत आहे. मागील महिन्यात अशाच पद्धतीने आग विझवत असताना एका कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्याला आपला जीव गमवावा लागला होता. यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी वनपरिक्षेत्रात लागलेली आग विझवताना वनपाल विजय शिंगनजुडे यांचा होरपळून मृत्यू झाला होता. त्यांच्याकडे जंगलात लागलेली आग विझवण्यासाठी ब्लोअर पंप वगैरे सारखे कुठलेही उपकरण नव्हते. त्यामुळे ते पारंपरिक पद्धतीने झाडांच्या फांद्या वगैरे वापरून आग विझवण्याचा प्रयत्न करत होते परंतु आग काही आटोक्यात येत नव्हती. आग आणखी जास्त भडकत असल्यामुळे ते स्वतःचा बचाव करण्यासाठी एका झाडावर चढले, परंतु त्या झाडाला देखील आगीने आपल्या कवेत घेतले त्यामुळे ते बऱ्याच प्रमाणात होरपळले होते. त्यांना नागपूरच्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते परंतु आठ दिवस शर्थीचे प्रयत्न करून सुद्धा त्यांना वाचवता आले नाही. यापूर्वी सुद्धा जंगलात लागलेली आग विझवताना अनेक कर्मचारी जखमी झाले आहेत परंतु शासनाने त्यापासून काहीही धडा घेतलेला दिसत नाही. आतातरी शासनाने या घटनेमधून धडा घ्यावा आणि कर्मचाऱ्यांना आग विझवण्यासाठी आधुनिक उपकरणे आणि पुरेशी सुरक्षा साधने उपलब्ध करून द्यायला हवीत. ▌

**संजीव हरिदास हेडाऊ**/९३७०१६९५८२

●● ●●

## एनडीएच्या चक्रव्यूहात इंडिया आघाडी धराशायी

अपेक्षेप्रमाणे लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताअभावी महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक खारीज झाले. विधेयक पारित झाले तर त्याचे श्रेय केवळ भाजपाला मिळेल, तसे होऊ नये, या नकारात्मक विचारसरणीपोटी, एनडीएने रचलेल्या चक्रव्यूहात, विरोधी आघाडी स्वतःहून धराशयी झाली. जर विरोधकांनी सुज्ञपणा दाखवून विधेयक पारित करण्यात सहकार्य केले असते तर त्यांना त्याचे श्रेय लाटता आले असते. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे. बुद्धीत विकृती शिरली की अशी विकृत प्रज्ञा कुलं च विभवं च यशश्च हन्ति । आज विरोधकांच्या बाबतीत, विशेषतः काँग्रेसच्या बाबतीत हेच घडते आहे. दूरदृष्टी, सारासार विवेक, सुज्ञपणा आणि सकारात्मक विचारांशी विरोधकांनी नाते तोडले आहे. तसेही आता विरोधकांकडे दूरदर्शी कृष्ण कोणी राहिला नाही. राहुल गांधींच्या अपरिपक्व नेतृत्वाखाली काँग्रेससह विरोधकांची आघाडी रसातळाला जात आहे. मात्र शशी थरूरांची अवस्था भीष्माचार्यांसारखी आहे. आहे तेथे समाधान नाही आणि धरले ते सोडवतही नाही. असे म्हणतात की माणसाळलेल्या हत्तीच्या पायाला साधी दोरी गुंडाळली तरी त्याला वाटते की खुंट्याला बांधले आहे म्हणून तो जागा सोडत नाही. तसे काहीसे थरूरांच्या बाबतीत असावे, असे वाटते. काहीही असो, २०२९ ची निवडणूक भाजपाकरिता सुकर झाली आहे. ▌

**वसंत दीक्षित**/९१३७८६६६१७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### मोटारकारला बसची धडक; एक ठार, तिघे जखमी

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

देवदर्शनाला निघालेल्या भाविकांच्या मोटार कारला भर वेगातील बस गाडीने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात कारमधील एक तरुण ठार तर महिलेसह तिघे प्रवासी जखमी झाल्याची घटना केगाव ब्रिजजवळ आज सोमवारी पहाटे एक वाजता घडली. गणेश संजय शिंदे (वय २३ वर्ष) असे मयत तरुणाचे नाव आहे. तर प्रणित सुनिल भोजने (वय १९ वर्ष), भिमराव सुदाम चक्कर (वय ५४), सुरेखा भिमराव चक्कर (वय ५०) अशी जखमींची नावे असून सर्वजण पुणे जिल्ह्यातील आंबेगाव येथील राहणारे आहेत. वरील चौघे आंबेगाव कडून मोटार कारने तुळजापूर येथे दर्शनासाठी निघाले होते. आज सोमवारी पहाटे एक वाजता केगाव येथे आले असता पाठीमागून येणाऱ्या बसने कारला धडक दिली. यामध्ये कारमधील वरील चौघे मार लागून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असता गणेश शिंदे याचा पहाटे चार वाजता मृत्यू झाला तर इतर तिघा जणांवर उपचार सुरू आहेत.याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे .




### बैलगाडा शर्यत पाहताना बैलाने पोटावर व छातीवर पाय दिल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

बैलगाडा शर्यत पाहताना बैलाने पोटावर व छातीवर पाय दिल्याने एक दर्शक तरुण जखमी झाल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील हनूर गावात बारा एप्रिल रोजी सायंकाळी घडली. सचिन सिद्धाराम बळूरगी ( वय २५ वर्ष , रा. पानमंगरुळ , ता.अक्कलकोट ) असे त्या जखमी तरुणाचे नाव असून तो १२ एप्रिल रोजी हन्नुर गावात बैलगाडा शर्यत पाहण्यासाठी गेला असताना बैलाने पोटावर - छातीवर पाय दिल्याने त्यात तो जखमी झाला . त्यामुळे त्याला दोन खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मामा काशिनाथ यांनी आज सोमवारी सायंकाळी ६:४५ वाजता दाखल केले.

### कुरुल येथे कीटकनाशक प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

अज्ञात कारणावरून एका तरुणाने कीटकनाशक औषध प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कुरुल गावात रविवारी दहा वाजता घडली. भागवत दऱ्याबा ननवरे (वय ३५ वर्ष ,राहणार कुरुल) असे त्या तरुणाचे नाव आहे . रविवारी रात्री घरात असताना त्यांने अज्ञात कारणावरून कीटकनाशक औषध पिले . याचा त्रास होऊ लागल्याने त्याला उपचाराकरिता भाऊ संग्राम ननवरे यांने येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री दाखल केले.

# दररोज समतोल पाणीपुरवठ्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल

**महापौर विनायक कोंड्याल यांची माहिती**

**सुधारित योजनेनुसार शहरात एकूण १,११७ कि.मी. जलवाहिनी अंथरण्यात येणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

नियमित कर भरणाऱ्यांना कोणतीही करवाढ, दरवाढ न करता सोमवारी झालेल्या सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत १३७८ कोटी रुपयांच्या सोलापूर शहर सुधारित पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्यात आली. मनपा सभेची मंजुरी म्हणजे दररोज समतोल पाणीपुरवठ्याच्या दिशेने पडलेले सकारात्मक पाऊल आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

या योजनेसाठी जागतिक बँकेकडून अर्थसहाय्य मिळणार आहे. शहरी भाग आणि हद्दवाढ भाग अशा संपूर्ण शहराला दररोज २४ तास समतोल पाणीपुरवठा करण्यासाठी ही योजना मंजूर करण्यात आली. पूर्वीच्या ८९२ कोटी रुपयांच्या मंजूर करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेमध्ये जागतिक बँकेने आणि महाराष्ट्र शासनाने काही



सुधारणा करण्यास सांगितल्या होत्या. त्यानुसार त्या सुधारणा करून नव्याने १३७८ कोटी रुपयांची सुधारित पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, असेही महापौर कोंड्याल यांनी स्पष्ट केले.

सुधारित पाणीपुरवठा योजनेमध्ये १५० कोटी रुपयांच्या शासनाला भरावयाच्या जीएसटी कराचा समावेश आहे. सुधारित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पूर्वीच्या योजनेतील १२० एम एलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राऐवजी १५० एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात येणार आहे. पूर्वीच्या योजनेनुसार शुद्ध जलवाहिनी (फिडर मेन) ६५.७८ किमीची होणार होती. सुधारित योजनेअंतर्गत ती ७७.८ किमीची असेल. पूर्वीच्या योजनेत ११ एमएलचे ६ एमबीआर (मास्टर बॅलन्सिंग रिझर्वायर) प्रस्तावित होते. सुधारित योजनेनुसार २९ एम एलचे १० एमबीआर राहणार आहेत. ३१.८ एम एलचे २४ उंच जलकुंभ (इएसआर) बांधण्याचे नियोजन पूर्वीच्या योजनेत करण्यात आले होते. मात्र शहराच्या पाणीपुरवठ्याची आवश्यकता लक्षात घेऊन सुधारित योजनेनुसार आता ५३.३ एमएलचे ३० उंच जलकुंभ बांधण्यात येणार आहेत.

शहरात समतोल पाणी वितरण व्यवस्थेसाठी ७२० किमी जलवाहिनी अंथरण्यात येणार होती. सुधारित योजनेनुसार शहरात एकूण १११७ किमी जलवाहिनी अंथरण्यात येणार आहे. पूर्वीच्या योजनेनुसार ४० हजार एएमआर मीटर बसविण्यात येणार होते. सुधारित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत यात २ लाख १८ हजार ८५३ मेकॅनिकल मीटरची वाढ करून एकूण २ लाख ४८ हजार मिळकतींना पाण्याचे मीटर बसवण्यात येणार आहेत या निर्णयामुळे सोलापूर शहरात पाण्याची मोठी बचत होणार असून नागरिकांकडून पाण्याचा जितका वापर होईल तितकेच बिल नागरिकांना येणार आहे, असेही महापौर कोंड्याल यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रयत्नांमुळे तसेच आमदार देवेंद्र कोठे, आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुख यांचेही मोलाचे सहकार्य लाभले, असे महापौर कोंड्याल यांनी सांगितले.



### विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे भाजपा नगरसेवकासह महापालिकेसमोर घागर मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

हैदराबाद रोड विडी घरकुल परिसरातील प्रभाग क्रमांक ११ मध्ये दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहे. याकडे लक्ष वेधण्यासाठी सोमवारी या प्रभागातील महिलांनी सत्ताधारी भाजपचे नगरसेवक अजय पोन्नम यांच्यासमवेत घागर मोर्चा आंदोलन केले.

महापालिकेची सर्वसाधारण सभेदरम्यान या महिलांनी घागऱ्या आणून महापालिकेसमोर आंदोलन केले. ऐन उन्हाळ्यात तसेच विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या कालावधीत पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने आमचे प्रचंड हाल होत आहेत, असा टाहो यावेळी महिलांनी फोडला. यावेळी या महिलांनी प्रशासनाला लक्ष्य केले. महापालिकेचे अधिकारी हे नगरसेवकांना जुमानत नाहीत, नगरसेवकांना चुकीची माहिती देऊन दिशाभूल करतात, असा आरोप करीत आम्हाला हक्काचे पाणी द्या... आदी घोषणाबाजी करत या महिलांनी पाण्याच्या गहन समस्येकडे लक्ष वधले. दरम्यान, अधिकाऱ्यांशी चर्चा झाल्यानंतर कार्यवाहीचे आश्वासन देण्यात आले.

### रस्ता कामातील भ्रष्टाचारावरून भाजप नगरसेविकेचे उपोषण

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

शहर हद्दीतील डी-मार्ट ते विजापूर हायवे दरम्यान करण्यात आलेल्या रस्ता डांबरीकरणाच्या कामात कथित भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत भाजपच्या प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेविका श्रध्दा पवार यांनी सोलापूर महानगरपालिकेत पायरीवर उपोषण केले

त्या म्हणाल्या, डी मार्ट ते विजापूर हायवे पर्यंत रस्त्याच्याकामासाठी सुमारे ३ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी मंजूर असून, हे काम कोणत्या योजनेतून मंजूर झाले. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीचे इस्टिमेट तयार करून ठेकेदारास कामाचा लाभ दिल्याचा त्यांचा आरोप आहे. यासंदर्भात संबंधित अधिकारी



अतिरिक्त आयुक्त, नगर अभियंता व रस्ता विभागातील उप अभियंता यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी. दरम्यान, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांनी नगरसेविका पवार यांच्याशी चर्चा करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

## बार्शीत हिंदू संमेलन उत्साहात; हिंदू धर्म, संस्कृती व राष्ट्र रक्षणासाठी एकजुटीचा निर्धार

**बार्शी, दि. २० एप्रिल-**

बार्शी येथे अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सकल हिंदू समाज व श्री भगवंत मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले हिंदू संमेलन श्री भगवंत मंदिर परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या संमेलनाला बार्शी शहर व परिसरातील हिंदू बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या हिंदू संमेलनाच्या माध्यमातून हिंदू धर्म, संस्कृती आणि राष्ट्ररक्षणासाठी सर्वांनी एकत्र येण्याचा ठाम संकल्प उपस्थितांनी



व्यक्त केला. संमेलनामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सचिन लादे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना हिंदू समाजातील एकजूट, संस्कृतीचे जतन आणि राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास १०८ प्रभूदेव शिवाचार्य माढेकर महाराज, हभप अशोक पाटील महाराज, श्री भगवंत देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप बुडूख, डॉ. बी. वाय. यादव, मधुसूदन चांडक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह ऋषीकेश कुलकर्णी, बार्शी तालुका संघचालक आनंद सोमाणी, सरदार गव्हाणे, सुरेश हालमे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. सचिन लादे, डोळस, डॉ. यादव, पाटील, गव्हाणे आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन सकल हिंदू समाज व श्री भगवंत मंदिर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. आभार तुषार महाजन यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० एप्रिल-**

राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट) प्रवक्ते विकास लवांडे यांनी पत्रकार परिषदेत वारकरी संप्रदायातील मान्यवर महाराज मंडळींचा 'घुसखोर' असा उल्लेख केल्याने तीव्र वाद निर्माण झाला आहे. या वक्तव्यामुळे वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी वारकरी संप्रदाय



पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी केली आहे. यासंबंधीचे निवेदन त्यांनी रविवारी शहर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांना दिले.

पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण वीर महाराज यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या वक्तव्यामुळे समाजात संभ्रम निर्माण होऊन धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. तसेच समाजातील ऐक्य बिघडवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. निवेदनात भारतीय न्याय संहितेनुसार कठोर कलमे लावून तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच लवांडे यांना ताब्यात घेऊन त्यांच्या वक्तव्यामागील हेतू व इतर संबंधितांची चौकशी करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

### मोडनिंबमध्ये आठवडाभरापासून पाणीपुरवठा बंद; नागरिक हैराण

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २० एप्रिल -**

माढा तालुक्यांतील मोडनिंब शहराचा पाणीपुरवठा गेल्या आठवडा भरापासून पूर्णपणे बंद आहे.त्यामूळे जलसंकट ओढावले असून शहरातील अनेक प्रभागांत भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. आधीच उन्हामुळे प्रचंड उकाडा असल्याने नागरीक हैराण झाले आहेत, त्यातच पाण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.मोटार बिघाड, स्टार्टर, मोटार पंप जळणे व अन्य कारणां मुळे सतत पाणीपुरवठा विस्कळीत होतो. मोडनिंबची श्री वेताळ देवस्थान यात्रा काही दिवसावर येऊन ठेपली आहे. घरोघरी यात्रेमुळे पै पाहुण्यांची गर्दी होणार आहे. मोडनिंबमध्ये पाण्याची टंचाई जाणवत आहे.स्टार्टर, मोटार पंप जळणे व अन्य कारणांमुळे सध्या आठ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. तीव्र पाणीटंचाई टंचाई लक्षात घेऊन नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा.स्टार्टर, मोटार पंप जळणे व अन्य कारणांमुळे सध्या विस्कळीत पाणीपुरवठा आहे. तीव्र पाणीटंचाई टंचाई लक्षात घेऊन सुरळीत पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.




**आजपासून पाणीपुरवठा सुरळीत**

मोडनिंब शहरातील पाणीपुरवठा मोटार, स्टार्टर व पंपातील तांत्रिक बिघाडामुळे काही दिवस विस्कळीत झाला होता. आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असून आजपासून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येत आहे. नागरिकांनी सहकार्य करावे व पाण्याचा जपून वापर करावा.''

**- किरण तोडकरी**

### आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त आज पूर्वभागात स्तोत्र पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**



आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त मंगळवार, दि.२१ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता पूर्वविभाग श्रीराम मंदिर येथे विविध स्तोत्र पठण करण्यात येणार आहे, असे मंदिराचे प्रसिध्दी प्रमुख श्रीनिवास बिनगुंडी यांनी सांगितले.

श्रीगणेश पंचरत्न, श्रीकल्याण वृष्टीस्तव, श्रीलक्ष्मी नृसिंह करुणारस, श्रीशिव पंचाक्षर नक्षत्रमाला, श्रीराम भुंजग प्रयात आदी स्तोत्रांचे पठण करण्यात येणार आहे. भक्तांनी मोठ्या संख्येने यात सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## सोलापूर जिल्हा परिषदेची आज बैठक

**पाणीपुरवठा, पालखी तळावरील मंडप व्यवस्था, आरोग्य आणि इतर सोयी सुविधांचा आढावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

यंदा वरुणराजाने जिल्ह्यात चांगली हजेरी लावली असली तर सध्याच्या कडक उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. कुठे नैसर्गिक तर कुठे तांत्रिकदृष्ट्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन पाणीपुरवठ्यासंदर्भात उपाययोजना करण्यासंदर्भात मंगळवारी (दि.२१) अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेत बैठक आयोजित केली आहे.

चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर जिल्हा परिषदेत आता नुकतीच पदाधिकाऱ्यांची कारकिर्द सुरू झाली आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषदेच्या आजवरच्या इतिहासात भाजपला पहिल्यांदाच स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यामुळे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्वच विषय समित्यांच्या सभापतीपदी भाजपच्याच सदस्यांची वर्णी लागली आहे. त्यामुळे नागरिकांना सोयीसुविधा मिळवून देण्याची मोठी जबाबदारी भाजप पदाधिकाऱ्यांवर आली आहे.

सध्याच्या प्रखर उन्हामुळे अनेक ठिकाणी पाणीटंचाई निर्माण झाली आहे. काही गावातून टँकरची मागणी होत आहे. बऱ्याच गावांमध्ये दुरुस्तीअभावी हातपंप बंद आहेत. हातपंप दुरूस्तीसाठी पंचायत समिती स्तरावरील यंत्रणा कुचकामी ठरत आहे. तक्रार करूनही आठ आठ दिवस हातपंप दुरूस्त केले जात नाहीत. दुरूस्त केले तर ते फार दिवस टिकत नाहीत. पुन्हा नादुरूस्त होत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. पदाधिकाऱ्यांना विनाकारण नागरिकांच्या रोषाला सामोरे जाऊ लागू नये म्हणून आढावा बैठक आयोजित केली असून या बैठकीत पाणीटंचाईचा आढावा घेतला जाणार आहे. याशिवाय अर्थ व बांधकाम विभागाचाही आढावा घेतला जाणार असल्याचे सांगण्यात आले.

**सीईओ कुशल जैन याचा आजपासून विविध कामांचा आढावा**

जिल्हा परिषदेचे नवे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन हे आजपासून ते २७ एप्रिलपर्यंत विविध विभागांचा आढावा घेणार आहेत. सर्वच विभागप्रमुखांकडून त्यांच्याकडील कामाची कार्यपध्दती समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच पंढरपूरच्या आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवरही पाणीपुरवठा, पालखी तळावरील मंडप व्यवस्था, आरोग्य आणि इतर सोयीसुविधांचीही माहिती घेणार आहेत.

### बाकड्यावर बसण्याच्या कारणावरून एकास लाथाबुक्क्यांनी मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

शाळेसमोरील बाकड्यावर बसण्याच्या कारणावरून एका तरुणाला तिघा जणांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील कोर्टी गावात रविवारी सायंकाळी घडली. हनुमंत रामा कांबळे (वय ३५ वर्ष, राहणार कोर्टी) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून रविवारी सायंकाळी कोर्टी येथील मराठी शाळेसमोर बाकड्यावर बसण्याच्या कारणावरून त्याला सद्दाम मुलानी , भैय्या शेख व इतर एक जणांनी मिळून हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली . यात सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला पंढरपूरच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात आज दुपारी तो स्वतः दाखल झाला.

Classifieds

**विकणे आहे**

'मारुती अपार्टमेंट' रुबी नगर सिध्देश्वर ज्वेलर्स समोर बॉम्बे पार्क रोड, जुळे सोलापूर येथील दुसऱ्या मजल्यावरील २ बीएचके प्लॅट लमसम रकमेवर भाडेवर अथवा योग्य किंमतीस विकणे आहे.

मो. ९६७३१६१६९०/ ८१८०८६१०३८/ ९२२५७४९०४०

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि.कि. अर्ज नं. १६/२०२६ नि.५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

**श्री. अंबरसिंग तुकाराम रजपूत,**
वय - ८० वर्षे, धंदा - वयोवृध्द,
रा. उपळाई (ठों.), ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरूध्द

**कोणी नाही - सा.वाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी त्यांचा चुलता विठ्ठलसिंग मानसिंग रजपूत हे दि. १४/०९/१९८३ रोजी मौजे उपळाई (ठों), ता. बार्शी येथे मयत झालेने मे. कोर्टात यातील अर्जदार यांना मयत विठ्ठलसिंग मानसिंग रजपूत यांचे पश्चात मौजे उपळाई (ठों.) ता. बार्शी या ठिकाणी सिटी सर्व्हे नंबर १९३ या मिळकतीवर अर्जदार यांचे नाव वारस म्हणून लावणेकरीता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत विठ्ठलसिंग मानसिंग रजपूत यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता २७/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे, आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे.
ता. २०/०४/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सिव्हील एम.ए. नं. ७/२०२६
नि. ६

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

१) **श्री. लक्ष्मण महादेव उर्फ महादप्पा शिवशरण**
रा. करजगी, ता. अक्कलकोट
२) **श्री. धर्मा महादेव उर्फ महादप्पा शिवशरण**
रा. बालाजी नगर, भोसरी पुणे.
सध्या रा. करजगी, ता. अक्कलकोट
३) **श्रीमती शांताबाई दुर्योधन दसाडे**
रा. चिक्केहळ्ळी, ता. अक्कलकोट
सध्या रा. करजगी, ता. अक्कलकोट
४) **श्रीमती भिमाबाई परसप्पा मुंडेवाडी**
रा. गौडगांव (बु.।।), ता. अक्कलकोट
सध्या रा. करजगी, ता. अक्कलकोट
५) **श्रीमती बसव्वा नागनाथ वाघमारे**
रा. तीर्थ, ता. द. सोलापूर
सध्या रा. करजगी, ता. अक्कलकोट
६) **श्रीमती नागुबाई वसंत जाधव**
रा. रमाबाई आंबेडकर नगर, सोलापूर
सध्या रा. करजगी, ता. अक्कलकोट
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही - सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७ २०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे दाखल केला असून अर्जदार क्र. १ ते ६ यांचे वडील महादेव उर्फ महादप्पा बकसरप्पा उर्फ भागण्णा ऊर्फ भाकसरी शिवशरण हे दि. ०९/१२/१९७३ रोजी करजगी, ता. अक्कलकोट येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच महादेव उर्फ महादप्पा बकसरप्पा उर्फ भागण्णा ऊर्फ भाकसरी शिवशरण यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारसा प्रमाणपत्र शासकीय कामाकरीता आवश्यक आहे याकरीता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळावे याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत कै. महादेव उर्फ महादप्पा बकसरप्पा उर्फ भागण्णा ऊर्फ भाकसरी शिवशरण यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. १२/०६/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या हे जाहीर प्रसिध्दीकरण केले.
ता. १६/०४/२०२६


कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट



## महत्त्वाचे

### गोल्फपटू अदिती अशोक ५१ व्या स्थानावर



**लॉस एंजेलिस:** लॉस एंजेलिस गोल्फ स्पर्धेच्या अंतिम फेरीत ७६ गुणांची नोंद केल्यानंतर अदिती अशोक संयुक्तपणे ५१ व्या स्थानावर राहिली. पाचव्या होलवर केलेल्या ट्रिपल बोगीचा अदिती अशोकच्या कामगिरीवर लक्षणीय परिणाम झाला. प्रभावी पुनरागमनानंतर हॅना ग्रीनने स्पर्धेत विजेतेपद पटकावले. हॅना ग्रीनचा हा विजय म्हणजे, गत चार वर्षांत स्पर्धेतील तिचे हे तिसरेच विजेतेपद कामगिरी ठरली आहे.

### जानेफळचा आदित्य सवडदकर राष्ट्रीय अंडर-१४ क्रिकेट संघात

**जानेफळ** : येथील रहिवासी व सरस्वती विद्यालयाचा माजी विद्यार्थी आणि जवाहर नवोदय विद्यालय, शेगाव येथे शिकत असलेल्या आदित्य विनोद सवडदकर याची १४ वर्षांखालील राष्ट्रीय क्रिकेट संघात निवड झाली आहे.



ऑक्टोबर २०२५ मध्ये येथून जवळच असलेल्या नायगाव दत्तापूर येथील गौरव निकम याची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून विनू मन्कड ट्रॉफीसाठी निवड झाली होती. आदित्यचे प्राथमिक येथील शिक्षण केंद्रीय मराठी पूर्व माध्यमिक शाळेत झाले. तर माध्यमिक शिक्षण श्री सरस्वती विद्यालयात वर्ग ५ पर्यंत झाले. त्यानंतर शेगाव येथील नवोदय विद्यालयासाठी त्याची निवड झाली. मूळ जानेफळ येथील रहिवासी असलेल्या या विद्यार्थ्याने राष्ट्रीय पातळीवर आपल्या कौशल्याची छाप पाडत मोठे यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय यशामुळे जानेफळ सह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### कोरीर, लोकेडी अमेरिकेत विजेतेपदे राखण्यास सज्ज

**बोस्टन** : विद्यमान विजेता जॉन कोरीर सोमवारी पुन्हा बोस्टन मॅराथॉनमध्ये सहभागी होत आहे. गत वर्षी शिकागो व व्हॅलेन्सिया येथील मॅराथॉनमध्ये विजय मिळविल्यानंतर, आता सलग चौथ्यांदा मॅराथॉनचे विजेतेपद पटकावण्याचे त्याचे ध्येय आहे. बोस्टनच्या इतिहासातील तिसरी सर्वात जलद वेळ (२:०४.४५) नोंदवणारा हा केनियन धावपटू; २०२१ चा विजेता बेन्सन किप्रुटो, तसेच गेल्या वर्षी अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर राहिलेले अल्फोन्स फेलिक्स सिंबू आणि सायब्रियन कोटूट यांच्याकडून कडव्या आव्हानाची अपेक्षा करू शकतो. केनियाचा किप्रुटो २:०२.१६ या आपल्या सर्वोत्तम वैयक्तिक वेळेसह या स्पर्धेतील सर्वात वेगवान धावपटू ठरला आहे.

### मुचोव्हाला नमवून रायबाकिना स्टुटगार्ट ओपन विजेती

**स्टुटगार्ट** : ऑस्ट्रेलियन ओपन विजेती २६ वर्षीय एलेना रायबाकिनाने डब्ल्यूटीए स्टुटगार्ट इनडोअर क्ले-कोर्ट टेनिस स्पर्धेत कॅरोलिना मुचोव्हाचा ७-५, ६-१ असा एकतर्फी पराभव करीत या वर्षातील आपले दुसरे विजेतेपद पटकावले. जर्मनीतील कोर्टवर ५३ मिनिटे चाललेल्या सामन्यात अव्वल मानांकित रायबाकिनाने आपल्या सातव्या मानांकित झेक प्रजासत्ताकच्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध दोन ब्रेक्स मिळवित पहिला सेट अत्यंत चुरशीने आपल्या नावे केला. दुसऱ्या सेटमध्ये या कझाकिस्तानच्या खेळाडूने मागे वळून पाहिलेच नाही; मुचोव्हाला तिच्या सर्व्हिसमध्ये अडचणी येत असताना, रायबाकिनाने वेगाने ५-० अशी आघाडी घेतली. अखेर १ तास १८ मिनिटांच्या खेळानंतर तिने विजय आणि आपल्या कारकिर्दीतील १३वे विजेतेपद निश्चित केले. गत महिन्यात इंडियन वेल्स स्पर्धेत उपविजेतेपद मिळवणाऱ्या रायबाकिनाने दोन वर्षांपूर्वी जिंकलेले हे विजेतेपद पुन्हा एकदा आपल्या नावे केले.?

### भारतीय कनिष्ठ नेमबाजांचे लक्ष पदकावर

**कैरो** : इजिप्त इंटरनॅशनल ऑलिम्पिक सिटी येथे आयएसएसएफ कनिष्ठ विश्वचषक (रायफल/पिस्तूल/शॉटगन) नेमबाजी स्पर्धेचा पहिला दिवस सुरू होत असताना, कनिष्ठ नेमबाज या हंगामातील आपल्या पहिल्याच स्पर्धेत सहभागी होत आहेत. या दिवशी १० मी. एअर रायफल (महिला) आणि १० मी. एअर पिस्तूल (पुरुष) या प्रकारांमधील दोन पदकांसाठी स्पर्धा होणार आहे. भारताने ७१ नेमबाजांचा समावेश असलेला एक मजबूत संघ या स्पर्धेसाठी पाठवला आहे.

# तिलकच्या शतकाने मुंबईला सावरले

**कॅगिसो रबाडाचे तीन जबरदस्त हादरे ● विदर्भाच्या दानिश मालेवारच्या पदार्पणात चार चेंडूंत दोन धावा**

◆ **अहमदाबाद, २० एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात मुंबई इंडियन्सला डावाच्या प्रारंभी तीन जबरदस्त हादरे बसले, परंतु त्यानंतर तिलक वर्मा (नाबाद १०१) व नमन धीरने (४५) झंझावाती फलंदाजी करीत मुंबई इंडियन्सला मर्यादित २० षटकांत ५ बाद १९९ धावा उभारून दिल्या. मुंबईने गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २०० धावांचे लक्ष्य ठेवले.

यजमान गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सने दोन खेळाडूंना पदार्पणाची संधी दिली. २२ वर्षीय दानिश मालेवार हा विदर्भाचा फलंदाज आहे, तर कृष्ण भगत हा पंजाबचा वेगवान गोलंदाज आहे.

**विदर्भाचा दानिश मालेवार पदार्पणात अपयशी**

रेयान रिकेलटनच्या जागी डावाची सुरुवात करण्याची जबाबदारी मालेवारवर सोपवण्यात आली. क्विंटन डी कॉक व दानिश मालेवार सलामीला मैदानावर आले, परंतु दानिशसाठी पदार्पण फारसे चांगले ठरले नाही. चार चेंडूंत दोन एकेरी धावा घेतल्यानंतर दानिश लेग साईडवरून कॅगिसो रबाडाला फटका मारण्याच्या प्रयत्नात पुढे सरकला, परंतु चेंडू आत वळल्याने तो पायचीत झाला.





**रबाडाने कंबरडे मोडले**

मुंबईच्या जेमतेम २५ धावा झाल्या असताना रबाडाने त्यांना आणखी एक धक्का दिला. रबाडाने स्वतःच्याच गोलंदाजीत डी कॉकचा (१३) झेल पकडला. त्यानंतर रबाडाने सूर्यकुमार यादवचा त्रिफळा उडवून मुंबई इंडियन्सचे कंबरडेच मोडले. सूर्यकुमारने १० चेंडूंत केवळ १५ धावा केल्या. मुंबईने ५.५ षटकांत ४४ धावांत तीन मोहरे गमावले, त्यानंतर नमन धीर व तिलक वर्माने संघाचा डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला, मात्र मध्यम गती वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णाने नमन धीरचा धडाका रोखला. धीरने ३२ चेंडूंत





४५ धावांची भर घातली, यात त्याने ६ चौकार व एक षट्कार खेचला, तोपर्यंत मुंबईने १२.३ षटकांत ४ बाद ९६ धावांचा टप्पा गाठला.

**मुंबईची जोरदार मुसंडी**

पुढे तिलक वर्मा व कर्णधार हार्दिक पांड्याने जबाबदारीने फलंदाजी करत संघाची धावसंख्या वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. दरम्यान, हार्दिकच्या साथीने तिलकने वैयक्तिक अर्धशतकही साजरे केले, परंतु याचदरम्यान, हार्दिक पांड्या मोहम्मद सिराजच्या गोलंदाजीला बळी पडला. हार्दिकचा उडालेला झेल फिलिप्सने अचूकपणे पकडला. हार्दिकने १६ चेंडूंत १५ धावा केल्या. मुंबईने १८.५ षटकांत १७७ धावांत आपला निम्मा संघ गमावला होता. तिलकची शेर्फन रदरफोर्डच्या साथीने फटकेबाजी सुरूच होती. तिलक वर्माने अवघ्या ४५ चेंडूंत ८ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने नाबाद १०१ धावांची खेळी केली, तर रदरफोर्ड एका धावेवर नाबाद राहिला. गुजरातकडून कॅगिसो रबाडाने ३३ धावांत ३ बळी, तर मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाने प्रत्येकी एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# दिल्ली मुसंडी मारण्यास सज्ज

◆ **हैदराबाद, २० एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी येथील राजीव गांधी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे.

हा आयपीएल २०२६ हंगामातील ३१ वा सामना आहे. या सामन्याच्या माध्यमातून ईशान किशनचा हैदराबाद कॅपिटल्स आपले अव्वल चार क्रमांकातील स्थान बळकट करू इच्छित आहे, तर तिकडे पाचव्या क्रमांकावर असलेला अक्षर पटेलचा दिल्ली कॅपिटल्स संघ जोरदार मुसंडी मारून अव्वल चार क्रमांकात स्थान मिळवू इच्छित आहे. त्यामुळे हा सामना चुरशीचा होणार आहे, हे जवळपास निश्चित आहे.

सनरायझर्स हैदराबादने आपल्या गत सामन्यात दमदार कामगिरी करीत, चेन्नई सुपर किंग्सवर १० धावांनी दणदणीत विजय मिळवला. हैदराबाद संघाच्या वरच्या फळीतील



ईशान किशन



केएल राहुल

फलंदाजांनी या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली; अभिषेक शर्माने अवघ्या २२ चेंडूंमध्ये ५९ धावांची स्फोटक खेळी केली, तर हेनरिक क्लासेननेही ५९ धावांचे भक्कम योगदान दिले. गोलंदाजीमध्ये, ईशान मलिंगाने आपल्या चार षटकांत २९ धावांत ३ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी केली, तर नितीश रेड्डीनेही दोन बळी मिळवित संघाला हातभार लावला.

दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सनेही आपल्या मागील सामन्यात प्रभावी कामगिरी करीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला ६ गडी राखून पराभूत केले. बंगळुरूने १७६ धावांचे लक्ष्य उभे केले होते, जे दिल्लीने अखेरच्या षटकांत यशस्वीरित्या गाठले. के.एल. राहुलने ५७ धावांची खेळी करीत संघाला भक्कम सुरुवात करून दिली, तर ट्रिस्टन स्टब्सने ६० धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली.

सामन्याच्या अखेरच्या षटकांमध्ये डेव्हिड मिलरने १० चेंडूंमध्ये २२ धावांची जलद खेळी करत विजयावर कळस चढवला. तत्पूर्वी, दिल्लीच्या गोलंदाजांनी अत्यंत शिस्तबद्ध कामगिरी केली, यात अक्षर पटेल, कुलदीप यादव व लुंगी नगिदीने प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर मुकेश कुमारने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**सनरायझर्स हैदराबाद वि.दिल्ली कॅपिटल्स**

**स्थळ** : राजीव गांधी स्टेडियम, हैदराबाद

**वेळ** : वेळ : सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी www.tarunbharat.net वर भेट द्या!

# प्रो-लीग, विश्वचषकासाठी राष्ट्रीय पुरुष हॉकी संघाची जोरात तयारी


**शिबिरासाठी ३६ संभाव्य खेळाडूंची निवड**

◆ **बंगळुरू, २० एप्रिल**

हॉकी इंडियाने वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी ३६ संभाव्य खेळाडूंची निवड केली आहे. हे शिबीर २० एप्रिल ते ९ मे या कालावधीत बंगळुरू येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण () केंद्रावर आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण शिबिरात सांघिक रणनीतीतील सुसूत्रता, शारीरिक तंदुरुस्ती व सामन्यासारख्या सरावावर भर दिला जाईल.

हे शिबीर संघाला प्रो-लीग हॉकीची युरोप फेरी, विश्वचषक व आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी सज्ज करेल. संघाचा उद्देश लय मिळविणे, खेळाडूंच्या संयोजनात सुधारणा करणे आणि सर्व विभागांमध्ये संघाची ताकद व खोली वाढवणे हा आहे.



याशिवाय संघ आपला खेळातला ताल मिळवण्यावर, खेळाडूंच्या संयोजनात सुधारणा करण्यावर आणि सर्व विभागांमध्ये संघाची ताकद व खोली वाढवण्यावर लक्ष केंद्रित करेल. गोलरक्षण विभागात कृष्ण बहादूर पाठक, सूरज करकेरा आणि पवन यांसारखी अनुभवी नावे आहेत; त्यांच्या जोडीला मोहित होन्नेनहल्ली शशिकुमार आणि प्रिन्सदीप सिंग यांसारख्या उदयोन्मुख खेळाडूंचाही समावेश आहे.

बचावफळीची धुरा हरमनप्रीत सिंग व अमित रोहिदास यांसारख्या दिग्गज खेळाडूंच्या खांद्यावर असेल. त्यांना जरमनप्रीत सिंग, जुगराज सिंग, संजय, सुमित आणि पूवन्ना चंदुरा बॉबी, यशदीप सिवाच, नीलम संजीप झेस व अमनदीप लाक्रा सारखे खेळाडू साथ देईल.

मध्यफळीमध्ये अनुभव व तरुणाईचा एक मजबूत मेळ दिसून येतो, त्याचे नेतृत्व मनप्रीत सिंग, हार्दिक सिंग आणि विवेक सागर प्रसाद हे खेळाडू करतील. त्यांना राजेंद्र सिंग, मनमीत सिंग, मोइरांगथेम रविचंद्र सिंग, विष्णू कांत सिंग, राज कुमार पाल, निळकंठ शर्मा आणि रोशन कुजूर हे खेळाडू साथ देतील. ◂(वृत्तसंस्था)

# विराट-अनुष्काने वृंदावनमध्ये घेतले आशीर्वाद



◆ **वृंदावन, २० एप्रिल**

विराट कोहली व अनुष्का शर्माने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर सोमवारी वृंदावनला भेट देऊन आध्यात्मिक गुरु श्री हित प्रेमानंद गोविंद शरण जी महाराज यांचे आशीर्वाद घेतले.

या भेटीदरम्यान या दोघांनीही साध्या आणि पारंपरिक वेशभूषेला पसंती दिली होती. अलीकडेच समाज माध्यमावर निर्माण झालेल्या एका वादाच्या पृष्ठभूमीवर या दोघांचा हा पहिलाच सार्वजनिक वावर होता. त्याने इन्स्टाग्रामवर जर्मन व्लॉगर हिने पोस्ट केलेला एक फोटो लाईक केला होता, ज्याची इंटरनेटवर त्वरित चर्चा सुरू झाली होती. २४ एप्रिल रोजी बंगळुरूमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध होणाऱ्या सामन्यापूर्वी, आरसीबीला सहा दिवसांची विश्रांती मिळाली आहे. शनिवारी बंगळुरूमध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून पराभव पत्करावा लागल्यामुळे, या हंगामातील आरसीबीचा हा पहिलाच पराभव ठरला. ◂(वृत्तसंस्था)

# दहा मे रोजी पहिली ओपन रोलर स्पीड स्केटिंग स्पर्धा

## आंतरराराष्ट्रीय दर्जाची स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

चीताह सुपीरियर स्केटिंग अॅकॅडमीतर्फे रविवार १० मे रोजी पहिली ओपन रोलर स्पीड स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती केदार बदामीकर व अभिजीत राख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्ह्यात प्रथमच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बँक्ड ट्रॅकवर ही स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा सोलापूर जिल्ह्यासाठी हा एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे. या ट्रॅकची रचना आंतरराष्ट्रीय मानकांनुसार करण्यात आलेली आहे. या प्रकारच्या ट्रॅकमुळे खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण व स्पर्धेचा अनुभव मिळतो. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध शहरांमधून तसेच इतर राज्यांमधून खेळाडू सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा ६, ८,१०, १२,१४, १७ आणि १८ वर्षे व त्यावरील गटात होणार असून विजेत्यांना आकर्षक पदके व ट्रॉफीज प्रदान करण्यात येणार आहे. सर्वाधिक पदके जिंकणाऱ्या टॉप ३ अॅकॅडमीना विशेष ट्रॉफी देण्यात येईल.

# सोलापूरच्या रणरागिणींची उपांत्य फेरीत धडक

**राज्य क्रिकेट स्पर्धेत प्रेसिडेंट इलेव्हनचा ११२ धावांनी धुव्वा**

**वाघमोडे; माशाळे यांची अर्धशतके, वाघमोडे सामनावीर**

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या महिलांच्या क्रिकेट स्पर्धेत सोलापूर संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. अटीतटीच्या उपांत्यपूर्व फेरीत सोलापूरने प्रेसिडेंट इलेव्हनचा ११२ धावांनी धुव्वा उडवला. फलंदाजीमध्ये ६० धावा आणि गोलंदाजीमध्ये ३ बळी घेणाऱ्या साक्षी वाघमोडे हिला तिच्या अष्टपैलू कामगिरीबद्दल 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरवण्यात आले.



नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सोलापूरने निर्धारित ४५ षटकांत ४ गड्यांच्या मोबदल्यात २१५ धावांचा डोंगर उभा केला. सलामीवीर साक्षी वाघमोडे (६० धावा) आणि प्रतिभा माशाळे (५३ धावा) यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत संघाला भक्कम पाया रचून दिला. या दोघींच्या अर्धशतकी खेळीमुळे सोलापूरला सन्मानजनक धावसंख्या गाठता आली.



प्रतिभा माशाळे



साक्षी वाघमोडे

२१६ धावांचे डोंगराएवढे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या प्रेसिडेंट इलेव्हनला सोलापूरच्या भेदक गोलंदाजीसमोर तग धरता आला नाही. प्रेसिडेंटकडून इशा घुलेने ७३ धावांची एकाकी झुंज दिली. मात्र इतर फलंदाज पत्त्याच्या बंगल्यासारखे कोसळले. अवघ्या २८.३ षटकांत १०३ धावांवर त्यांचा डाव आटोपला. सोलापूरच्या गोलंदाजीमध्ये साक्षी लमकाने आणि साक्षी वाघमोडे यांनी प्रत्येकी ३ बळी घेत प्रतिस्पर्धी संघाचे कंबरडे मोडले. अमृता गव्हाणेने २ बळी घेत त्यांना साथ दिली.

निवड समितीचे अध्यक्ष किरण मणियार यांच्यासह स्नेहल जाधव, सारिका कुरनूरकर आणि मानसी जाधव यांनी निवडलेल्या संतुलित संघामुळेच सोलापूरला हे यश संपादन करता आले. त्यांचे जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील, चंद्रकांत रेम्बेर्सु, उपाध्यक्ष श्रीकांत मोरे, प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख आणि सर्व कार्यकारिणी सदस्यांनी खेळाडूंचे व निवड समितीचे अभिनंदन करून पुढील सामन्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# आराध्या जाधव दुहेरी मुकुटाची मानकरी

**टेनिस प्रीमियर लीग : बेंद्रे, खरे, चव्हाण, पवार विजेते**

**तभा वृत्तसेवा,**

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

टेनिस प्रीमियम लीग स्पर्धेत शौर्य बेंद्रे , अर्पिता खरे, ऋषिकेश चव्हाण, आराध्या जाधव, यशवंतराजे पवार यांनी आपापल्या गटात विजेतेपद पटकाविले. आराध्याने १२ व १४ वर्षांखालील गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुटाचा मान मिळविला.

समाज कल्याण केंद्र लॉन टेनिस कोर्ट येथे प्रथमच झालेल्या या स्पर्धेत १०,१२ आणि १४ वर्षाखालील मुला-मुलींच्या गटात ५१ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. प्रशिक्षक सुधीर सालगुडे यांच्या मार्गदर्शनाखालील पंच म्हणून विजय वीरगौडा, आर्यन येमूल , शंभूराजे पवार, शिवा हडपद आणि सालोमन नवगिरे यांनी काम पाहिले.विजयी उपविजयी आणि सहभागी खेळाडूंचे कौतुक राज्य लॉन टेनिस मानद सचिव राजीव देसाई व उद्योजक संगमनाथ नागोजी यांनी केले.



विजयी खेळाडूंचे बक्षीस वितरण पोलीस अधिकारी विक्रम राजपूत, माढा तालुक्याचे महसूल अधिकारी प्रसाद सोनवणे, कर अधिकारी अण्णासाहेब पवार, जिल्हा सॉफ्ट टेनिस सहसचिव शिवाजी वसपटे यांच्या उपस्थितीत झाले. सूत्रसंचालन महिला प्रशिक्षक पूजा सालगुडे यांनी केले.

**अंतिम निकाल याप्रमाणे**

**१० वर्षांखालील मुले** : शौर्य बेंद्रे वि.वि. राजवीर राजपूत ४/०,४/१. **मुली** : अर्पिता खरे वि.वि. सान्वी चव्हाण ४/२.

**१२ वर्षांखालील मुले** : ऋषिकेश चव्हाण वि.वि. अव्यान पुलगम ६/४. **मुली** : आराध्या जाधव वि.वि. साईशा पुगलम ६/१.

**१४ वर्षांखालील मुले** : यशवंतराजे पवार वि/वि विर गायकवाड ६/३. **मुली** : आराध्य जाधव वि.वि. मृण्मयी गायकवाड ६/२

# स्पोर्टस् अँन्ड गेम फेडरेशनतर्फे राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षकांचा सत्कार



**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

स्पोर्ट्स अँड गेम फाउंडेशनच्या वतीने शहर व जिल्ह्यातील १६ राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. यू. एन. बेरिया ऑल लष्कर येथे २०२५-२६ या वर्षात सोलापूर जिल्ह्यातील शालेय व विद्यापीठामध्ये राष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रशालेचे, संस्थेचे, जिल्ह्याचे व सोलापूर शहराचे नाव देशभरात नावलौकिक केलेल्या खेळाडू मुले व मुलींचा तसेच दर्जेदार व उत्तम खेळाडू तयार करणारे मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा शिक्षक आदिल मुनशी, अलीम शेख व डॉ. शहबाज शेख यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी नजीर शेख, नगरसेवक अझर हुंडेकरी व उजमा उटकुर यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. आबिद रंगरेज यांनी स्वागत केले. अल्ताफ सिद्दिकी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इरफान कारीगर व तलहा शेख यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ क्रीडाशिक्षक एम. शफी, वसीम शेख, रहीम शेख, इकबाल दलाल, जावेद पटेल, सइदा दारूवाले, अनिसा नालबंद व सोहेल शेख आदींनी परिश्रम घेतले.

**सत्कारमूर्ती खेळाडू**

दानिश शेख, इरफान बारगीर, सुवेज तांबोळी, मुदस्सर सय्यद, उमरान पेरमपल्ली, अमन मणियार,आलिया जमादार, निख्त बागवान, फिरदोस शेख, मिसबाह पटेल,मुस्कान बागवान, पठाण सोहेल खान, नदीम शेख, रेहान मुल्ला, याहीया तांबोळी, शादाब नदाफ.

## महत्वाचे...



### गंगाधर मंजुळकर यांचा राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मान

**अक्कलकोट, दि. २० एप्रिल-**

शिरवळ येथील गंगाधर सोमनिंग मंजुळकर यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुण्यामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशन यांच्यातर्फे राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२६ मिळाला. मॉडेल अभिनेत्री सुष्मिता जाधव व अभिनेत्री स्नेहल भोंग यांच्या हस्ते गंगाधर मंजुळकर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अक्कलकोट तालुक्यातील एक छोट्याश्या गावातील म्हणजे शिरवळ येथील गरीब घरातील मुलगा गंगाधर सोमनिंग मंजुळकर यांना जी .एम. इव्हेंट्स सेलिब्रिटी व कला सहाय्यक दिग्दर्शक काम करत आहेत.

### अनुष्का निंबाळकर, शिवानी बाबरला अक्षरमित्र पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि. २० एप्रिल-**

नाझरा विद्यामंदिर प्रशालेत संस्था सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, मुख्याध्यापक बिभीषण माने, पर्यवेक्षक विनायक पाटील, शिक्षक सुनील जवंजाळ यांच्या संकल्पनेतून अक्षरमित्र पुरस्काराची योजना राबवली जात आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात या स्पर्धेची सुरुवात होते. यामध्ये विद्यार्थ्याने ग्रंथालयातून त्याचबरोबर इतर ठिकाणाहून पुस्तके मिळवायची व ती वाचायची. वाचलेल्या पुस्तकावर एक ते दीड पान त्या पुस्तकातून त्याला काय मिळाले या संदर्भाने लिहायचे. जो जास्तीत जास्त पुस्तक वाचेल त्याच्यासाठी अक्षरमित्र पुरस्कार जाहीर केला जातो. स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील स्वरांजली बाबर, वैष्णवी दीक्षित, ईश्वरी यादव, प्रगती खळगे, श्रीकृष्ण बाबर, आरव बाबर, उन्मय बाबर, वाहिद मुलाणी, ज्ञानदा केंगार, श्रेया चव्हाण, तन्वी डोंगरे, श्रावणी घोडके, तनुजा काळे, ऐश्वर्या पांढरे या विद्यार्थ्यांनी वर्षभरात ४० च्या वरती पुस्तके वाचून त्याचा सारांश लिहिला आहे.





### शिक्षक समायोजनाचा प्रश्न प्राधान्याने सोडवा : सभापती केदार-सावंत

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न योग्य आणि पारदर्शक पद्धतीने हाताळावा, अशा स्पष्ट सूचना सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी शिक्षण विभागाला दिल्या. पहिल्याच मासिक बैठकीत त्यांनी हा मुद्दा प्राधान्याने उपस्थित करत प्रशासनाला आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. शिक्षकांच्या बदली, समायोजन आणि रिक्त पदांच्या प्रश्नामुळे अनेक ठिकाणी शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. यावर तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच समायोजन प्रक्रिया नियमबद्ध, न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने राबवावी, संबंधित शिक्षकांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि कोणालाही अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देशही सभापतींनी दिले. शिक्षण विभागाने शिक्षकांच्या समस्या संवेदनशीलतेने हाताळून त्वरित तोडगा काढावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. यापुढील सभा दि. ४ मे रोजी होणार असल्याचे ही सभापती केदार-सावंत यांनी सांगितले.


## तामलवाडीच्या उद्योजकांनी उपस्थित केली खंत

# राष्ट्रीय सौर उर्जा धोरणाला बसतेय खीळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

सौर ऊर्जा ही केवळ पर्यावरणपूरक पर्याय राहिलेली नसून, राज्याच्या आर्थिक प्रगतीची, ऊर्जा सुरक्षिततेची आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पपूर्तीसाठी मास्टर की ठरली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असले तरी सौरऊर्जा प्रकल्प लावणाऱ्या ग्राहकांवर 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आकारणे अन्यायकारक आहे. या निर्णयामुळे १० मे. वॅट वीज उत्पादन करणाऱ्या ग्राहकांना तोटा होणार आहे; तसेच प्रदूषणाला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आखलेल्या राष्ट्रीय सौर धोरणाला खीळ बसणार असल्याची खंत तामलवाडी मिनी एमआयडीसीतील काही उद्योजकांनी दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २०) व्यक्त केली.

'महावितरण'ने सादर केलेल्या वीज दरवाढीच्या प्रस्तावावर वीज नियामक आयोगाने पुण्यातील विधान भवनाच्या सभागृहात सार्वजनिक सुनावणी घेतली. या वेळीही बहुसंख्य वक्त्यांनी 'ग्रीड कनेक्ट रूफ टॉप' सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांना 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आकारण्याच्या 'महावितरण'च्या प्रस्तावाला नापसंती दर्शवली होती. 'अन्य राज्यांमध्ये सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांवर 'ग्रीड सपोर्ट चार्ज' आकारले जात नाहीत. मग महाराष्ट्रातच का,' असा सवालही हे उद्योजक करत आहेत. मुळात सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी, त्याच्या देखभाल-दुरुस्तीसाठी मोठा खर्च येतो. त्यात 'ग्रीड सपोर्ट' आकाराची भर पडल्यास भविष्यात कोणीही सौरऊर्जा प्रकल्प बसविण्यास पुढे येणार नाही, भीतीही हे उद्योजक व्यक्त करीत आहेत.



महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा मार्च २०२६ चा नवा निर्णय राज्याच्या सौर ऊर्जा धोरणाला आणि उद्योगांना मोठा धक्का देणारा ठरत आहे. 'नॅशनल एनर्जी पॉलिसी'च्या अगदी उलट पावले टाकत, MSEDCL च्या नवीन अटींमुळे सौर ऊर्जा वापरणे आता फायद्याचे उरले नाहीये, अशी या उद्योजकांची खंत आहे. सौर ऊर्जा हा एक नूतनीकरणक्षम, प्रदूषणमुक्त आणि शाश्वत ऊर्जा स्रोत आहे, जो विजेचे बिल कमी करण्यास आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यास मदत करतो. वीज बिलात बचत: स्वतःची वीज निर्मिती केल्यामुळे विजेच्या बिलात मोठी बचत होते मात्र काही उद्योजकांनी याचे उलटे अनुभव घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

सौर ऊर्जेमुळे हरितगृह वायू किंवा हानिकारक प्रदूषण होत नाही, ज्यामुळे हवामान बदलाशी लढण्यास मदत होते; यावर कमी देखभाल खर्च असल्याने सौर पॅनेलला एकदा बसवल्यावर खूप कमी देखभालीची गरज असते. यामुळे राज्यातील अनेक उद्योजकांनी उच्च प्रारंभिक खर्च: सौर पॅनेल, इनव्हर्टर आणि बॅटरी खरेदी व स्थापनेसाठी सुरुवातीला मोठी गुंतवणूक करावी लागते. ढगाळ वातावरण, पाऊस किंवा रात्रीच्या वेळी वीज निर्मिती होत नाही, ज्यामुळे साठवणुकीसाठी (बॅटरी) अतिरिक्त खर्च लागतो. सौर फार्म किंवा मोठ्या प्रकल्पांसाठी भरपूर जमिनीची किंवा छताच्या जागेची आवश्यकता असते, सध्याच्या बॅटरी महाग आहेत आणि त्यांची कार्यक्षमता मर्यादित आहे, ज्यामुळे रात्रंदिवस अखंड वीजपुरवठा कठीण होतो. वरील निर्णयामुळे राज्यात सध्या बहरत चाललेल्या सोलर व्यवसायावर आणि त्यावर अवलंबून असलेल्या लाखो रोजगारांवर हा निर्णय 'वरवंटा' फिरवणारा आहे. एकीकडे आपण प्रगतीची स्वप्ने पाहत आहोत, तर दुसरीकडे अशा धोरणांमुळे महाराष्ट्रातील उद्योगधंदे परराज्यात स्थलांतरित होण्यास भाग पडत आहेत. राज्याच्या ऊर्जा मंत्र्यांनी आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशीही मागणी तामलवाडीच्या उद्योजकांनी केली आहे.



## सांगोल्यात भगवान परशुराम जन्मोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० एप्रिल-**

भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्त सांगोल्यात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन आणि अभिषेक करून शहरातून मोटारसायकल रॅली काढण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी रंगभरण व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सांगोल्याचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे व करकंबचे हभप श्रीकांत आरोळे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी हभप श्रीकांत आरोळे यांनी आपल्या व्याख्यानातून भगवान परशुराम यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

हा उत्सव यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर कुलकर्णी, डॉ. मानस कमलापूरकर, श्रीकांत हसबनीस, निलेश ताकभाते, मंगेश कुलकर्णी, श्रीनाथ बिडकर, रवी कुलकर्णी, ओंकार कुलकर्णी, तेजस कुलकर्णी, अनिल कुलकर्णी, संजय हसबनीस, शिरीष कुलकर्णी, श्रीपाद वांगीकर, नागेश जोशी, कुमार कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे, प्रा.राजेंद्र ठोंबरे, ॲड.सारंग वांगीकर, संचित जोशी, दीपक कुलकर्णी, गणेश देशपांडे, ज्ञानेश लऊळकर, मंथन बेले, समर्थ देशपांडे, श्रीनिवास देशपांडे, सचिन बेले, कौस्तुभ भोसेकर, प्रा.बी.एच कुलकर्णी, हभप सुभाष लऊळकर, अनिता बेले, श्रद्धा देशपांडे, अश्विनी कुलकर्णी, वैष्णवी लऊळकर यांनी परिश्रम घेतले.

## निबंध स्पर्धेत योगिता पवार प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

येथील वीरशैव लिंगायत प्रतिष्ठानच्यावतीने महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त आयोजित निबंध स्पर्धेत योगिता पवार यांनी खुल्या गटात प्रथम क्रमांक मिळविला.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते, पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, डॉ. मल्लिकार्जुन तरनळी, गुड्डापूर देवस्थानचे सिद्धया स्वामी-हिरेमठ,बसवराज सलगर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या स्पर्धेसाठी शहर व जिल्ह्यातून तीनशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.विजेत्या स्पर्धकांना फेटा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, लक्ष्मीकांत बिराजदार, अनिल वजीरकर, शशी बिराजदार, मल्लेश पुरवंत, तम्मा कडगंची, शैलजा पुरवंत यांनी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजणार्थ)**

**खुला गट** : योगिता पवार, नर्मदा कनकी, प्रशांती काटवे, साक्षी सुराणा, रामकृष्ण अघोर, सुनील अवसेकर, शैलेंद्र पाटील, मयुरी कबाडे. **शालेय गट** : निहारिका सामलेटी, सदिच्छा माने, भाग्या हिप्परगी, ऋतुजा जाधव, सुकन्या माने, आरव तमशेट्टी, वैष्णवी गदगीमठ

## गरोदर तरुणीचा भिंतीवर डोके आपटून खून

### लग्न लावून न दिल्याचा राग, मारेकरीची पोलिस कोठडीत रवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

आपल्या सोबत लग्न लावून न दिल्याचा राग मनात धरून एका तरुणाने एका नऊ महिन्याच्या गरोदर तरुणीचा गळा आवळला व डोके भिंतीवर आपटून तिचा निर्दयपणे खून केल्याची घटना लष्कर परिसरात अलकुंटे चौक येथे रविवारी दुपारी घडली. दरम्यान याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात रात्री उशिरा मारेकरी तरुणाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात येऊन त्याला अटक करण्यात आली आहे .

बापू सुरेश आरगोड (वय-२६ वर्षे, रा-१९५ , उत्तर सदर बझार, सिंहगर्जना मंडळाजवळ सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत लक्ष्मी राम म्हेत्रे (वय-५५ वर्षे, रा-अलकुंटे चौक बाळप्पा तालीम, उत्तर सदर बझार सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. सोनी गणेश रामपुरे (वय-१९ वर्षे) असे मयत गरोदर मुलीचे नाव आहे.

यातील फिर्यादी लक्ष्मी म्हेत्रे व फिर्यादीची मयत मुलगी सोनी रामपुरे या दोघी रविवारी दुपारी घराबाहेर बसलेले असताना त्यांच्या गल्लीत राहणारा यातील आरोपी बापू आरगोड यांने घरातील साऊंडवर मोठयाने गाणे लावून गल्लीतील लहान मुलासोबत नाचत व गोंधळ घालत होता. फिर्यादीने माझी मुलगी ९ महिन्याची गरोदर आहे, तिला धक्का लागेल, तु साऊंड बंद करून नाच, गाणे व गोंधळ घालणे बंद कर असे आरोपीला म्हटले. मात्र अरोपीने यातील मयत सोनी हिचे त्याच्याबरोबर लग्न न लावून दिल्याचा राग मनात धरून फिर्यादीस शिवीगाळ करून धक्का देवून खाली पाडले. त्यानंतर फिर्यादीची मुलगी सोनी ही ९ महिन्याची गरोदर असल्याचे माहित असताना देखील तिला एका हाताने तोंड व दुसरे हाताने गळा दाबून तिचे डोके भिंतीवर जोरात आदळले. यात मुलगी सोनी हीच जागीच मृत्यू झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या खुणाबाबत रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात येऊन आरोपीला अटक करण्यात आली. त्याला सोमवारी (दि. २०) दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक गजानन पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## निधन वृत्त...



### शिवशरण कलशेट्टी

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

भवानी पेठ येथील रहिवासी व प्रसिद्ध तेलाचे व्यापारी शिवशरण गुरुलिंगप्पा कलशेट्टी (वय ८७) यांचे रविवार, दिनांक १९ एप्रिल रोजी रात्री दहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर तुळजापूर वेस येथील लिंगायत स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते वीरशैव कलशेट्टी तेली समाजाचे विश्वस्त व सोलापुरातील तेल सहकारी संस्थेचे माजी चेअरमन होते.



### भारताबाई दंडगळ

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

जुन्या विडी घरकुल येथील रहिवासी कुरुहिनशेट्टी समाजातील ज्येष्ठ नागरिक भारताबाई दंडगळ यांचे दि. १९ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६८ वर्षे होते.



### शिवलाल काळे

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

जुळे सोलापूर परिसरातील मीरा नगर येथील रहिवाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक शिवलाल बापूराव काळे यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी सोमवारी पहाटे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. शिवलाल काळे हे भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. ते नेहमी सामाजिक कार्यात सक्रिय असायचे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ते अध्यक्ष होते.



### व्यंकटेश गाडी

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

अक्कलकोट रोडवरील कोंडानगर येथील रहिवासी व्यंकटेश बालय्या गाडी (वय ८५) यांचे सोमवार, दि. २० एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता राहत्या घरापासून निघणार आहे

## नवरंगे बालकाश्रमातील अनाथ बालकास मिळाले पालक

### नागपूरच्या दाम्पत्यांना बाळ देऊन दत्तकविधान प्रक्रिया पूर्ण

**पंढरपूर, दि. २० एप्रिल-**

पंढरपूर येथील वा. बा. नवरंगे बालकाश्रम शिशुगृह येथील अनाथ बालकाचा दत्तकविधान सोहळा पार पडला. सहाय्यक पोलिस अधिक्षक डॉ. प्रशांत डगळे यांच्या हस्ते नागपूर येथील दाम्पत्यांना बाळ देवून दत्तकविधान प्रक्रिया पूर्ण केली.नागपूर येथील दाम्पत्यांनी केंद्रीय दत्तक-ग्रहण संसाधन प्राधिकरण (सीएआरए) या संकेतस्थळावर चार वर्षापूर्वी नाव नोंदणी केली होती. सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करून शनिवारी (दि.१८) दत्तकविधान प्रक्रिया पूर्ण केली. मुलांची काळजी व संरक्षण (जे.जे.ॲक्ट), मुलांच्या सोयी-सुविधा, दत्तकप्रक्रिया, प्रवेश प्रक्रीया याबाबत सहाय्यक पोलीस अधिक्षक डगळे यांनी माहिती घेतली तसेच संस्थेत कायदेशीर व सुरक्षित कामकाज होत असल्याचे समाधान व्यक्त केले. यावेळी अधिक्षिका राजश्री गाडे, वरिष्ठ लेखाधिकारी धर्मराज डफळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## घरगुती वादातून कीटकनाशक औषधाचे प्राशन

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

घरगुती वादातून एका तरुणाने कीटकनाशक औषध पिल्याची घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमन गावात आज सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता घडली. खंडूराव भुजंग लंबे ( वय ३७ वर्ष, राहणार कळमन)असे त्या तरुणाचे नाव असून त्याने आज राहत्या घरात घरगुती वादातून किटकनाशक औषधे पिले . याचा त्रास होऊ लागल्याने त्याला वडाळा येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात मेव्हणा अमोल भोसले यांनी सायंकाळी पाच वाजता दाखल केले.



## बसवेश्वरांनी सामान्य माणसाला संस्कार संपन्न बनविले

### डॉ. भीमाशंकर बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० एप्रिल-**

आचारवे स्वर्ग अनाचारवे नरक हा सिद्धांत मांडून म. बसवेश्वरांनी चांगल्या आचरणाचे महत्त्व आधोरेखित केले. वाईट गोष्टी आपोआप येतात. चांगले विचार मात्र जाणीवपूर्वक रुजवावे लागतात. सामान्य माणसाच्या आदर्शवत आचरणामुळे समाजात क्रांती होते. म्हणून म. बसवेश्वरांनी सामान्य माणसाला केंद्र बिंदू मानून त्याला संस्कार संपन्न बनविले, असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले.

वीरशैव सेवा मंडळ, पूर्व विभाग आयोजित बसवजयंती कार्यक्रमात ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, आचरण कसे असावे या संदर्भात म. बसवेश्वर म्हणतात चोरी करू नका, खोटं बोलू नका, स्वतः विषयी कौतुक करू नका, मोठ्यांना सन्मान द्या. हीच अंत:रंगाची शुद्धी, हीच बहिरंगाची शुद्धी, हीच कुडलसंगमाची पूजा आहे. मनातील अंधश्रद्धा काढून त्याला डोळस बनविण्याचे कार्य म. बसवेश्वरांनी केले.म. बसवेश्वरांनी आपले जगणे समाजाप्रती समर्पित केले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी म. बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी म. बसवेश्वरांचे वचन श्रीशैल शिळळे यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवकर्णी पाटील यांनी केले. कार्यक्रमास दयानंद माशाळ, संगमेश्वर पायमल्ले, राजकुमार बिराजदार, ॲड काशिनाथ रूगे राजशेखर मळेवाडी,गुरुनाथ हत्तीकाळे व नागरिक उपस्थित होते. प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## जिजामाता उद्यानाचे काम निकृष्ट दर्जाचे, कामातील भ्रष्टाचार लपविण्यासाठीच उद्घाटनाचा घाट

### मनसे नेते दिलीप धोत्रे यांचा आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० एप्रिल -**

शहराच्या मध्यवर्ती भागातील जिजामाता उद्यानाच्या नूतनीकरणाच्या कामात लाखों रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. उद्यानातील करण्यात आलेली कामे ही अतिशय निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. या संदर्भात पालिका प्रशासनाला आम्ही वेळोवळी निवेदन देवून देखील प्रशासनाकडून संबंधित काम केलेल्या ठेकेदाराला पाठीशी घातले गेलेले आहे. दरम्यान आज बागेच्या उदघाटनाचा देखील घाट घालण्यात आलेला आहे. उदघाटनाला आमचा विरोध नाही. मात्र निकृष्ट झालेली कामे पुन्हा दर्जेदार करुनच या उद्यानाचे उदघाटन करण्यात यावे अशी मागणी येथील मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी केली.

शहरातील जिजामाता उद्यानाच्या नूतनीकरणाच्या कामातील भ्रष्टाचारा बाबत माहिती देण्यासाठी धोत्रे यांनी खास पत्रकार परिषदेचे आयोजन केलेले होते. यावेळी पत्रकारांना त्यांनी उद्याना मध्ये नेऊन केलेल्या कामांची पोलखोल देखील करुन दाखविली.

श्री. धोत्रे म्हणाले, जिजामाता उद्यान हे पंढरपूरातील बच्चे कंपनींच्या मनोरंजनाचे एक महत्वाचे ठिकाण आहे. या ठिकाणची कामे ही दर्जेदार होणे अपेक्षीत आहे. मात्र या उद्यानातील अनेक कामे दर्जेदार झालेली नाहीत. उद्यानातील पेव्हर ब्लॉंक व्यवस्थीत बसविण्यात आलेले नाहीत. अनेक ठिकाणी जी खेळणी बसविलेली आहेत ती जुनीच असून तिलाच रंगरंगोटी करुन ती नव्याने लावली असल्याची किमया ठेकेदाराकडून केली गेली असल्याचा आरोप देखील धोत्रे यांनी यावेळी केला.

या संदर्भात आम्ही पालिका प्रशासनाचे लक्ष वेधलेले होते. मात्र नगरअभियंत्याने दुर्लक्ष करुन संबंधित ठेकेदारांने केलेला भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे निकृष्ट कामे केलेल्या ठेकेदाराला पाठिशी घालणाऱ्या पालिकेच्या नगरअंभियत्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी धोत्रे यांनी पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केलेली आहे.

**उद्घाटनाशी पालिकेचा संबंध नाही**

दरम्यान जिजामाता उद्यानातील नूतनीकरणाच्या कामांचे उदघाटन सोमवारी (ता.२०) करण्यात येणार असल्याची पत्रिका समाजमाध्यमांवर प्रसिध्द झालेली आहे. मात्र या उद्घाटनाची पालिकेचा कोणताही संबंध नाही असे पालिकेकडून सांगण्यात आल्याची माहिती मनसेचे नेते दिलीप धोत्रे यांनी पत्रकार परिषदे मध्ये बोलताना दिली. त्यामुळे ठेकेदाराचा भ्रष्टाचार लपविण्यासाठीच काही मंडळींनी हा उद्घाटनाचा घाट घातलेला असल्याचा देखील आरोप धोत्रे यांनी केला आहे.

# शाळांतील भरती आता ऑनलाईनच; शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी पवित्र पोर्टल

### अल्पसंख्याक संस्थांसाठी स्वतंत्र यंत्रणा प्रस्तावित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

जिल्हा परिषद आणि बिगर अल्पसंख्यांक शाळांमधील शिक्षक भरतीप्रमाणेच खासगी अनुदानित संस्थांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरतीही 'पवित्र' पोर्टलद्वारे ऑनलाइन करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. अल्पसंख्याक शाळांसाठी स्वतंत्र भरती पोर्टल विकसित करण्याची तयारी आहे.

राज्यातील अनेक खासगी अनुदानित संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती संस्थाचालकांच्या मर्जीप्रमाणे होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. काही संस्थांमध्ये एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांची नियुक्ती झाल्याची उदाहरणेही चर्चेत होती. सध्या बिगर अल्पसंख्यांक शाळांमधील शिक्षक भरती 'पवित्र' पोर्टलद्वारे केली जाते. या प्रणालीमुळे उमेदवारांची गुणवत्ता, आरक्षण, उपलब्ध पदे आणि निवड प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडते. आता हीच प्रणाली पुढे विस्तारत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठीही लागू केली जाणार आहे. अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांसाठी



स्वतंत्र नियमावली असल्याने त्यांच्या भरती प्रक्रियेवर शासनाचे थेट नियंत्रण मर्यादित आहे. मात्र, अशा संस्थांनाही शासनाकडून वेतन दिले जात असल्याने पदभरतीत पारदर्शकता आवश्यक असल्याची भूमिका शिक्षण विभागाने घेतली आहे. नवीन ऑनलाइन प्रणालीमुळे संस्थांना मंजूर पदसंख्येपेक्षा एकही पद अधिक भरता येणार नाही. कोणत्या संस्थेत किती पदे मंजूर आहेत, किती रिक्त आहेत आणि कोणत्या पदासाठी भरती सुरू आहे, याची संपूर्ण माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध राहणार आहे.

**शालार्थ आयडी प्रक्रियेतही बदल :** भरतीनंतर शिक्षक किंवा कर्मचाऱ्यांना वेतनासाठी आवश्यक असणारा शालार्थ आयडी देण्याच्या प्रक्रियेतही बदल करण्यात आले आहेत. यापूर्वी शिक्षणाधिकाऱ्यांची मान्यता मिळाल्यानंतर प्रस्ताव उपसंचालक कार्यालयात जात असे.

**अधिकाऱ्यांच्या मान्यतेने आयडी :** आता उपसंचालकांच्या आधार लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी येईल. तो ऑनलाइन प्रणालीत नोंदवल्यानंतरच शालार्थ आयडीची प्रक्रिया पुढे जाईल. त्यामुळे कोणाला, केव्हा आणि कोणत्या अधिकाऱ्यांच्या मान्यतेने आयडी देण्यात आला, याची संपूर्ण नोंद उपलब्ध राहणार आहे.

**पारदर्शकतेकडे मोठे पाऊल :** माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. श्रीराम पानझडे यांनी सांगितले की, बिगर अल्पसंख्यांक शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरती आता पवित्र पोर्टलमधूनच होईल. अल्पसंख्याक शाळांमधील भरतीवर नियंत्रणासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

# पालिकेतील विशेष सात समिती सदस्यांची नियुक्ती जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत महिला व बालकल्याण समिती, मंड्यान नि उद्यान समिती, कामगार व समाज कल्याण समिती, विधी समिती, शहर सुधारणा समिती, स्थापत्य समिती, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती या समित्यांची सदस्यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली.



**महिला व बालकल्याण समिती :** सुनिता कामाठी, मंदाकिनी तोडकरी, वंदना गायकवाड, मृण्मयी गवळी, पूजा वाडेकर, श्वेता खरात, सुमन चाबुकस्वार, निर्मला जंगम, सफिया चौधरी.

**मंड्या आणि उद्यान समिती :** अर्चना वडनाल, पूनम काशीद, स्वाती बडगु, शिवानंद पाटील, किसन जाधव, संगीता शिवाजी जाधव, विजया खरात, गौतम कसबे, अनिसा मोगल.

**कामगार व समाज कल्याण समिती :** श्रीदेवी फुलारे, राजेश्री धोडमनी , सिद्धेश्वर कमटम, शेखर इगे, मीनाक्षी कडगंची, समाधान आवळे, श्रद्धा पवार, बसवराज केंगनाळकर, वहिदाबानो शेख.

**विधी समिती :** प्रशांत पल्ली, नारायण बनसोडे, व्यंकटेश कोंडी, दीपिका यलदंडी, राजश्री कणके, चैत्राली गायकवाड, सत्यजित वाघमोडे, सारिका खजूरगी, अकिला भागानगरी.

**शहर सुधारणा समिती :** सात्विक बडवे, मधुसूदन जंगम, अंबिका गायकवाड, संजय कोळी, स्वाती बडगु, उज्वला दासरी, बबीता धुम्मा, कविता गज्जम, अजरोद्दीन जहागीरदार.

**स्थापत्य समिती :** वैभव हत्तुरे, विनायक विटकर, विजय चिप्पा, अजय पोन्नम, मेघनाथ येमूल, विनोद भोसले, दीपक जमादार, रवी कय्यावाले, तौफिक हत्तुरे.

**वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती :** किरण देशमुख, मंजिरी किल्लेदार, गीता गवई, वनिता पाटील, युवराज सरवदे, प्रवीण दर्गोपाटील, आरती वाकसे,सुनील खटके, अकिला भागानगरी.

# विकासावरुन लक्ष विचलित करणे चुकीचे, माहिती घेऊन वक्तव्य करा : पालकमंत्री

### करदात्यांवर अतिरिक्त कराचा बोजा टाकला जाणार नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

शहरातील विकास कामांवरून काही शक्ती जाणीवपूर्वक लक्ष इतरत्र वळवत असल्याची खंत व्यक्त करत, हे अत्यंत चुकीचे असल्याचे स्पष्ट मत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, आमदार देवेंद्र कोठे, सभागृह नेते नरेंद्र काळे उपस्थित होते.

विविध प्रश्नांवर काही नेत्यांकडून पुरेशी माहिती न घेता केली जाणारी वक्तव्ये आहेत. कोणत्याही विषयावर भाष्य करण्यापूर्वी वस्तुनिष्ठ माहिती घेणे आवश्यक असल्याचा सल्लाही त्यांनी दिला. शहरातील करदात्यांवर अतिरिक्त कराचा बोजा टाकला जाणार नाही. महापालिकेच्या आगामी सर्वसाधारण सभेत याच भूमिकेवर निर्णय होईल, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



विधान परिषदेच्या उमेदवारीबाबत विचारले असता त्यांनी थेट भाष्य टाळत, पक्षश्रेष्ठी जो निर्णय घेतील तो मान्य असेल, एवढ्याच शब्दांत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रतिक्रिया दिली.

**अन्यथा स्वतः निर्णय घेईल**

लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीच्या प्रलंबित प्रश्नावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, स्मशानभूमीसाठी जमिनीची मागणी रास्त असताना त्यावर जाणीवपूर्वक वाद निर्माण केला जात आहे. संबंधित दोन संस्थांनी एकत्र येऊन हा प्रश्न तातडीने सोडवावा, असे आवाहन त्यांनी केले. अन्यथा महापालिका स्वतः निर्णय घेऊन हा प्रश्न मार्गी लावेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# प्रतिकात्मक हत्तीवरुन काढण्यात आली भगवान परशुराम जन्मोत्सव मिरवणूक

### युवक-युवतींचे लेझीम, महिलांची भजनी मंडळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

भगवान परशुराम जयंतीनिमित्त भगवान परशुराम जन्मोत्सव मध्यवर्ती समितीच्यावतीने सोमवार, दि.२० एप्रिल २०२६ रोजी प्रतिकात्मक हत्तीवरुन मिरवणूक काढण्यात आली. दत्त चौक, नवी पेठ, मेकॅनिकी चौक, सरस्वती चौक, चार हुतात्मा चौक या मार्गावरुन काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत युवक-युवतींचा लेझीम ताफा आणि महिलांची भजनी मंडळे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.

महापौर विनायक कोंड्याल, नगरसेविक रोहिणी तडवळकर, सात्विक बडवे, गीता गवई, बिज्जू प्रधाने आदींच्या हस्ते भगवान परशुराम यांच्या मूर्तीचे पूजन करून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला.



दिल्लीच्या चिराग ग्रुप पथकाचे भगवान शंकराची आराधना करणाऱ्या गीतावर चित्तथरारक नृत्यासह कलशधारी महिला, अखंड विष्णूसहस्रनाम पठण करणारे मंडळ, विविध वेशभूषा केलेले कलाकार पथक सहभागी झाले होते. या मिरवणुकीत आनंद खंडेलवाल, श्रीकांत कुलकर्णी, रमण कुलकर्णी, अश्विनी जोशी, मोहनराव दाते, राजू अवस्थी, दीपक वाजपेयी, अमृता गोसावी, प्रा.मोहिनी पतकी, संतोष पंतोजी, बजरंग कुलकर्णी, राम तडवळकर, निशिकांत खेडकर, उमेश काशीकर, दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, सतीश पाटील, सुशांत कुलकर्णी यांच्यासह बहुभाषिक ब्राम्हण समाजबांधव मोठ्या संख्येने सामील झाले होते. दिल्ली येथील चिराग ग्रुपच्या २५ कलाकारांनी विविध पारंपारिक वेश परिधान करुन शंकर, पार्वती, अघोरी नृत्य, राधा किशन, बाहुबली हनुमानाचे नृत्य सादर केले. दहा भक्तगण विष्णुचे दशावतारातील वेशभुषा परिधान करुन रथावर आरुढ झाले होते. झाशीची राणी लक्ष्मीबाई, बाजीराव पेशवे यांची वेशभुषा घालून घोड्यावर आरुढ होते. बाळ गंगधार टिळक, चंद्रशेखर आझाद, वीर सावरकर, मंगल पांडे आदींचे वेशभुषा परिधान करुन मिरवणुकीत सहभागी झाले होते.

# महागाईवर मात करत सोन्याची विक्रमी खरेदी; कोट्यवधी रुपयांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

महागाईवर मात करत सोलापूरकरांनी अक्षय्य तृतियेच्या मुहुर्तावर सोन्याची विक्रमी खरेदी केली. सोने, चांदीसह वाहन, रिअल इस्टेट, इलेक्ट्रॉनिक्स बाजारात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली. दरम्यान, सोन्याच्या वाढत्या किमतींमुळे यंदा खरेदीवर परिणाम होईल, अशी चर्चा बाजारात होती. मात्र सोलापूरकरांनी हा अंदाज खोटा ठरवत सराफ बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी केली.

लग्नसराईचा हंगाम जवळ आल्याने हार, नेकलेस, अंगठ्या, बांगड्या, मंगळसूत्र, कानातील दागिने अशा वस्तूंच्या खरेदीला मोठी मागणी दिसून आली. गुंतवणुकीच्या दृष्टीनेही अनेकांनी सोन्याची नाणी, बिस्किटे आणि वेढणी खरेदी करण्यास प्राधान्य



दिले. अधिक मासानिमित्त चांदीच्या वस्तू, नाणी, पूजेच्या वस्तू आणि भेटवस्तूंच्या खरेदीलाही चांगला प्रतिसाद मिळाला. सोन्याचे भाव वाढले असले तरी ग्राहकांचा उत्साह कमी झालेला नाही. उलट अक्षय्य तृतीयेनिमित्त खरेदीसाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला आहे. यंदाचा मुहूर्त व्यापारासाठी अत्यंत सकारात्मक ठरला, असे अविनाश डिझाईन्सचे अविनाश पंडित यांनी सांगितले. दरम्यान, अक्षय्य तृतीयेनिमित्त घरे, प्लॉट, प्लॅट खरेदीसाठी नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात आले. पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे नागरिकांचा कल ई-स्कूटर, ई-बाईक आणि इलेक्ट्रिक चारचाकीकडे वाढला आहे. शहरातील विविध वाहन शोरूममध्ये दिवसभर ग्राहकांची गर्दी होती. अंदाजे ६०० हून अधिक दुचाकी आणि १०० हून अधिक चारचाकी वाहनांचे वितरण करण्यात आले.वाढत्या कडक उन्हाच्या पार्श्वभुमीवर इलेक्ट्रॉनिक्स मार्केटमध्ये इन्व्हर्टर एसी, एअर कूलर, मोठ्या क्षमतेचे फ्रिज, वॉटर कूलर आणि पंख्यांच्या विक्रीत मोठी वाढ झाली. ग्राहकांनी जुन्या वस्तू एक्सचेंज करून नव्या वस्तू खरेदी करण्यावर भर दिला.

कृषी उत्पन्न बाजार समितीत केशर, हापूस आणि स्थानिक आंब्यांची मोठी आवक झाली होती. दिवसभरात शहरात सुमारे २५ टनांहून अधिक आंब्यांची विक्री झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला.

### मिरवणुकीत डीजे; सातजणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

पोलिस आयुक्तांनी काढलेल्या निर्देषांकडे दुर्लक्ष करून डीजेवर मोठमोठ्याने गाणे लावून शांततेचा भंग केल्याप्रकरणी सात जणांवर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आम्रपाली चौक मंडळाचे अध्यक्षासह कपिल सुरवसे, आकाश नागनाथ वामणे, साजन गायकवाड, आदित्य सोनकांबळे, बाबू घागरे, अविनाश गायकवाड, न्यू बुधवार पेठ येथील आम्रपाली बहुउद्देशीय सामाजिक संस्था (सर्व रा. सोलापूर) , प्रेम संजय पवार (रा. श्रध्दा कॉलनी पिंपरी चिंचवड, पूणे) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

# 'शिवरत्न'तर्फे अकलूजमध्ये रोजगार मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० एप्रिल-**



आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अकलूज येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवरत्न शिक्षण संस्था व श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे अशी माहिती शिवरत्न संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यांनी दिली.






या नोकरी मेळाव्यात विविध कंपन्यांमध्ये ७०० पेक्षा अधिक पदांसाठी भरती होणार असून नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे परिसरातील बेरोजगार युवक-युवतींसाठी ही एक मोठी संधी ठरणार आहे. मेळाव्याचे आयोजन दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी १०:०० वाजता शिवरत्न नॉलेज सिटी, शिवामृत रोड, शंकरनगर, अकलूज येथे करण्यात आले आहे. उमेदवारांनी आपले अद्ययावत बायोडेटा, शैक्षणिक कागदपत्रे व आवश्यक प्रमाणपत्रांसह उपस्थित राहावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

# जि.प. स्वीकृत सदस्यांसाठी लवकरच नवा शासन निर्णय

### अनेक इच्छुकांसह नेते मंडळींना दिलासा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० एप्रिल-**

जिल्हा परिषद स्वीकृत सदस्यांसाठी राज्य शासन लवकरच नवा शासन निर्णय जाहीर करणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. या निर्णयामुळे राज्यातील स्वीकृत सदस्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत असून, त्यांच्या अधिकार, मानधन, कामकाजाची भूमिका आणि नियुक्ती प्रक्रियेत सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या नव्या शासन निर्णयावर राज्यपालांची स्वाक्षरी झाली आहे. उर्वरित प्रकिया ही विचाराधीन आहे. ग्रामीण भागातील विकास प्रक्रियेत अनुभवी आणि सामाजिक जाण असलेल्या व्यक्तींचा सहभाग वाढावा, हा शासनाचा उद्देश आहे. त्यामुळे स्वीकृत सदस्यांच्या भूमिकेला अधिक बळ देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेतला जाणार आहे.

जिल्हा परिषद प्रशासनातील स्वीकृत सदस्यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक, सहकार, महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास आणि स्थानिक प्रशासनाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना या माध्यमातून संधी दिली जाते. मात्र, गेल्या काही वर्षांत स्वीकृत सदस्यांच्या अधिकारांबाबत, सहभागाबाबत आणि प्रशासकीय स्पष्टतेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होते.




# तामलवाडी गणातील जनता दरबारात ४६ तक्रारी दाखल

### सर्व तक्रारींचा लवकरच निपटारा: सभापती देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे पंचायत समिती गणातील नागरिकांसाठी सोमवारी आयोजित केलेल्या जनता दरबारात ४६ तक्रारी दाखल झाल्या असून, विविध खात्यां अंतर्गत दाखल झालेल्या त्या तकारीचा निपटारा प्रशासन स्तरावर करून सर्वसामान्यांना लवकरच न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

विकासाच्या योजना लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहचविण्यासाठी आम्ही कटिबध्द आहोत, असे आश्वासन पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह देशमुख यांनी आज (दि. २०) जनता दरबारात दिले. सोमवारी आयोजित जनता दरबाराचे उद्घाटन मान्यवराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभापती विक्रमसिंह देशमुख, जि. प. सदस्य निवृत्ती माळी, शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ गवळी, भाजपा नेते यशवंत लोंढे, उपसरपंच सुधीर पाटील, दैनिक तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, माजी सरपंच दत्तात्रय वडणे, भाऊसाहेब पाटील, माजी जि. प. सदस्य वसंत वडगावे, दिपक आलुरे, माजी उपसभापती दत्तात्रय शिंदे, मल्लिकार्जुन मसुते, सिकंदर बेगडे, बसवणप्पा मसुते, ग्रामसेवक चैतन्य गोरे यांची उपस्थिती होती. या जनता दरबारात संजय निराधार योजना, गावातील शेतरस्ते, गटार योजना, ग्रामपंचायत, पंचायत समिती, महसुल आदी विविध खात्या अंतर्गत ४६ तक्रारी अर्ज दाखल झाले आहेत. त्याचा निपटारा प्रशासन स्तरावर करून न्याय देण्याचा प्रयत्न करू, असे सभापती देशमुख यांनी सांगितले. या जनता दरबारास पंचायत समिती गणातील सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी कार्यकर्ते, आरोग्य सेविका यांच्यासह बाबा गुंड, हनुमंत जाधव, बापुसाहेब दराडे, भिमराव झाडे, विस्तार अधिकारी नडगीरे, आनंदा रणसुरे, तलाठी बालाजी लाकाळ, पांडुरंग लोंढे, बाळासाहेब जगताप, शाहीर गायकवाड, शिवा माळी, दस्तगीर शेख, श्रीकांत गायकवाड, शशिकांत गायकवाड यांच्यासह भागातील नागरीक उपस्थित होते.

# उष्णतेचा भडका कायम; सोमवारी ४० अंशावर

### काही भागात अवकाळीची धोऽऽधो

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० एप्रिल-**

दररोजच दुपारी उन्हाचा कडाका वाढत असून, सायंकाळी अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस धोऽऽ धो कोसळत आहे. यामुळे दुपारी कडक ऊन अन् सायंकाळी अवकाळी पाऊस, वादळी वारे, गारांचा पाऊस असे चित्र पाहायला मिळत आहे.

गेल्या आठवड्यात सोलापूर जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेने अक्षरशः होरपळून काढले होते.



गेल्या काही दिवसांत सोलापूरचे कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे नोंदवण्यात आले असून, वाढत्या उष्म्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते.

सोमवारी सकाळपासूनच सूर्याच्या तीव्र झळा लागण्यास सुरुवात होते. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्ते ओस पडत असून, नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळत होते. रात्री मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## बमोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**कळंब दि. २० एप्रिल :** तालुक्यातील मोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर (टप्पा क्र. १) उत्साहात पार पडले. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेत सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह एकूण १९ हून अधिक विभागांच्या विविध सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे, अकृषिक (एन.ए.) तरतुदी संदर्भात मार्गदर्शन, ई-मोजणी अर्ज, सातबारा दुरुस्ती, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र, सनद प्रक्रियेची माहिती, ग्रीस्टॅक व पी.एम. किसान नोंदणी, डिजिटल स्वाक्षरीसह सातबारा व आठअ उताऱ्यांचे वाटप, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले, तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणांचा निपटारा, भूसंपादन व अकृषिक परवानगी, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ देण्यात आले.

## धाराशिव जिल्ह्यात ३० एप्रिलपर्यंत शस्त्र व जमावबंदी लागू

तभा वृत्तसेवा

धाराशिव दि. २० एप्रिल : जिल्ह्यात एप्रिल महिन्यात होणाऱ्या विविध सण-उत्सव, यात्रा, सभा तसेच आंदोलनांच्या पार्श्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात ३० एप्रिलपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. ही माहिती अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी दिली.

दि.१२ ते २२ एप्रिल दरम्यान संत गोरोबा काका यात्रा, तसेच दि.१४ ते ३० एप्रिल दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, दि.१९ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महात्मा बसवेश्र्वर जयंती आणि परशुराम जयंती असे विविध उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होत असल्याने जिल्ह्यात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

या पार्श्र्वभूमीवर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१)(३) अन्वये दि.१६ एप्रिल २०२६ पासून मध्यरात्री ते दि.३० एप्रिल २०२६ पर्यंत संपूर्ण धाराशिव जिल्हा हद्दीत शस्त्र व जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. भडकावू घोषणा, अराजक निर्माण करणारे फलक, विटंबनात्मक कृती, असभ्य वर्तन यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

मात्र, पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह समारंभ, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम तसेच अधिकृत परवानगी असलेल्या मिरवणुकांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

# कळंब खरेदी-विक्री संघावर भाजपचे वर्चस्व

## राणाजगजितसिंह पाटील यांच्या पॅनलचा १३ जागांवर दणदणीत विजय

**तभा वृत्तसेवा**

**कळंब दि. २० एप्रिल :** कळंब तालुका शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संघाच्या चुरशीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखालील 'आई येडेश्र्वरी विकास पॅनल'ने १५ पैकी तब्बल १३ जागांवर विजय मिळवत दणदणीत यश संपादन केले.



या निवडणुकीत उबाठा शिवसेनेच्या 'शेतकरी विकास परिवर्तन पॅनल'ला केवळ २ जागांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे विरोधी पॅनलला मोठा पराभव पत्करावा लागला आहे.

या निवडणुकीत एकूण १,१८४ मतदारांपैकी ६७६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. शनिवारी सायंकाळी पार पडलेल्या मतमोजणीत सुरुवातीपासूनच भाजपच्या पॅनलने आघाडी घेतली होती. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या रणनीतीसमोर विरोधी गट टिकाव धरू शकला नाही.

विरोधी पॅनलचे नेतृत्व खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होते. मात्र, मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत भाजप पॅनलने आघाडी कायम राखत अखेर १३ जागांवर विजय मिळवला.

या निकालानंतर कळंब शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत विजयी मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांतील पराभवानंतर हा निकाल उबाठा शिवसेनेसाठी आणखी एक धक्का मानला जात आहे. तर दुसरीकडे, या विजयामुळे कळंब तालुक्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची राजकीय पकड अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे दोन बालविवाह प्रशासनाने रोखले

तभा वृत्तसेवा

धाराशिव दि.२० एप्रिल : अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर होणारे दोन बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. धाराशिव जिल्ह्यातील या कारवाईमुळे बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रशासनाची सजगता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी अक्षय तृतीयेच्या पार्श्र्वभूमीवर संभाव्य बालविवाहांवर बारकाईने लक्ष ठेवून तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हा प्रशासन, बाल संरक्षण यंत्रणा आणि चाईल्ड हेल्पलाईन १०९८ यांनी सतर्क राहून ही कारवाई यशस्वी केली. धाराशिव तालुक्यातील कुमाळवाडी व मुक्काम पोस्ट वानेवाडी येथे दोन बालविवाह होणार असल्याची माहिती चाईल्ड हेल्पलाईन १०९८ ला मिळाली. माहितीची खात्री होताच प्रशासनाने तात्काळ पावले उचलली. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि चाईल्ड हेल्पलाईनच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पथकाने संबंधित गावांमध्ये जाऊन ग्राम बाल संरक्षण समितीच्या सदस्यांसह मुलींच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी दोन्ही कुटुंबीयांना समुपदेशन करून बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत होणाऱ्या गुन्ह्याची आणि शिक्षेची सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशासनाच्या प्रभावी समुपदेशनामुळे दोन्ही ठिकाणी नियोजित बालविवाह तात्काळ थांबविण्यात आले.

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी २१ एप्रिलपर्यंत अर्ज सादर करावेत

तभा वृत्तसेवा

धाराशिव दि.२० एप्रिल : राष्ट्र व राज्य निर्मितीत युवकांची भूमिका महत्त्वपूर्ण असून त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाच्या युवा धोरणांतर्गत जिल्हा व राज्यस्तरावर युवा पुरस्कार दिले जातात. त्याच अनुषंगाने धाराशिव जिल्हा येथे सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येणार असून इच्छुकांकडून २१ एप्रिलपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.

या पुरस्कारांतर्गत जिल्हास्तरावर एक युवक, एक युवती आणि एक नोंदणीकृत संस्था यांची निवड केली जाणार आहे. व्यक्तींसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व प्रत्येकी १० हजार रुपये रोख पारितोषिक, तर संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व ५० हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

ग्रामीण व शहरी भागातील सामाजिक कार्याच्या आधारे निवड करण्यात येणार असून, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य, रोजगार, विज्ञान-तंत्रज्ञान, क्रीडा, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध, आपत्ती व्यवस्थापन, झोपडपट्टी विकास, राष्ट्रीय एकात्मता वाढविणारे उपक्रम अशा विविध क्षेत्रांतील कार्याचा विचार केला जाणार आहे.

अर्जदारांच्या कामगिरीचे मूल्यमापन मागील तीन वर्षांतील (१ एप्रिल ते ३१ मार्च) कार्याच्या आधारे करण्यात येणार आहे. सविस्तर माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम येथे संपर्क साधावा.

इच्छुक युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी आपले परिपूर्ण अर्ज २१ एप्रिल पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

## महात्मा बसवेश्वर जयंती तुळजापुरात उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

तुळजापूर दि. १९ एप्रिल : थोर क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांची जयंती तुळजापूर शहरात विविध ठिकाणी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

नळदुर्ग रोडवरील महात्मा बसवेश्र्वर चौकात सकाळी उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी व विशाल रोचकरी यांच्या हस्ते महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. तसेच वीरशैव जंगम मठात सेवानिवृत्त मुख्याध्यापक गौरीशंकर साखरे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्र्वर, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ॲड. गिरीश शेटे, गुरुनाथ बडुरे, महाबळेश्र्वर तोडकरी, प्रफुल्ल मस्के, विश्र्वनाथ शेटे, महादेव तोडकरी, कैलास मस्के, सचिन नाडापुडे, लक्ष्मण उळेकर, ॲड. मंगेश नाडापुडे, नागेश लकशेट्टी, भारत कोप्पा, राजू धरणे, नागनाथ गिराम, अभिषेक कोरे, हनुमंत भुजबळ, महेश नडमने, राहुल साखरे, पवन कोरे, प्रसाद वाले, विठ्ठल हुच्चे, प्रदीप कुंभार, ॲड. अंजली साबळे, अस्मिता शेटे, वैशाली धरणे, शुभांगी करीशेट्टी, राजश्री धरणे, हिराबाई उळेकर, वैशाली बडुरे, प्रियंका मस्के आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच नगरपरिषद कार्यालयात उपाध्यक्ष रामचंद्र रोचकरी, नगरसेवक पंडितराव जगदाळे व विशाल रोचकरी यांच्या उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## लोहारा येथे महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन



लोहारा - समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे अग्रदूत महात्मा बसवेश्र्वर महाराज यांची जयंती लोहारा शहरात दि. १९ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील महात्मा बसवेश्र्वर मंदिरात सकाळी मंत्रोच्चारांच्या गजरात विधिवत पूजा करण्यात आली. नंदी ध्वज उभारून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या मंगलमय सोहळ्यामुळे मंदिर परिसर भक्तिभावाने न्हाऊन निघाला होता.

यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य प्रतिमा पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महात्मा बसवेश्र्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन शिवसेना नेते अभिमान खराडे व उपनगराध्यक्ष अमीन सुबेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी नागांन्ना वकील, दत्ता बिराजदार, आनंद पाटील, शंकर अण्णा जट्टे, नगरसेवक प्रशांत काळे, दिपक मुळे, अविनाश माळी, जालिंदर कोकणे, पंचायत समिती सदस्य दत्ताभाऊ वाघमारे, डॉ. अमलेश्र्वर गारठे, डॉ. चंद्रशेखर हंगरगे, अमोल बिराजदार, दीपक रोडगे, श्रीकांत भरारे, हरी लोखंडे, दत्ता फावडे, राजू घोडके, रौफ बागवान, बाळासाहेब पाटील, मल्लिनाथ फावडे, ओम कोरे, बसवराज तोडकरी, श्रीशैल्य मिटकरी, संगन्ना स्वामी, बलू स्वामी, ॲड. राजू माशाळकर, शांतीविर जट्टे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरी धरणातुन कॅनॉलद्वारे सोडण्यात आलेले पाणी तात्काळ बंद करावे - शहेबाज काझी

तभा वृत्तसेवा

नळदुर्ग दि.२० एप्रिल : शहरासह तुळजापुर व अणदुर या तालुक्यातील मोठ्या गावांना येणाऱ्या काळात पाणीटंचाईचा सामना करावा लागु नये यासाठी पाटबंधारे विभागाने सध्या नळदुर्ग येथील बोरी धरणातुन कॅनॉलद्वारे सोडण्यात आलेले पाणी तात्काळ बंद करावे अशी मागणी नळदुर्गचे माजी नगराध्यक्ष व एमआयएमचे नेते शहेबाज काझी यांनी केली आहे.

सध्या अतिशय कडक उन्ह पडत असल्याने धरणातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे धरणातील पाण्याचा वापर काटकसरीने करणे गरजेचे आहे. मात्र पाटबंधारे विभागाने याकडे दुर्लक्ष केले असल्याचे दिसुन येत आहे. कारण जानेवारी महिन्यात बोरी धरणातील पाणी कॅनॉलद्वारे सोडण्यात आले होते ते आजही सुरूच आहे. या बोरी धरणामधुन नळदुर्ग शहरासह तुळजापुर, अणदुर यासह सात ते आठ लहान गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

# अक्षय तृतीयेच्या दिवशी तुळजापूरात वादळी पावसाचा कहर

तुळजापूर - अक्षय तृतीयेच्या दिवशी तुळजापूर शहर आणि परिसरात रविवारी सायंकाळी अचानक हवामानात नाट्यमय बदल झाला. दिवसभर प्रचंड उन्हामुळे नागरिक हैराण झाले होते. दुपारच्या सुमारास तापमान तब्बल ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. मात्र सायंकाळी वातावरणात अचानक बदल होत आकाशात काळे ढग दाटून आले आणि काही वेळातच विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांनी जोर धरला. मुसळधार पावसाने हजेरी लावत शहरासह परिसराला अक्षरशः झोडपून काढले. या पावसामुळे काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

अक्षय तृतीया निमित्त राज्यभरातून हजारो भाविक तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी दाखल झाले होते. सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळे दर्शनासाठी उभ्या असलेल्या भाविकांची मोठी गैरसोय झाली. भक्तांनी मंदिर परिसरातील शेड, दुकाने आणि उपलब्ध जागांमध्ये आसरा घेतला. वादळी वाऱ्यामुळे पावसाचा मारा अधिकच तीव्र झाला. वादळी वाऱ्यांचा वेग जास्त असल्याने शहरातील बाजारपेठेत अचानक पावसामुळे नागरिकांची एकच धावपळ उडाली. व्यापाऱ्यांना आपला माल सुरक्षित ठेवण्यासाठी धावपळ करावी लागली.

धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश भागात दिवसभर उष्णतेची लाट जाणवत होती. उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याची गरज निर्माण झाली होती. सायंकाळी काही भागात पावसाने हजेरी लावल्याने वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाला आणि नागरिकांना दिलासा मिळाला. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवस जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून तापमानात चढ-उतार राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करण्याबरोबरच वादळी वाऱ्यांपासूनही सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नागेवाडी येथे ग्रामदैवत जटागीर बाबा यात्रा उत्साहात

तभा वृत्तसेवा

भूम दि. २० एप्रिल : तालुक्यातील नागेवाडी येथील ग्रामदैवत श्री जटागीर बाबा महाराज यांची यात्रा विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडली. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे भाविकांसाठी दरवर्षी दिला जाणारा पारंपरिक पुरणपोळीचा महाप्रसाद.

यात्रेनिमित्त गावातील प्रत्येक घरातून गहू, ज्वारी, गूळ, तेल, तांदूळ, मसाले आदी साहित्य स्वयंस्फूर्तीने जमा केले जाते. या साहित्यापासून चैत्र अमावस्येला भव्य पुरणपोळीचा महाप्रसाद तयार करून भाविकांना वाटप केला जातो.

यात्रेनिमित्त आयोजित हरिनाम सप्ताहात दररोज नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तन सेवा, भजन, प्रवचनसेवा होती. चैत्र अमावस्येच्या दिवशी संध्याकाळी काल्याचे कीर्तन झाल्यानंतर हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रात्री श्रींची पालखी मिरवणूक वाजतगाजत काढण्यात आली. पारंपरिक मान असलेल्या घाटे यांच्या वाड्यावर पालखी नेऊन पूजा-अर्चा करण्यात आली व शोभेच्या आतिषबाजीने वातावरण दुमदुमून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी गावातून पालखी मिरवणूक काढून लांडे यांच्या घरासमोरील प्रांगणात विसावा देण्यात आला. यावेळी गावातील तरुणांनी विविध सोंगे सादर केली, तर महिला मंडळाचाही उत्स्फूर्त सहभाग लाभला.

दुपारी ग्रामस्थांच्या वतीने शेरणी वाटप व महाआरती करण्यात आली. समस्त घाटे मंडळाकडून भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यात्रेनिमित्त भारूडाचा कार्यक्रम तसेच गावकऱ्यांतर्फे भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

# आ. राणाजगजितसिंह पाटील यांचा१०८ नवे उद्योजक घडवण्याचा संकल्प

## धाराशिवच्या आर्थिक विकासासाठी 'भाजप'ची साद; ५९१ इच्छुकांची विक्रमी नोंदणी

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव दि. २० एप्रिल :** जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि स्थानिक तरुणांना रोजगारनिर्मितीकडे वळवण्यासाठी भारतीय जनता पक्षच्या वतीने महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आगामी आर्थिक वर्षात जिल्ह्यात १०८ नवयुगीन उद्योजक घडवण्याचा संकल्प करण्यात आला असल्याची माहिती आमदार राणजगजितसिंह पाटील यांनी दिली.

या उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत तब्बल ५९१ इच्छुकांनी नावनोंदणी केली आहे. १ एप्रिलपासून सुरू झालेली नोंदणी प्रक्रिया अद्याप सुरू असून, अधिकाधिक तरुणांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतः उद्योजक बनून इतरांना रोजगार उपलब्ध करून द्यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत इच्छुकांकडून सविस्तर प्रश्र्नावली भरून घेण्यात येणार असून, त्यावर आधारित छाननी करून १०८ उमेदवारांची निवड केली जाणार आहे.

**संपूर्ण मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्याची जोड**

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे निवड झालेल्या उमेदवारांना केवळ मार्गदर्शन न देता, प्रत्यक्ष उद्योग उभारणीपर्यंत सर्वंकष मदत केली जाणार आहे. यामध्ये तांत्रिक प्रकल्प अहवाल (उझठ) तयार करून देणे, बँकांकडून कर्जसुविधा उपलब्ध करून देणे, शासकीय अनुदान



मिळवून देण्यासाठी सहाय्य करणे, तसेच उत्पादनासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे.

**उद्योग निवड आणि अंमलबजावणी**

प्रक्रियेसाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र समिती स्थापन केली जाणार आहे. ही समिती अर्जांची छाननी करून उद्योगाची व्यवहार्यता तपासेल आणि गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करेल.

**आधुनिक आणि पर्यावरणपूरक उद्योगांना प्राधान्य**

या मोहिमेत पारंपरिक उद्योगांऐवजी आधुनिक आणि बाजारपेठेत मागणी असलेल्या व्यवसायांवर विशेष भर देण्यात आला आहे.

यामध्ये हायड्रोपोनिक शेती, कोयर पावडर निर्मिती, प्लास्टिक कचऱ्यापासून ग्रॅन्युल्स, व्हॅनिला व केशर शेती, शेवगा (मोरिंगा) व कांदा पावडर, सोलर ड्रायर, मोती उत्पादन, पेपर बॅग, सोया उत्पादने, प्लास्टिक रिसायकलिंग, बायोमास इंधन, फुलांपासून अगरबत्ती, तसेच ई-वेस्ट, सोलर पॅनल स्क्रॅप आणि लिथियम बॅटरी रिसायकलिंग यांसारख्या भविष्यवेधी उद्योगांचा समावेश आहे.

या उपक्रमाचा पुढील टप्पा महाराष्ट्र दिन म्हणजेच १ मे रोजी पार पडणार आहे. धाराशिव येथे आयोजित भव्य मेळाव्यात निवडक उमेदवारांना उद्योग उभारणीसाठी पुढील दिशा, तांत्रिक मार्गदर्शन आणि आवश्यक सहाय्य दिले जाणार आहे.

या उपक्रमातून १०८ सक्षम उद्योजक घडवण्याचा मानस असून, त्यातून हजारो कुटुंबांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार मिळेल, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला आहे. जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीसाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## विचार नसलेल्या व्यक्तीमुळे सामाजिक प्रदूषण वाढले : प्रा. कळमकर

**उदगीर तभा वृत्तसेवा**

**उदगीर दि. २० एप्रिल :** ज्याच्याकडे विचार आहे अशा व्यक्तींनी व्यक्त व्हायचे असते मात्र सध्या ज्याच्याकडे विचारच नाही अशा व्यक्ती समाज माध्यमातून व्यक्त होत आहेत यामुळे सामाजिक प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढले आहे असे प्रसिद्ध व्याख्याते प्रा. संजय कळमकर यांनी सांगितले . भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्य ता. १९ रविवारी येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते . या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजय संजय कळमकर, प्रसिद्ध उद्योजक व्यंकट कुलकर्णी तर अध्यक्षस्थानी संतोष कुलकर्णी हे होते .

पुढे बोलताना संजय कळमकर यांनी सांगितले की जग आनंदीच आहे फक्त आपली त्याकडे पाहण्याची दृष्टी पाहिजे .मानसिक तणाव आपण स्वत: होऊन ओढवून घेतला आहे .मुल अनोळखी चेहऱ्याने घरी येतात त्यांच्याशी पालकांचा संवादच होत नाही , त्याच्याशी बोला , त्याच्याशी गप्पा मारा .

आनंद वाटल्याने आनंद वाढतो मात्र आम्हाला दुःख वाटायची सवय लागली आहे , दुःख सुध्दा देखणे करण्याची वृत्ती वाढली आहे .आमच्यात द्वेष तिरस्कार वाढला आहे प्रेम कमी झाले आहे , नाते संबंध टिकविले जात नाहीत यामुळे व्यक्ती अस्वस्थ आहे . यासाठी वाईट गोष्टी , नावडत्या घटना , व्यक्ती यांची आठवण डोळ्यासमोर आणण्याऐवजी चांगल्या गोष्टी , आवडत्या घटना , व्यक्ती सतत डोळ्यासमोर ठेवा , प्रत्येक घटनेकडे सकारात्मक बघण्याची दृष्टी आपल्याकडे असेल तर आनंदाच्या वाटा मोकळ्या होतात . आभासी दुनियेत राहण्यापेक्षा वाचन वाढवा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल असे सांगितले .

आपल्या अध्यक्षीय समारोपात संतोष कुलकर्णी यांनी राजकीय नेत्याच्या वाढत्या अपप्रवृत्तीला त्यांना निवडून देणारे आपण मतदारच जबाबदार असल्याचे सांगितले . कामापेक्षा प्रसिद्धीची आणि दिखाव्याचा हव्यास वाढल्याचे सांगितले .

कार्यक्रमाची सुरुवात भगवान परशुराम यांच्या प्रतिमा पूजनाने झाली ,प्रास्तविक ऋषिकेश द्वैयांपयन यांनी केले . प्रमोद राजुरकर यांनी आभार मानले . कार्यक्रमाची सांगता गोपाळ जोशी यांनी गायलेल्या पसायदानाने झाली .

प्रा. सुरज पोस्ते यांनी प्रसाद वाटपाची व्यवस्था केली होती . या वेळी परशुराम जन्मोत्सव समिती अध्यक्ष श्रीपाद करंजीकर , उपाध्यक्ष नरेंद्र घनपाठी, दिनेश देशमुख , प्रमोद राजुरकर ,पांडुरंग कुलकर्णी , संदीप नळगीरकर, विक्रम हलकीकर , व्यास द्वैयपायन, आदित्य कुलकर्णी , प्रमोद कुलकर्णी , विवेक कुलकर्णी , सावन टाकसाळे , मुरलीधर जोशी , अंबादास कुलकर्णी , व्ही एस कुलकर्णी , मयूर कुलकर्णी , उषा कुलकर्णी , मंजुषा कुलकर्णी , सुनिती दंडवते, अंबिका घनपाठी , मयुरी मध्वरे, तुलसी देशमुख , गंगा पांडे , वैभवी पटवारी, पल्लवी महाजन , अपर्णा पटवारी , अनिता कुलकर्णी , सारिका धाराशिवकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते .

# औराद शहाजानी येथे चार दिवसापासून सातत्याने विद्युत पुरवठा खंडित

## ग्राहकाने गांधीगिरी पद्धतीने केले महावितरणचा जाहीर निषेध

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. २० एप्रिल : तालुक्यातील औराद शहाजानी येथे** चार दिवसापासून महावितरणच्या गलथान कारभारामुळे विद्युत पुरवठा सातत्याने खंडित होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा, शेती, व्यापार, उद्योग, बँक , शिक्षण आदी अत्यावश्यक सुविधा कोलमडल्याने नागरिक व्यापारी त्रस्त झाले असून सोमवारी औराद शहाजनी येथील नागरिक शेतकरी व्यापारी यांनी येथील महावितरण कार्यालयाच्या पायऱ्यावर विधिवत पूजा करून गत तीन वर्षापासून रिक्त असलेले सहाय्यक अभियंता पद तात्काळ भरुना करून वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची सुदबुद्धी महावितरणला मिळो म्हणत गांधीगिरी करून महावितरणचा निषेध व्यक्त केला .

औराद शहाजानी येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंता पद तीन वर्षापासून रिक्त असून यांचा अतिरिक्त पदभार हा पानचिंचोली येथील कनिष्ठ अभियंता यांच्यावर सोपविण्यात आला असल्याने ते सतत गैरहजर राहतात त्यामुळे अधिकारी येत नसल्याने लाईनमन व इतर कर्मचारी कामामध्ये कुचराई करीत असल्याने दररोज विजेचा तासंतास लपंडाव सुरू असतो आणि अशातच शुक्रवारी मध्यरात्री तांत्रिक विभाग झाल्याचे कारण पुढे करत बंद झालेला विद्युत पुरवठा सोमवारी दुपारपर्यंत अधून मधून चालू होतो बंद होत राहतो अशा सातत्याने खंडपडत विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने येथील नागरिक त्रस्त झाले असून गेल्या दोन रात्र अंधारात प्रचंड उकाड्यात घामाच्या धाराने नाहुन नागरिकांना काढाव्या लागल्या यातच गेल्या दोन आठवड्यापासून या भागामध्ये तापमानाचा पारा ४३ अंश जवळपास पोहोचल्याने अंगाची लाही लाही होत आहे अशा परिस्थितीत घरामध्ये विद्युत पुरवठा सुरळीत नसल्याने घरात बसता येईना व्यापारात विद्युत पुरवठा सुरळीत नसल्याने बँका पाणी शैक्षणिक सुविधा उद्योग या सर्व गोष्टीवर विपरीत परिणाम झाल्याने अखेर सोमवारी सकाळी येतील नागरिक व्यापारी शेतकरी या सर्वांनी महावितरण कार्याकडे धाव घेत तेथील महावितरण कार्यालयाच्या पायरयावर हळद-कुंकू हार घालून नारळ फोडून विधिवत पूजा ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करून महावितरणला लवकरात लवकर येथील कार्यालयात कायमस्वरूपी अभियंता अधिकारी देण्याची सुदबुद्धी देवो व वारंवार खंडित होणारा विद्युत पुरवठा सुरळीत होऊन सुविधा मिळो अशी मागणी करत गांधीगिरी करून महावितरणच्या कारभाराचा निषेध व्यक्त केला



यावेळी सुधाकर कत्ते बालाजी भंडारे मल्लिकार्जुन लातूरे किरण रेड्डी लखन बोंडगे अमोल ढोरशिंगे श्याम माने बालाजी थेटे भागवत बोंडगे बाळू बिरनाळे उमाकांत सजनशेट्टी बाळू पाटील दिनकर शेटगार राजू कंदकुरे सादिक पटेल जितू वाघमारे जीवन कांबळे मच्छिंद्र कांबळे राम कांबळे व्यंकट दूधभाते सोमनाथ चिंचोळे अमोल श्रीमंगले चंद्रशेखर भंडारे यासह किराणा अडत कपडा मेडिकल सुवर्णकार हॉटेल ज्यूस सेंटर जनरल स्टोअर्स कृषी लघुउद्योग व्यापारी शेतकरी नागरिक उपस्थित होते दरम्यान या व्यापाऱ्यांच्या आंदोलनानंतर महावितरणचे निलंगा उपविभागीय अभियंता सावळे यांनी औराद भेट देऊन प्रभारी सहाय्यक अभियंता खतिब व सर्व तांत्रिक कर्मचारी यांची संयुक्त बैठक घेऊन यापुढे विद्युत वितरणात खंड न पडण्यासाठी राहिलेले कामे पूर्ण करून सुरळीत विद्युत पुरवठा करण्याच्या सूचना केल्या

## वातावरणात बदल, उकाड्यापासून दिलासा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल : कडक उन्हाच्या झळांनी हैराण झालेल्या नागरिकांना रविवारी दुपारनंतर मोठा दिलासा मिळाला. दुपारनंतर अचानक वातावरणात बदल होत आकाश ढगाळ झाले आणि उष्णतेची तीव्रता काही प्रमाणात कमी झाली. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार हा बदल अपेक्षितच होता. ढगाळ वातावरणासोबतच काही भागात वाऱ्याचीही तीव्रता वाढल्याने उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला.**

**दरम्यान, संभाव्य अवकाळी पावसाबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता असली तरी कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार या पावसामुळे शेतीपिकांचे कोणतेही मोठे नुकसान होणार नाही. उलट, खरीप हंगामाच्या पूर्व मशागतीसाठी हा पाऊस फायदेशीर ठरणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**

# शिवलिंगेश्वर फार्मसीत जीपॅट परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २० एप्रिल :** केंद्र सरकारच्या वतीने नॅशलन बोर्ड ऑफ एक्झामीनेशन इन मेडीकल सायन्सेस (एनबीईएमएस) द्वारे एम.फार्मसी पदव्युत्तर प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर एकाच वेळी घेतली जाणारी चाचणी परीक्षेत तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जीपॅट-२०२६ मध्ये नेत्रदिपक यश संपादन करुन महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



या परीक्षेमध्ये हर्ष मोरे रँक १८०८, रेश्मा सुर्यवंशी २३५७ , मुस्कान सुलतान शेख २६१९, सागर जाधव २८९४, दिव्या तपासे ४०४८. या परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय पातळीवर पदवीधर एम. फार्मसी प्रवेशास प्राधान्य दिले जाते. तसेच शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदत देखील जीपॅट स्कोअर आधारावर दिली जाते.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे महाविद्यालयाच्या वतीने आयआयएम टेड एक्स, कॅम्पस भरती तज्ज्ञ आणि प्लेटलेट दानाचे सदिच्छा दूत विश्र्वजीत काशीद, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे यांच्या शुभहस्ते रोख पाच हजार रुपये, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे, दिनेश गुजराथी, डॉ. समीर शफी, डॉ. सचिन हंगरगेकर, किरण रोडगे, मयुरी चंद्रवंशी, वागदरे एस.एस., गणेश गोसावी, डॉ. प्रसाद कटारे इत्यादी उपस्थित होते.

या यशस्वी विद्यार्थ्यांना विकास मुगळे, कविता सिरगिरे, प्रियंका बंडगर, ऋतुजा भिसे, निलेश शेळके, मनिषा बेलुरे व अस्मिता झोडगे यांनी जी-पॅट परीक्षेकरीता मार्गदर्शन केले असून यांचाही सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला.

विश्वजीत काशीद म्हणाले, फार्मसी क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जीपॅट परीक्षा एक महत्त्वाची पायरी आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द आणि मेहनत कौतुकास्पद असून, त्यांनी भविष्यात अशाच प्रकारे संशोधक वृत्ती जोपासावी. संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या अत्याधुनिक सोयी सुविधां पाहुण कौतुक केले. आपण तांत्रिक शिक्षणात निपुण असाल तर आपणांस जगात भरपूर चांगल्या संधी असल्याचे यावेळी सांगितले.

प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे म्हणाले, आमच्या विद्यार्थ्यांनी केवळ महाविद्यालयाचेच नव्हे तर जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे या यशात विद्यार्थ्यासह प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा देखील सिहांचा वाटा असल्याचे मत व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, योगेश धाराशिवे, सर्व शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वैष्णवी पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. कविता सिरगिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रा. गौरी परतकर, शिवकुमार आंबुलगे, स्वामी व्ही.एम., हसन अरब, शिंदे बाबाराव, अमोल कुंभार यांनी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढाकार घेतला.

## श्रीराम विद्यालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर दि. २० एप्रिल :** श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूर येथे आज दि १९ एप्रिल रोजी महात्मा बसवेश्र्वर जयंती साजरी करण्यात आली . याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे तर प्रमूख अतिथी म्हणून याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते भूषण पनुरे , गणेश गुळवे,केदार हलकुडे,महारुद बनाळे, केदार आढळकर , प्राथमिक विद्यामंदीरच्या मुख्याध्यापक चंचला वलसे पर्यवेक्षक अनिल कुटवाड प्रा . भरत धायगुडे सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी क्रिडा विभाग प्रमूख विवेक भातीकरे,प्रा .लहुकांत शेवाळे, निलेश उगीले ,भागूराम कस्तुरे उपस्थित होते . याप्रसंगी बोलताना प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे म्हणाले की समानतेची शिकवण महात्मा बसवेश्र्वरांनी देउन अनुभवमंटपच्या माध्यमातून समाजामध्ये लोकशाहीचे बिजारोपन केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्र्वर स्वामी यांनी तर आभार प्रा लहूकांत शेवाळे यांनी केले . याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक पालक यांची उपस्थिती होती.

## देवणीत महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त ध्वजारोहण



**देवणी : येथील श्री शिवयोगी श्री गुरुलिंगेश्वर विरक्त मठामध्ये रविवारी (दि. १९) सकाळी प्रतिमा पूजन, ध्वजारोहण व मोटर सायकल रॅली आणि सायंकाळी बसव जन्मोत्सव आदी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाले.**

**कार्यक्रमाच्या सुरुवातीला जेष्ठ उद्योजक मल्लिकार्जुन मानकरी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. तर दिलीप पाटील नागराळकर, तहसीलदार सोमनाथ वाडकर, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ वराडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. तर शिवयोगी श्री गुरुलिंगेश्र्वर वीरक्त मठाचे मठाधिपती म.नि.प्र सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यातआले.**

**सकाळी दहा वाजता श्री ग्रामदैवत महादेव मंदिर येथून देवणी शहराच्या प्रमुख मार्गावरून मोटरसायकल रॅली नेकनाळ पर्यंत काढण्यात आली. देवणी येथील वीरशैव लिंगायत महिला भजनी मंडळी यांच्याकडून सायंकाळी बसवेश्र्वरांचा जन्मोत्सव (पाळणा) घालण्यात आला. यानंतर भजन व प्रसाद करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.**

**यावेळी उपनगराध्यक्ष अमित मानकरी, नगरसेवक नागेश जीवने, योगेश ढगे, माजी सरपंच बाबुराव लांडगे, सोमनाथ लुल्ले, मल्लिकार्जुन डोंगरे, हावगिराव पाटील, वैजनाथ अष्टुरे, मल्लिकार्जुन डोंगरे, बसवराज हरनाळे, बंडेप्पा मुंचळंबे, अ‍ॅड. शेषराव बिराजदा चंद्रकांत पत्री, बस्वराज बुदे, जयं समितीचे अध्यक्ष अटलविश्र्वास धनु सचिव दीपक मळभगे, उद्धव मल्लेश गिरीश पत्री, राजकुमार जीवने, सुर अंबुलगे, संतोष बेलुरे, गणेश बोंड विशाल अंबुलगे, प्रशांत बळते, मनो भद्रशेटे, अमर कोरे, गिरीश चिल्ले, शंक जीवने, विजयकुमार लुल्ले, मयूर पट जितेंद्र शिवगे, राहुल मंत्री, राजू जिवण शंकर जीवने, अविनाश धनूरे, अमि सौंदाळे, ईश्र्वर पाटील, मनोज बुव वेंकटराव चिद्रेवार, सुमित रोटे, मनो पाटील, बालाजी सुर्यवंशी, आश्रिव लांडगे, बसवराज ईश्र्वरशेट्टे, सोमना लद्दे आदींसह बसव भक्त व महिल मंडळी उपस्थित होते.**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार देशाला दिशादर्शक : डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. २० एप्रिल :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या आणि उद्याच्या भारतासाठी दिशादर्शक अशा स्वरूपाचे असल्याचे प्रतिपादन युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.



तालूक्यातील मौजे गुगदळ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरून ते बोलत होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर उपसरपंच शामाबाई कदम, प्रदीपजी खोमणे, प्रा. डॉ. अमोल वाघमारे, पत्रकार शिवाजीराव गायकवाड, अजय भालेराव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पूढे बोलताना डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की, शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीवर चालत समाजाने आपली प्रगती साधली पाहिजे. सामाजिक विषमता, अन्याय आणि भेदभाव याविरुद्ध लढताना डॉ.बाबासाहेबांनी दिलेली संविधानिक ताकद आणि वैचारिक ऊर्जा हीच आपली खरी शक्ती आहे. आज प्रत्येक नागरिकाने संविधानाचा सन्मान ठेवून समानतेचा मार्ग स्वीकारला, तरच भारत खऱ्या अर्थाने प्रगत आणि समतामूलक राष्ट्र बनेल.

गुगदळ येथील कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम केवळ जयंती साजरी करण्यापुरता मर्यादित न राहता, समाज परिवर्तनाची नवी ऊर्जा देणारा ठरला.

सूरूवातीला पोलीस पाटील प्रा.डॉ.अमोल वाघमारे यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.तर उपस्थित सर्वच मान्यवरांच्या हस्ते महापूरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच सामूहिक त्रीशरण पंचशिल घेवून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या विविध स्पर्धेच्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सन्मानीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संयोजक तथा जयंती मंडळाचे अध्यक्ष बालाजी मस्के यांनी प्रभावीपणे केले.

जयंती मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाचे उपाध्यक्ष सिध्दार्थ मस्के, सचिव-रामेश्र्वर गायकवाड, उपसचिव-सतिश परतवाघ, कोषाध्यक्ष-बाबूराव शिंदे, मार्गदर्शक-अशोक परतवाघ,रामकुमार परतवाघ,बालाजी गायकवाड,दत्ता गायकवाड,वाल्मिक वाघमारे,बापूराव कांबळे,आत्माराम मस्के आदींनी पुढाकार घेतला.

## महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव साजरी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा दि. २० एप्रिल :** समतानायक महात्मा बसवेश्र्वर यांची जयंती रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी निलंगा येथे प्रतिवर्षाप्रमाणे शहरात विविध ठिकाणी सामाजिक , विधायक व धार्मिक कार्यक्रमाने मोठ्या उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली.

महात्मा बसवेश्र्वर सार्वजनिक वाचनालय, बसवसृष्टी बसवेश्र्वर नगर येथे बसव जयंतीचा मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. या ठिकाणी मठाधिपती संगनबसव महास्वामीजी, नगराध्यक्ष संजयराज हलगरकर व माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांच्या शुभहस्ते अष्ठावरण, पंचाचार , शटस्थल या लिंगायत धर्माच्या सिद्धांतावर उभारण्यात आलेल्या ध्वज कट्ट्याचे अनावरण करण्यात आले. महात्मा बसवेश्र्वराच्या प्रतिमेचे पूजन करून शटस्थल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिद्धेश्र्वर रासुरे, संतोष बिडवे राजेंद्र बिराजदार ,प्रमोद जीवने ,बसवेश्र्वर स्वामी, संदीप षटकार, अनिल बिराजदार, विजयकुमार होगाडे किरण पाटील, दयानंद मंदाडे,अनील तोंडारे,सोमनाथ राघो, वैजनाथ पुष्कर आदींनी परिश्रम घेतले

## महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त ध्वजारोहण व प्रतिमापूजन



**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर दि. २० एप्रिल :** क्रांतीसुर्य समानतेचे जनक महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८५९ व्या जयंतीनिमित्त आज महात्मा बसवेश्र्वर चौक अहमदपूर येथे राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज वाचार्य गुरुराज स्वामी महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण व प्रतिमा पूजन करण्यात आले .

महात्मा बसवेश्र्वर चौकात सिंहासनरूढ महात्मा बसवेश्र्वर प्रतिमाचे पूजन करण्यात आले तसेच राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज नगरपरिषद व्यापार संकुलासमोरील नियोजित महात्मा बसवेश्र्वर पुतळ्याच्या ठिकाणी प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले याप्रसंगी नगराध्यक्ष स्वप्निल व्हते, महात्मा बसवेश्र्वर पुतळा समितीचे साब महाजन शिवानंद हेगणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीपराव देशमुख भारत चामे नगरसेवक निखिल कासनाळे नगरसेवक संदीप चौधरी ,राहुल शिवपुजे, किशोर कोरे, नगरसेवक प्रदीप कांबळे,लक्ष्मण अलगुले, प्रतिक रेड्डी,प्रशांत भोसले,शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी देवकते , बालाजी होळकर ओम पुणे काशिनाथ गाढवे रवी महाजन प्रा. विश्र्वंभर स्वामी विकास महाजन लक्ष्मीकांत कासनाळे डॉ. सिद्धार्थ सूर्यवंशी राजकुमार कल्याने रामलिंग तत्तापूरे , राजकुमार पुणे सचिन काडवदे अभिषेक पुणे. हाके बालाजी महाजन. वैभव बलोरे, मनमत प्रयाग ,किरण भालके बालाजी आगलावे,भागवत बावचकर सह समाज बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते

## मत्स्य व्यवसायासाठी पोर्टलवर नोंदणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल :** मत्स्य व्यवसाय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभासाठी जिल्ह्यातील मत्स्य व्यवसायाशी संबंधित व्यक्ती व संस्थांनी राष्ट्रीय मत्स्य व्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्म (एनएफडीपी) पोर्टलवर आपली नोंदणी करावी, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहायक आयुक्त तेजस्विनी सिंधू प्रदीप करळे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व वैयक्तिक मच्छिमार, मत्स्यसंवर्धक, मत्स्य विक्रेते, मच्छिमार सहकारी संस्थांचे सभासद आणि मत्स्य उत्पादन शेतकरी संघांना विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी या पोर्टलवर नोंदणी असणे अनिवार्य आहे.

# औशात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २० एप्रिल :** जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ८३३ वी जयंती औसा शहर व तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील नंदीमठ येथे सकाळी सात वाजता लिंगायत समाजाचे अध्यक्ष सुभाष मुक्ता यांच्या हस्ते व हिरेमठ संस्थानचे पिठाधिपती गुरु निरंजन शिवाचार्य महाराज यांच्या सानिध्यात ध्वजारोहण करण्यात आले .



महात्मा बसवेश्वर जयंती समितीचे अध्यक्ष मुक्तेश्वर मिटकरी, सुरेश ठेसे, गुरुपदप्पा शेटे, राजभाऊ नागराळे, विजयकुमार मिटकरी,वैजनाथ सिंदूरे, अजय शेटे, महादेव कोरके, सचिन उटगे, रामलिंग स्वामी,गुरसिध्द मिटकरी ,शिवकुमार मुरगे , काशिनाथ सगरे, नगरसेवक आकाश उटगे,यांच्यासह अनेक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बसवेश्र्वर गल्लीत ध्वजारोहण, महात्मा बसवेश्र्वर व संत कक्कैय्या महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कक्कैय्या समाजाचे अध्यक्ष राजाभाऊ कटके , निवृत्ती कटके, नगरसेवक कृष्णा सावळकर व सुभाष मुक्ता यांच्या हस्ते पूजन करुन ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील गांधी चौक, हनुमान मंदिर चौक, औसा टी पॉइंट येथे प्रतिमा पूजन करण्यात आले. सायंकाळी नंदीमठ येथून महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमा व अर्धाकृती पुतळ्याची शहरातील मुख्य रस्त्यावरुन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी या शोभायात्रेत विविध कलापथक सामिल झाले होते.समाजबांधव व युवक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आजपासून जिल्ह्यात हेल्मेट सक्ती

## अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी नियम पाळणे बंधनकारक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

शासनाच्या निर्देशाप्रमाणे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यात हेल्मेट सक्ती व वाहतुकीचे नियम पाळण्याचे बंधनकारक होणार असल्याची माहीती पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी दिली.

हिंगोली जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या अध्यक्षतेखाली दि २० एप्रिल २०२६ रोजी कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे अपघाताचे प्रमाण कमी करून जीवित व वित्तहनी टाळण्यासाठी वाहतूक नियम जनजागृती व हेल्मेट सक्ती तसेच प्रथमोपचार माहिती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी केले. हिंगोली जिल्ह्यात मागील दोन वर्षापासून अपघाताचे प्रमाण हे लक्षणीय वाढले असून मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी व वित्तहानी होत आहे, एकंदरीत अपघाताचा अभ्यास केल्यास ५० टक्के पेक्षा जास्त अपघातात मोटरसायकलस्वार मृत्यूमुखी पडतात. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात २० एप्रिल २०२६ पासून मोटार सायकल चालवणारा व पाठीमागे बसणाऱ्या इसमास हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. तसेच चार चाकी वाहन चालकांनी सीट बेल्टचा वापर करावा, दारू पिऊन वाहन चालू नये, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करू नये, ट्रिपल सीट मोटार सायकल चालू नये, वाहन चालवताना वाहतूक नियमांचे पालन करावे, वेळोवेळी चालकांनी मेडिकल चेकअप करून घ्यावे, वहाणाचे फिटनेस तपासावे अशा प्रकारच्या सुद्धा सूचना देण्यात आल्या. अपघात स्थळी नागरिकांनी जखमी लोकांना मदत करावी, तात्काळ ११२ व १०८ वर निशुल्क कॉल करून पोलीस व वैद्यकीय मदत बोलावून घ्यावी व हॉस्पिटलमध्ये दाखल करावे. अपघातात मदत करणाऱ्या लोकांची ओळख देणे बंधनकारक नाही तसेच त्यांना कोर्ट कचेरी सुद्धा करावी लागणार नाही . तसेच पीएम राहत योजनेअंतर्गत अपघातात जखमी इसमांना मान्यता प्राप्त रुग्णालयामध्ये दीड लाखापर्यंत मोफत उपचार असणार आहे अशा प्रकारचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

परिवहन अधिकाऱ्यांतर्फे सुद्धा वाहतूक नियमाबाबत जनजागृती करून विद्यार्थ्यांनी विनापरवाना वाहन चालू नये, पालकांनी सुद्धा आपल्या पाल्यांना वाहन देऊ नये अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले. सदर प्रसंगी वैद्यकीय पथकाद्वारे प्रथमोपचार बाबत व सीपीआर बाबत प्रात्याक्षीक दाखवण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन , अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी कुंदनकुमार वाघमारे, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जिवीशाचे पोलिस निरीखक जमीर नाईक, शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक शरद मरे, चंद्रकीर्ती टिपले, विक्रांत भोईने परिवहन अधिकारी यांचे सह डॉक्टर्स पथक, सर्व ठाणेदार तसेच प्रतिष्ठित नागरिक, खाजगी प्रवासी वाहतूक करणारे चालक, शाळेतील विद्यार्थी, पोलीस पाटील, पत्रकार यांचे सह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सपोनि शिवसांब घेवारे यांनी केले.

# हळद उत्पादक शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## शासन दराप्रमाणे हळदीची खरेदी करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळद उत्पादन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हळद विक्रीसाठी आणली आहे. शासन दर प्रतिक्विंटल १६ हजार ९०० रूपये असतांना व्यापाऱ्यांकडून हळद १२ हजार प्रमाणे खरेदी होत असल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडीत थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढीत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले.

येथील संत नामदेव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मागील सात दिवसांपासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वाहनांद्वारे हळद विक्रीसाठी आणली आहे. हळद मोठ्या प्रमाणात आणल्यामुळे लिलाव जलदगतीने होत नाही. तसेच व्यापाऱ्यांनी खरेदी केलेली हळद मार्केट यार्डमध्येच थप्पी रचून ठेवल्यामुळे शेतकऱ्यांचा हळदीचा माल उतरवण्यासाठी जागा शिल्लक नाही. शेतकऱ्यांनी आणलेली वाहने दोन ते तीन दिवस ताटकळत उभी ठेवावी लागत आहेत. एका दिवसाचे भाडे १ हजार रूपये वाहन धारकांना द्यावे लागत आहे. त्यातच अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे उघड्यावर हळद ठेवल्यास शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होण्याची दाट शक्यता आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोमवारी हळदीचा लिलाव होत असतांना शेतकऱ्यांचा माल १२ हजार प्रतिक्विंटल प्रमाणे खरेदी होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली तसेच शेतकऱ्यांना कोणत्याही सुविधा मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडीत कृषी उत्पन्न बाजार समितीपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोर्चा काढला. अचानक शेतकऱ्यांनी मोर्चा काढल्यामुळे कार्यालय परिसरात एकच गोधळ उडाला होता. तत्काळ शेतकऱ्यांची हळद शासन दराप्रमाणे खरेदी करावी तसेच हळदीचे तत्काळ लिलाव करून शेतकऱ्यांना सुविधा द्याव्यात अशी मागणी या मोर्चेकऱ्यांनी केली आहे.

# घरगुती साहित्य संचासाठी कामगारांच्या लांबच लांब रांगा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत असलेल्या कामगारांना घरगुती उपयोगी वस्तूंच्या संचाचे (किट) वाटप सध्या हिंगोली शहराजवळील लिंबाळा एमआयडीसी भागात सुरू आहे. हे साहित्य मिळवण्यासाठी आज सकाळपासूनच जिल्हाभरातील हजारो कामगारांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली असून, परिसरात कामगारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत.

जिल्हाभरातून कामगारांची हजेरी: केवळ हिंगोली शहरच नव्हे, तर जिल्ह्यातील विविध तालुक्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगार पहाटेपासूनच लिंबाळा एमआयडीसी परिसरात दाखल झाले आहेत.

रांगांमध्ये महिला आणि वृद्ध कामगारांची संख्या मोठी आहे. मात्र, या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची किंवा सावलीची पुरेशी व्यवस्था नसल्याने उन्हाचा चटका सहन करत कामगारांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. मंडळाकडून मिळणाऱ्या या संचामध्ये संसारासाठी उपयुक्त अशा विविध वस्तूंचा समावेश असल्याने, आपला नंबर लवकर लागावा यासाठी कामगारांमध्ये काही प्रमाणात चढाओढही दिसून येत आहे.

यावेळी काही कामगारांनी प्रतिक्रीया देतांना सांगितले की, आम्ही सकाळपासून रांगेत आहोत, पण गर्दी खूप असल्याने नंबर कधी येईल हे सांगता येत नाही. कामाचा दिवस बुडवून आम्ही येथे आलो आहोत, प्रशासनाने वाटपाची प्रक्रिया अधिक सुटसुटीत करायला हवी.



**हिंगोली– नगर परिषदेच्या लिंबाळा मक्ता येथील कचरा डेपोची आग अजूनही धुमसत असून यामुळे मोठा अनर्थ आणि नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. याकडे प्रशासनाने लक्ष देऊन आग आटोक्यात आणावी अशी मागणी होत आहे. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### मेडीकल लाईनमध्ये वाहतुकीची कोंडी




हिंगोली– शहरातील जुन्या वस्तीतील मेडीकल लाईन जवळील चौकात वाहनांची नेहमीच कोंडी होत असतांना दिसत आहे. या भागात मेडीकल दुकाने, सदर बाजार, महावीर चौकातून येणारी वाहने, जुने ग्रामीण पोलिस ठाण्याकडून येणारी वाहने तसेच अत्यंत अरूंद रस्ता यामुळे या भागात नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असतांना दिसत आहे. सदर बाजारातील किराणा दुकाने, मसाल्याची दुकाने, फुलमंडी तसेच हरण चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची अस्ताव्यस्त पार्कींग, हातगाडे यामुळे या भागात वाहनांची कोंडी होत आहे. याकडे वाहतुक पोलिसांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

### वगरवाडी तांड्यात प्राणप्रतिष्ठा, कलशारोहन



हिंगोली– औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी तांडा येथील जगदंबा व सेवालाल महाराज मंदिरात श्री जगदंबा देवी व श्री सेवालाल महाराज, रामराव बापू यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व जगदंबा व सेवालाल महाराज मंदिराचा कलशारोहण सोहळा, विविध कार्यक्रमाच्या आयोजनाने सोमवारी (ता.२०) एप्रिल रोजी उत्साहात झाला. वगरवाडी तांडा येथे मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त होमहवन पुरोहित सुधीर महाराज शिरडशहापूरकर ,श्री रमेश महाराज पोहरादेवी (मूर्ती प्राणप्रतिष्ठाण यांच्या हस्ते), महंत आत्मानंद गिरीजी महाराज, सिद्धनाथ संस्थान गांगलवाडी महंत श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली अमरगड यांचे प्रवचन व ह भ प बापूराव महाराज खांबलवाडी ,बंजारा भजन), ह भ प माणिक महाराज कुंभी ( बंजारा भजन) झाले. तसेच, मंदिराचे कलशारोहण झाले. यावेळी तुकाराम राठोड, बाळू राठोड, गोविंद राठोड, दादाराव जाधव, सचिन राठोड, अजय राठोड, गंगाधर चव्हाण, वसंत राठोड, बापूराव जाधव, शेषराव राठोड, बालाजी राठोड, फकीरा राठोड, रामचंद्र चव्हाण, संजय चव्हाण आदींची उपस्थिती होती. फकीरा जीजा राठोड (नायक) व रामचंद्र सखाराम चव्हाण (कारभारी) या कार्यक्रमाचे संयोजक होते. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# वन विभागाच्या पथकाने उमरा फाटा शिवारात सागवान केले जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

हिंगोली ते कळमनुरी मार्गावर उमरा फाटा शिवारात वन विभागाच्या पथकाने रविवारी सागवानाची वाहतूक करणारा टेम्पो जप्त केला आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू असून या कार्यवाहीमुळे वृक्षतोड करणाऱ्या तस्करांचे धाबे दणाणले आहे.

वन विभागाच्या वतीने जिल्ह्यात अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी पथके तयार करण्यात आली आहेत. विभागीय वन अधिकारी राजेंद्र नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी सचिन माने, वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, विश्वनाथ टाक, माधव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली, कळमनुरी तसेच वसमत, औंढा नागनाथ, सेनगाव तालुक्यात पथकाकडून गस्त घातली जात आहे.

रविवारी दुपारी उमरा फाटा शिवारातून एका टेम्पोमध्ये सागवान लाकूड भरून वसमतकडे नेला जात असल्याची माहीती वन विभागाला मिळाली होती. त्यावरून वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, वनपाल काळे, वनरक्षक अशोक चव्हाण यांच्यासह पथकाने वाहनाची तपासणी केली असता त्यात अवेधरित्या सागवान लाकूड आणि वाहतुक करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर पथकाने सागवान व टेम्पो जप्त केला आहे. पुढील कार्यवाही सुरू आहे.

# लग्नसराईमुळे बर्फाच्या दरात वाढ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

जिल्ह्यात सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून, घामाच्या धारांनी नागरिक हैराण झाले आहेत. वाढत्या उष्णतेसोबतच सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने बाजारपेठेत बर्फाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

हिंगोली शहरालगत असलेल्या एमआयडीसी परिसरातील बर्फ कारखान्यांवर सध्या बर्फ खरेदीसाठी व्यापाऱ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कडाक्याचे ऊन आणि लग्नकार्यांची रेलचेल यामुळे थंड पेये, ज्यूस सेंटर आणि लग्नातील पाहुण्यांच्या व्यवस्थेसाठी बर्फाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मागणी वाढल्याने बर्फाच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. सध्या बाजारपेठेत एका बर्फाच्या लादीची किंमत १,००० ते १,२०० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तरीही बर्फ मिळवण्यासाठी कारखान्याबाहेर सकाळपासूनच वाहनांच्या रांगा लागत आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून आलेले किरकोळ विक्रेते आणि केटरर्स व्यावसायिक एमआयडीसीमध्ये बर्फासाठी पहाटेपासूनच गर्दी करत आहेत.

उन्हामुळे बर्फाचे उत्पादन आणि मागणी यामध्ये तफावत निर्माण होत असल्याने काही ठिकाणी बर्फाचा तुटवडाही जाणवू लागला आहे. वाढत्या दरामुळे थंड पेयांच्या किंमतीवरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. सध्या एमआयडीसी भागात बर्फ कारखान्याबाहेर बर्फाच्या लाद्या भरलेली वाहने आणि व्यापाऱ्यांची होणारी गडबड वाढत्या उन्हाची आणि बदलत्या बाजारपेठेची साक्ष देत आहे.

# मार्केट यार्डात व्यापाऱ्यांच्या मालाच्या थप्प्या, शेतकऱ्यांचा माल वाहनांत



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २० एप्रिल**

शहरातील संत नामदेव मार्केट यार्डमध्ये व्यापाऱ्यांनी खरेदी केलेल्या मालाच्या थप्प्या अनेक दिवसांपासून पडून आहेत. त्यामुळे बाहेरगावाहून कृषी उत्पन्न बाजार समितीत वाहनांतून विक्रीसाठी आणलेला माल शेतकऱ्यांना यार्डात टाकण्यासाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे वाहनांचे दर दिवसाचे भाडे आणि शेतकऱ्यांचा जेवणाचा आणि निवासाचा खर्च त्यांना खिशातून द्यावा लागत आहे. याकडे बाजार समिती लक्ष देईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

विदर्भ आणि मराठवाड्याची मोठी बाजारपेठ असलेल्या हिंगोली येथील मोंढ्यामध्ये सध्या हळद विक्रीसाठी आलेल्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मात्र, बाजारभावातील घसरण आणि नियोजनाच्या अभावामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

प्रतिक्षेचा कालावधी: मोंढ्यात हळद विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ४ ते ६ दिवस ताटकळत राहावे लागत आहे. रविवारी देखील शेतकऱ्यांची मोठी गर्दी दिसून आली.

खर्चात वाढ: मुक्कामाचा वाढता कालावधी आणि वाहनांचे भाडे यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला साधारण ४,५०० रुपयांपर्यंत अतिरिक्त खर्च सोसावा लागत आहे. इतक्या दिवसांच्या प्रतिक्षेनंतरही हळदीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

आम्ही तीन-तीन दिवसांपासून इथे थांबलो आहोत. घर सोडून सहा दिवस झाले, पण अजून नंबर आलेला नाही. खिशातले पैसे संपत आलेत आणि मालाला भावही नाही. अशाने शेतकऱ्याने जगायचे कसे? अशी उद्विग्न भावना एका शेतकऱ्याने व्यक्त केली. मोंढ्यातील मालाची उचल (बीट) करण्याची प्रक्रिया वेगवान करावी आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, अशी मागणी महागाव तालुक्यासह इतर भागांतून आलेल्या शेतकऱ्यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

# हिंगोली नगर परिषदेच्या कचरा डेपोची आग विझेना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० एप्रिल**

हिंगोली नगर परिषदेच्या लिंबाळा मक्ता येथील कचरा डेपोला २२ मार्च रोजी भीषण आग लागली होती. या आगीमुळे परिसरातील झाडे जळाली तसेच बरेच नुकसान झाले होते. अग्नीशमन दलाने ही आग त्यावेळी विझवली असल्याचे सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात अजूनही कचरा डेपोची आग धुमसत असून मोठा अनर्थ होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी नुकतीच कळमनुरी येथील कचरा डेपोला भेट दिली होती. त्यानंतर पत्रकारपरिषदेत त्यांनी हिंगोली नगर परिषदेच्या कचरा डेपोलाही भेट देणार असल्याचे सांगितले होते.

हिंगोली नगर परिषदेचा लिंबाळा मक्ता भागात कचरा डेपो आहे. याठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा गोळा केल्या जातो परंतु २२ मार्च रोजी या डेपोला भीषण आग लागली. ही आग विझवण्यासाठी हिंगोली, कळमनुरी, सेनगाव याठिकाणाहून अग्नीशमन दलांना पाचारण करण्यात आले होते. शेकडो बंबाद्वारे ही आग विझवण्याचा प्रयत्न अग्नीशमन दलाने केला होता. परंतु अजूनही कचरा डेपोची आग धुमसत असल्याचे दिसत आहे. ही आग वाढत असून याकडे वेळीच लक्ष दिले नाहीतर पुन्हा एकदा मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी तत्काळ कचरा डेपोची आग विझवण्यासाठी संबंधित यंत्रणांना आदेशित करावे अशी मागणी होत आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उष्म्यामुळे दुपारच्या सुमारास प्रवाशांची संख्या रोडावली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० एप्रिल :** सध्या उष्म्याने प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने दुपारच्या सुमारास एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या रोडवल्याचे निदर्शनास येत आहे.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने प्रवाशांची संख्या वाढली आहे. अनेक शाळांच्यापरीक्षा संपल्याने सुट्यांसाठीमंडळी गावाकडे जात आहेत. मात्र सध्यस्थितीतवाढत्या उष्म्यामुळे दुपारच्या वेळेला प्रवास करण्याऐवजी बहुसंख्य प्रवसी सकाळच्या सत्रात प्रवास करण्यास प्राधान्य देताना दिसत आहेत. त्यामुळे दुपारच्या तुलनेत सकाळच्या वेळेतीलबसेसना प्रवाशांची तोबा गर्दी होत असल्याचे पाहायला मिळत आहे. दुपारी उन्हाच्या तीव्रतेपासूनबचाव करण्याच्या उद्देशाने प्रवासी प्रवास करणे टाळत असल्याचे लक्षात येते. दुपारच्या वेळेत बस स्थानक परिसरात फेरफटका मारला असता, बसेसना गर्दी कमी आणि उपलब्धअसलेल्या बसमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या खूपचकमी पाहायला मिळाली. उन्हाच्या तडाख्यापासून सुटका करून घेण्याच्या दृष्टीने पुढचे काही दिवस अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# विविध वृत्त...

## लातूर उपशिक्षणाधिकारी पदी सुशील फुलारी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल :** लातूर जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारी प्राथमिक त्या रिक्त पदी तालुका रेणापूर जिल्हा लातूर येथील रहिवाशी असलेले सुशील अरविंदराव फुलारी यांची नियुक्ती.

लातूर जिल्ह्याला लातूर जिल्ह्यातील एक भूमिपुत्र उपशिक्षणाधिकारी म्हणून लाभला आहे.

सुशिल फुलारी हे धाराशिव जिल्हा परिषद अंतर्गत कळंब पंचायत समिती येथील येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. फुलारी हे अतिशय उपक्रमशील व गुणवत्तेला प्रोत्साहन देणारे म्हणून धाराशिव जिल्ह्यात त्यांची ख्याती आहे.त्यांच्या अनेक उपक्रमापैकी राज्यस्तरावर गेलेले उपक्रम गुढीपाडवा प्रवेश वाढवा, परीक्षा एक मार्गदर्शक अनेक तसेच मिशन शिष्यवृत्ती नवोदय कार्यशाळा तसेच एन.एम.एम.एस. सैनिकी विद्यालय यासारख्या स्पर्धा परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणात ईटकुर बीट मध्ये गुणवत्ता वाढ करून ईटकुर बीट गुणवत्तेत अग्रेसर ठेवलेले आहे त्यांच्या नियुक्ती मुळे लातुर जिल्ह्यातील येथेच शिक्षण झालेले त्यांचे सर्व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे

## कर्मचाऱ्यांचा आज पासून संपावर जाण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल :** शिक्षक सेनेने आज दि.२१ एप्रिल २०२६ पासून राज्यातील सुमारे साडेसतरा लाख शासकीय व निमशासकीय कर्मचारी आपल्या न्याय हक्कासाठी बेमुदत संपावर जातील, असा इशारा दिला आहे. या ऐतिहासिक लढ्याला महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे अध्यक्ष आ. ज. मो. अभ्यंकर यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. राज्यातील सर्व शिक्षक सेना सदस्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या संपात पूर्ण ताकदीने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रमुख मागण्यांमध्ये जुनी पेन्शन योजना कोणत्याही अटीशिवाय जशीच्या तशी लागू करावी. आश्र्वासित प्रगती योजना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे लाभ लागू करावेत. सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करावे. मागण्या मान्य होईपर्यंत माघार घ्यायची नाही. सर्व पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी या संपात सहभागी व्हावे, असे आवाहन शिक्षक सेनेने केले आहे.

## माजी महापौर सुरेश पवार यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल : लातूर महापालिकेचे माजी महापौर सुरेश निवृत्तीराव पवार यांचे रविवारी (दि.१९) सकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने पुण्यातील मुलीच्या घरी निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर येथील मारवाडी स्मशानभूमीत रविवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्र्चात एक मुलगा, दोन विवाहित मुली, सहा भाऊ असा मोठा परिवार आहे.**

**महापौर सुरेश पवार हे सलग सहावेळा लातूर नगरपरिषद व महापालिकेचे नगरसेवक होते. दरम्यानच्या काळात त्यांनी विविध विषय समित्यांची सभापतीपदे भूषविली, त्याचप्रमाणे पहिल्या लातूर महापालिकेचे काँग्रेस पक्षाकडून उपमहापौर होते.**

**त्यानंतर भाजपमध्ये जाऊन ते महापौर झाले होते.**

**मागील दोन दिवसांपूर्वी सुरेश पवार हे पुण्याला मुलीकडे गेले होते. शनिवारी रात्री मुलगी, जावई व सुरेश पवार हे रात्री साडेबारा वाजेपर्यंत गप्पा मारत बसले होते. दररोज पहाटे पाच वाजताच ते झोपेतून उठतात. परंतु, रविवारी सकाळी सात वाजेपर्यंत ते उठलेच नाहीत, म्हणून त्यांची मुलगी उठविण्यास गेली असता त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद आला नाही. यामुळे त्यांना तत्काळ रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुरेश पवार यांचे पार्थिव पुण्यातून लातूरला आणण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती.**

# आ. अमित देशमुखांची अनुपस्थिती लातूरकरांना खटकली !

**तभा वृत्तसेवा**



**लातूर, दि. २० एप्रिल :** तमाम लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्र्न बनलेल्या लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचा भूमिपूजन सोहळा शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. या सोहळ्यास लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे सलग चौथ्यांदा प्रतिनिधित्व करणारे आ. अमित देशमुख आवर्जून उपस्थित राहतील असा लातूरकरांचा कयास होता. कारण अमित देशमुखांनी लातूरच्या पालकमंत्रीपदासोबतच राज्याच्या वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळली होती. त्यांना या विषयाचा चांगला अभ्यासही आहे. मात्र, या सोहळ्यासत्यांची अनुपस्थिती लातूरकरांना चांगलीच खटकल्याचे दिसून आले. सामान्यांच्या आरोग्याशी जणू आपले काहीही देणेघेणे नाही असेच त्यांच्या या कृतीवरून निदर्शनास येत असल्याच्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळाल्या.

आ. अमित देशमुख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा भविष्यातील महाराष्ट्राचा प्रमुख चेहरा असणारे नेतृत्व. आजही त्यांच्या सक्षम नेतृत्वात लातूर जिल्ह्यावर काँग्रेसची बऱ्यापैकी पकड असल्याचे दिसून येते. नुकत्याच पार पडलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तसेच लातूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत त्यांच्याच नेतृत्वात काँग्रेसने दमदार कामगिरी केली. लातूर मनपावर निर्विवाद बहुमत मिळवण्याबरोबरच लातूर जिल्हा परिषदेतही सर्वाधिक जागा मिळवणारा क्रमांक एकचा राजकीय पक्ष म्हणून त्यांनी काँग्रेसला आघाडी मिळवून दिली. या दोन्ही प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आ.देशमुखांनी भाजपवर मात करण्यात यश संपादन केले, ही बाब मान्यच करावी लागेल. मात्र, आ. अमित देशमुखांचे हे यश निश्र्चितच ' निर्भेळ ' नव्हते, ही बाब कोणीही खाजगीत मान्य करेल, याबद्दल कोणतीही शंका उपस्थित करण्याचे कारण नाही.

लातूरच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिलेला जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न सोडविणे मुळात आ. अमित देशमुख यांच्यासाठी फारसे अडचणीचे नव्हते. त्यांनी मनात आणले असते तर हा प्रश्र्न तेव्हाच सुटू शकला असता, असे आजही लातुरातील असंख्य मंडळींचे म्हणणे आहे. मात्र, प्रत्यक्षात हा विषय अनेक वर्षे ताटकळत राहिला. लातूरच्या सामान्य नागरिकांचा आजही देशमुख परिवारावर विश्र्वास आहे. या विश्र्वासाला पात्र राहून राजकारण आणि समाजकारण केले तर देशमुख परिवाराची लातूरवरील पकड पुढील काळातही कायम राहू शकणार आहे. आ. अमित देशमुख यांचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही पक्षाच्या पलीकडचे घनिष्ठ संबंध आहेत. विरोधी पक्षाचे आमदार म्हणूनही त्यांनी या प्रकरणाबाबत देवेंद्र फडणवीसांकडे शब्द टाकला असता तर त्यांनी अमित देशमुखांचा शब्द कदापि खाली पडू दिला नसता. तरीही आ. अमित देशमुख यांनी तसे न केल्याबद्दल तमाम लातूरकरात नाराजीचा सूर आहे. अमित देशमुखांनी जिल्हा रुग्णालयासाठी वजन खर्ची घालणे टाळले असले तरी किमान रुग्णालयाच्या भूमिपूजन सोहळ्यास तरी ते लातूर शहराचे आमदार या नात्याने उपस्थित राहतील, लातूरकरांच्या सोयीसाठी हे अद्यावत रुग्णालय लवकरात लवकर उभारले जावे,अशी अपेक्षा व्यक्त करतील,अशी सामान्य लातूरकरांनी अपेक्षा होती. परंतु आ. अमित देशमुख या सोहळ्यास अनुपस्थित राहिले. त्यांच्या अनुपस्थितीचे कारण काय आहे ? हे कळू शकले नाही. मात्र, लातूरकरांच्या जिव्हाळ्याचा विषय असतानाही शहराचे आमदार या रूपाने तरी त्यांनी उपस्थित राहायला हवे होते,अशा प्रतिक्रिया नागरीकातून व्यक्त होताना दिसत आहेत.

## जनगणनेवेळी धर्माच्या रकान्यात लिंगायत लिहा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २० एप्रिल : जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांनी १२व्या शतकात मानवतावादी अनुभव मंटपाच्या माध्यमातून लिंगायत धर्म संस्कार दिले. त्यामुळे लिंगायतांनी जनगणनेमध्ये आपली नोंद करताना धर्माच्या रकान्यात 'लिंगायत' म्हणून धर्माची नोंद करावी, असे आवाहन 'लिंगायत शरण फाऊंडेशन'चे संस्थापक अध्यक्ष माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले. यासंदर्भात कर्नाटक राज्यात प्रबोधनात्मक चळवळ सुरू झाली आहे. तशी चळवळ आम्ही महाराष्ट्रात हाती घेतली आहे, असेही ते म्हणाले. महात्मा बसवेश्र्वर जयंतीचे औचित्य साधून 'लिंगायत शरण फाऊंडेशन'च्या वतीने आयोजित सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले चंद्रकांत बिराजदार (सामाजिक), डॉ. गजानन हलकंचे (वैद्यकीय), (वैद्यकीय), शिरीष उटगे (उद्योग), सुशांत सांगवे (पत्रकारिता), डॉ. आशिष चलवदे (वैद्यकीय), गुरुनाथ उच्चेकर (उद्योग), बसवराज पैके (सामाजिक), विजय आव्हाळे (सामाजिक), सुरज गौंड (सामाजिक) यांना 'समाजरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

## रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. २० एप्रिल :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या उच्चतम व्यावसायिक पुरस्काराचे वितरण नुकतेच मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर शहरात सामाजिक कार्यामध्ये रोटरी अग्रगण्य आहे त्याचाच एक भाग म्हणून समाजातील उच्चतम व्यावसायिक मूल्य जतन करून व्यवसाय करणारे व्यावसायिक यांना हा पुरस्कार दिला जातो. रोटरी क्लब लातूर सेंट्रलचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर व्हिजिट पब्लिक फंक्शन हॉटेल भारत फाईन डाईन या ठिकाणी संपन्न झाले. ज्यामध्ये लातूर शहरातील प्रख्यात डॉ. शिरीष मस्के पाटील वैद्यकीय व्यवसाय त्याचबरोबर डॉ. धीरज मानकरी जीवन किसान ॲग्रो, सचिन बांगड ॲडमिशन मेड इझी, शैलेंद्र बलदोटा गुरु गणेश डमिडीया ॲंड प्रिंटर्स, फिरोज पठाण एस. एम. आर. कॅन्टीन त्याचबरोबर रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ द्वारा दिला जाणारा सेवा विशेष पुरस्कार सौ. ज्योती धोंडीराम शिंदे, महिला आरोग्य चळवळीतील प्रमुख तसेच संजय शंकरराव मंडाळे यांना दिव्यांग व्यक्तीचे उल्लेखनीय कार्य यासाठी प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल सुधीर लातूरे, सौ. संगीता सुधीर लातूरे, सहाय्यक प्रांतपाल एड. श्रीराम देशपांडे व सौ प्रतिभा श्रीराम देशपांडे, डिस्ट्रिक्ट सेक्रेटरी डॉ. राजगोपाल तापडिया, रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे , सौ. ऋतुजा बाळासाहेब खैरे, सचिव डॉ.नेताजी शिंगटे, सौ.शितल नेताजी शिंगटे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख सुदर्शन कांबळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत रामढवे व रवींद्र चामले यांनी केले. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे माजी अध्यक्ष, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स तथा सर्व सदस्य सहपरिवार उपस्थित होते.

## व्हीएस पॅंथर्सतर्फे ४१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**




**लातूर दि. २० एप्रिल :** व्हीएस पॅंथर्स विद्यार्थी आघाडीच्या वतीने महात्मा बसवेश्र्वर यांच्या जयंतीनिमित्त रविवारी आयोजित शिबिरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान करून महात्मा बसवेश्र्वरांना अभिवादन केले.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन व्ही एस पॅंथर्स युवा संघटनेचे सहाट अशोक, महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ बावासादेव संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते महात्मा बसवेश्र्वर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आले. यावेळी संघटनेचे मार्गदर्शक रवी कुरील, कामगार आघाडी शहराध्यक्ष गौस शेख, जिल्हा संघटक सुरज सूर्यवंशी, सचिन गायकवाड, संदीप बानाटे, विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, शहराध्यक्ष अविष्कार कांबळे व जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे उपस्थित होते. संजीवनी ब्लड बँकेचे जनसंपर्क अधिकारी डॉ. सितम सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील टीमने रक्त संकलन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी सुरज कांबळे,ष सुजीत कांबळे, रोहित दंडे, रितेश जांभळे, समिर शेख, चेतन कंधारे, समाधान शिंदे, उत्कर्ष सुर्यवंशी, सुजीत मस्के, सोनु कांबळे, अनिकेत पाटील, विरनाथ गायकवाड, प्रवीण बिरादार, ओम पाटील, सुदर्शन ओव्हळ, विशाल गायकवाड आदींसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कल्याण वाघमारे यांना रंगकर्मींची श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा**



**लातूर दि. २० एप्रिल :** लातूरच्या नाट्यविश्वाला धक्का देणारे नाट्यवेडे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांच्या स्मरणार्थ शनिवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता येथील पंचवटी हॉटेलमध्ये रंगकर्मींच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शहरातील नाट्यप्रेमी, कलाकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांच्या भावना दाटून आल्या होत्या.

प्रा. सुषमा अंधारे म्हणाल्या, महाविद्यालयीन काळातच कल्याण वाघमारे यांनी सांस्कृतिक क्षेत्रात उच्च शिखर गाठले होते, मात्र त्यांचे पाय कायम जमिनीवरच होते. अशा गुणी कलावंताच्या कुटुंबीयांसाठी कायमस्वरूपी निधी उभारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी कल्याण वाघमारे यांच्या तिन्ही मुलींच्या नावे प्रत्येकी २१ हजार रुपयांची मुदत ठेव करण्याचे जाहीर केले. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांनी कल्याण वाघमारे यांच्या एका मुलीच्या पाच वर्षांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली. 'नाट्य स्पंदन'च्या वतीने डॉ. अशोक आरदवाड यांनी एका मुलीचे पालकत्व स्वीकारले. प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी तिन्ही मुलींच्या लग्नाचा खर्च व ५१ हजार रुपये देण्याची घोषणा केली. यावेळी विविध सामाजिक संस्था आणि मान्यवरांनी 'कल्याण निधी' उभारण्याचा संकल्प केला. पत्रकार रामेश्र्वर बद्दर यांनी कुटुंबीयांना ५१ हजार रुपयांची मदत जाहीर केली. विनोदी अभिनेता बालाजी सूळ यांनी ११ हजार रुपयांची मदत जाहीर केली. यावेळी नाट्यकर्मी धनंजय बेंबडे, अविष्कार गोजमगुंडे, संजय अयाचित, सुरेखा मदने, प्रा. सुधीर देशमुख, अनिल कांबळे, पांडुरंग वाघमारे, अजय पांडे, भास्कर माने, पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, संजय जमदाडे, प्रा. सुधीर अनवले, मोहन माने, अरुणा वाघमारे, अरुण बारस्कर, सुधन्वा पत्की, शाहीर संतोष साळुंके, डॉ. अनघा राजपूत, अनिल पुरी, महेश पवार, प्रशांत जानराव, यांसह अनेकांची उपस्थिती होती.

## मुख्याध्यापक, केंद्रप्रमुखांची वेतन निश्चिती होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २० एप्रिल :** जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळांतल्या पदवीधर प्राथमिक शिक्षकांना प्राथमिक पदवीधर मुख्याध्यापक अथवा केंद्रप्रमुखपदी पदोन्नती दिल्यानंतर वेतन निश्र्चिती करताना एक वेतनवाढ देण्याबाबतचे आदेश दिले आहेत. प्रशिक्षित प्राथमिक पदवीधर शिक्षक पदोन्नतीपूर्वीच वेतनश्रेणीत किंवा वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन आहरण करीत असेल तरीही पदवीधर प्राथमिक मुख्याध्यापक अथवा केंद्रप्रमुख पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये निश्र्चितपणे वाढ होत असल्याने त्यांची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्र्चिती करण्यात यावी.

## प्रा. रवी बापटले जिव्हाळा सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**उदगीर दि.२० एप्रिल :** समाजातील उपेक्षित, एड्सग्रस्त व निराधार घटकांसाठी आयुष्य वेचणारे समाजसेवक प्रा. रवि बापटले यांना उदगीरच्या जिव्हाळा ग्रुपतर्फे ' जिव्हाळा सेवारत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जिव्हाळा ग्रुपतर्फे धोंडीहिप्परगा येथील हिराकाशी सेवालय वृद्धाश्रमात आयोजित भावनिक व प्रेरणादायी सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी माफसूचे माजी विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने होते. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक विश्र्वनाथ मुडपे, जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष विश्र्वनाथराव माळेवाडीकर व देविदासराव नादरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भिकाने यांनी प्रा. बापटले यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हणाले, प्रा. बापटले यांनी समाजसेवेचा केवळ ध्यास घेतला नाही, तर आपले संपूर्ण जीवनच त्यासाठी अर्पण केले आहे. हासेगाव येथे त्यांनी उभारलेले सेवालय आणि 'हॅपी इंडियन व्हिलेज' याद्वारे एड्सग्रस्त मुलांचे संगोपन, शिक्षण, विवाह व पुनर्वसन करून त्यांनी त्यांना सन्मानाने जगण्याची नवी दिशा दिल्याचे त्यांनी नमूद केले. बापटले यांनी सुरू केलेल्या धोंडीहिप्परगा येथील हिराकाशी सेवालयात निराधार वृद्ध, महिला व अपंगांना केवळ आसरा नव्हे, तर सन्मानाने जगण्याची संधी दिली जाते. सर्व जाती-धर्मातील लोकांना समानतेने आश्रय देणारे हे सेवालय सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचे जिवंत प्रतीक असल्याचे विश्र्वनाथ मुडपे यांनी सांगितले.


## जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचित करण्यात येतो कि, माझे पक्षकार नामे. हसन तय्यब सय्यद, रा. बार्शी रोड, १२ नंबर पाटी मस्जीद जवळ, श्याम नगर, लातूर. यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस माहितीस्तव खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांनी मोजे. लातूर महानगर पालिका हद्दीतील खाडगाव विभागातील खुला प्लॉट नामे. सय्यद बद्रोहीन अजिजमियाँ, रा. बाभळगाव, ता. जि. लातूर. यांच्याकडून ठरावपत्र करुन घेतलेला असून, ज्याचा खरेदीखत दस्त डेबुक नं.५४१८/२००६, दि.११/१२/२००६ ईसवी अन्वये असून, मौजे. हरंगुळ (बु), ता. जि. लातूर येथील जमीन गट नं. ३१३ पैकीचा एन. ए. नं. एनएए/एलटीआर/ए/१८३६, दि. ३०/०८/१९९९ ईसवी अन्वये मे. अप्पर तहसीलदार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. १०६ चा पश्र्चिम भाग व प्लॉट नं. १०७ पूर्ण विक्री करत असून याचे विक्री क्षेत्र लांबी पूर्व पशिम ४९ फुट व रुंदी दक्षिण उत्तर ४० फुट याचे एकूण क्षेत्रफळ १९६० चौ. फुट होत असून सदर प्लॉट ची चर्तुः सिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस प्लॉट नं. १०६ चा उर्वरित भाग, दक्षिणेस प्लॉट नं. १०० व १०१, पश्चिमेस-२० फुट रुंदीचा रस्ता, उत्तरेस २० फुट रुंदीचा रस्ता येणे प्रमाणे वरील चर्तुःसिमेच्या आतील खुला प्लॉट विद्यमान मूळ मालक नामे. सय्यद बद्रोहीन अजिजमियाँ, रा. बाभळगाव. ता. जि. लातूर. यांनी माझ्या पक्षकारा सोबत विक्री ठराव केला आहे. तसेच ठरावा पोटी ईसारा रक्कम दिलेली आहे. तसेच सदरील मिळकती निर्वेध व निजोखिम असल्याची हमी विद्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे. तरी सदर खुला प्लॉट बदल जर कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन शेजाऱ्यांचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्ध वाजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत माझ्या खालील पत्त्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निजोंखीम समजून माझे पक्षकार आपल्या हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करुन घेतील मुदती नंतर आलेले कसल्याही प्रकारचे उजर आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकराक राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन, दि.२०/०४/२०२६

तर्फे

ॲड. अशोक ज्ञानोबा लोखंडे

नोटरी भारत सरकार ऑफीस तहसील कार्यालया शेजारी, लातर.
मो. नं. :- ९४२१९८६४९५/९२८४९३९१३२

जाहीर प्रगटन देणार : हसन तय्यब सय्यदरा. श्याम नगर, १२ नं. पाटी, लातूर. मो. नं. ९६२३८०८०६४